टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
सामाजिक शास्त्रे (अर्थशास्त्र विभाग)

विद्यानिष्णात अर्थशास्त्र (एम.फिल.)
पदवीसाठी सादरकेलेला प्रबंध

✻ शोधविषय ✻

# ‘‘डिंभे धरण परिसरातील मच्छिमार परिवारांचा आर्थिक - सामाजिक अभ्यास’’

## (उपजीविकेच्या पद्धतीचा विशेष अभ्यास)


✻ संशोधक ✻

**शंकर सोमनाथ मोरे**

✻ मार्गदर्शक ✻

**प्रा. डॉ.संहिता आठवले**

(एम.ए., पीएच.डी.)

टी.जे. महाविद्यालय, पुणे - ३



मार्च २०११

# Certificate

*Certified that the work incorporated in Vidyanishanant (M. Phil.) Dissertion,* ''डिंभे धरण परिसरातील मच्छिमार परिवारांचा आर्थिक-सामाजिक अभ्यास (उपजीविकेच्या पद्धतीचा विशेष अभ्यास)'' *submitted by Mr. Shankar Somnath More (PRN No. SO2208000616, Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune) was carried out by the candidate under my supervision, such material as has been obtained from other sources has been duly aknowledged in the dissertation.*

*Place : Pune*
*Date :*

*Supervisior*
***Dr. Sanhita Athawale***

# घोषणापत्रक (Declaration)

मी, **शंकर सोमनाथ मोरे** असे घोषित करतो की, **''डिंभे धरण परिसरातील मच्छिमार परिवारांचा आर्थिक, सामाजिक अभ्यास (उपजीविकेच्या पद्धतीचा विशेष अभ्यास)''** हा माझा स्वत:चा लघुशोध प्रबंध असून मी हा लघुशोध प्रबंध भारतात किंवा भारताबाहेर कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही.

सदर लघुशोध प्रबंधामध्ये नमूद केलेली माहिती आणि संशोधनात्मक विधाने ही मी स्वत: अभ्यासून घेतलेली आहेत.

या संशोधनासाठी उपयोगात आणलेली संदर्भ पुस्तके, विविध लेख, अहवाल या सर्वांचा संदर्भ सुचीमध्ये निर्देश केला आहे.

ठिकाण : पुणे

दिनांक : संशोधक

# ऋणनिर्देश

संशोधनासाठी मला अनेक व्यक्तींनी सहाय्य केले. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे उचित ठरेल.

सदर संशोधन हे माझे गुरुवर्य, मार्गदर्शक आदरणीय प्रा. डॉ. संहिता आठवले यांनी वैयक्तिकरीत्या स्वत:चा अमूल्य वेळ खर्च करुन, सतत प्रोत्साहन देऊन निरपेक्ष कर्तव्य बुध्दीने केलेल्या मार्गदर्शनाचे फलित आहे. त्याबद्दल मला त्यांच्या ऋणात राहणेच आवडेल.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील प्रा. डॉ. प्रवीण जाधव, प्रा. पाटील मॅडम यांनी सुरुवातीपासून प्रोत्साहन आणि मार्गदर्शन केल्यामुळे संशोधन पूर्ण होऊ शकले त्यांचे आभार मी शब्दात मांडू शकत नाही.

मला माझ्या संशोधन कार्यात अनेक मान्यवर विभूतींचे मार्गदर्शन लाभले हे मी माझे भाग्य समजतो. यामध्ये माझे मित्र आय.आय.टी. मुंबईचे कल्याण टांकसाळे यांनी केलेल्या उपयुक्त सूचना, मार्गदर्शन यांचा संशोधन कामी खूप उपयोग झाला मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

'शाश्वत' या स्वयंसेवी संस्थेचे ट्रस्टी आनंद कपूर, कुसूम कर्णिक यांचे मार्गदर्शन प्रोत्साहन सातत्याने मिळाले. त्यांचा मी ऋणी आहे. तसेच शाश्वतचे कार्यकर्ते बुधाजी डामसे यांनी खूप मौलिक मार्गदर्शन केले वर्षभर संशोधन क्षेत्रात जाण्यासाठी, तेथील कार्यकर्ते यांची ओळख करुन दिली त्यामुळे मला आदिवासीच्या जीवनांचे अधिक सखोल निरीक्षण करता आले त्याबद्दल त्यांचाही ऋणी आहे.

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था मधील सौ. मेघना देशपांडे, श्री. सतिश सांगळे, श्री. प्रसाद कोंडे यांनी वेळोवेळी संदर्भ ग्रंथ उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांचाही आभारी आहे.

बी.जी. काळे ग्रंथालय बँक ऑफ महाराष्ट्र, केंद्रीय कार्यालय शिवाजीनगर येथील ग्रंथालय कर्मचारी यांचेही आभार मानतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ गुलटेकडी येथील ग्रंथालयातील योगिता कोकाटे यांनीही संदर्भग्रंथ, अहवाल वेळोवेळी उपलब्ध करुन दिले त्याबद्दल त्यांचाही आभारी आहे.

आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे येथील ग्रंथालयातील कर्मचारी यांचे मी आभार व्यक्त करतो.

संशोधन काळात घराची सर्व जबाबदारी पार पाडणारी आई, भाऊ यांचा आभारी आहे.

संशोधन छपाईटसाठी हातभार लावणारे माझे मित्र श्री. इक्बाल सय्यद यांचाही आभारी आहे.

संशोधन छपाई करणारे मॅक मिडीयाचे श्री. मारुती चोरघे यांनी खूप परिश्रम घेऊन, चुका दुरुस्त करुन वेळेवर संशोधन अहवाल पूर्ण केला त्याबद्दल त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

याशिवाय ज्ञान, अज्ञात व्यक्ती, मानसिक आधार देणारा मित्रपरिवार, नि:संकोच माहिती देणारा आदिवासी बांधव या सर्वांच्या ऋणात राहून दोन शब्द संपवितो.

**– संशोधक**

# अनुक्रमणिका


| क्र. | वर्णन | पान क्र. |
|---|---|---|
| १. | **अहवालातील आदिवासींच्या बोलीभाषेतील शब्द** | १-२ |
| १.१ | प्रस्तावना | ३-५ |
| १.२ | प्रकरण नियोजन | ६-७ |
| १.३ | विषय निवडीचे महत्त्व | ८ |
| १.४ | डिंभे धरण परिसरातील आदिवासींच्या उपजीविकेच्या समस्या | ९ |
| १.५ | आदिम जमाती आणि उपजीविका | १० |
| १.६ | इयान स्कूनचं ग्रामीण शाश्वत उपजीविका विश्लेषण | ११-१२ |
| १.७ | अभ्यास विषय आणि क्षेत्रनिवड | १३-१४ |
| १.८ | संशोधन क्षेत्राची भौगोलिक माहिती | १५-१६ |
| २. | **प्रकरण २ रे** | |
| २.१ | संदर्भ साहित्याचा आढावा | १७-२६ |
| २.२ | सैध्दांतिक पार्श्वभूमी | २७-२९ |
| २.३ | संशोधनाची उद्दिष्टये | ३१ |
| २.४ | संशोधन पद्धती | ३१-३३ |
| २.५ | संशोधनाची गृहीतके, मर्यादा | ३४ |
| २.६ | अभ्यासाचे महत्त्व | ३५-३६ |
| **३.** | **प्रकरण ३ रे** | |
| ३.१ | पुणे जिल्ह्याची भौगोलिक सामाजिक आर्थिक माहिती | ३७-५० |
| ३.२ | आंबेगाव तालुक्याचे आरेखन | ५१-६६ |
| **४.** | **प्रकरण ४ थे** | |
| ४.१ | व्याख्या | ६७ |
| ४.३ | डिंभे जलाशय परिसरातील आर्थिक सामाजिक माहिती | ६९-७६ |
| ४.५ | डिंभे धरण परिसरातील लोक आणि त्यांचे जीवन | ७७-८० |
| ४.७ | डिंभे धरण परिसरातील लोकांच्या उपजीविका | ८०-९० |
| ४.९ | डिंभे धरण परिसरातील लोकांची बाजार व्यवस्था | ९०-९२ |

| क्र. | वर्णन | पान क्र. |
|---|---|---|
| ४.१३ | मच्छिमार समुदायातील लोकांच्या कार्यक्षमता | ९४ |
| ४.१४ | डिंभा धरण परिसरातील जंगलवासियांचे 'Swot Analysis' | ९५-९७ |
| ४.१५ | धरण परिसरातील शेती | १००-१०७ |
| ४.१६ | आंबेगाव तालुक्यातील हिरडा उद्योगाचा भौगोलिक अभ्यास | १०८-१२० |
| ४.१७ | भारतातील मासेमारी | १२३-१२७ |
| ४.१८ | डिंभे जलाशय मासेमारी | १२७-१३२ |
| ४.२० | डिंभे जलाशयातील मच्छिमारींची आर्थिक स्थिती | १३७-१३९ |
| ४.२१ | डिंभे धरण परिसरातील मच्छिमार कुटुंबाच्या समस्या | १४०-१४२ |
| ५. | **प्रकरण ५ वे** | |
| ५.१ | आदिवासींना विविध घटकापासून मिळणारी मदत | १४४ |
| ५.२ | डिंभे धरण परिसरातील पंच भांडवलाची स्थिती | १४७-१५० |
| ५.६ | डिंभे धरण परिसरातील वनउपजांचे महिन्यानुसार वितरण | १५९ |
| ५.७ | कातकरी कुटुंबाची उपजीविका साधने | १६० |
| ६. | **प्रकरण ६ वे** | |
| ६.१ | निष्कर्ष | १६२-१६५ |
| ६.२ | सूचना /शिफारशी | १६६-१६७ |
| ६.३ | अभ्यासात आलेल्या अडचणी | १६८-१६९ |
| ६.४ | भविष्यात अधिक संशोधनासाठीच्या संधी | १७० |
| | **परिशिष्टे** | |
| १. | प्रश्नावलीचा नमुना | १७१-१७४ |
| २. | आंबेगाव तालुक्यातील गावे | १७५-१७६ |
| ३. | अनुसूचित जाती अनुसूचित जनजाती आदेश अधिनियम | १७७-१७९ |
| ४. | संदर्भ सूची | १८०-१८२ |
| ५. | छायाचित्रे | १८३-१८७ |
| ६. | नकाशे | |


****

# अनुक्रमणिका


| क्र. | कोष्टकांची यादी | पान क्र. |
|---|---|---|
| ३.१ | खरिप हंगाम २००९-२०१० च्या आढावा व नियोजन | ५८ |
| ३.२ | आंबेगाव तालुक्यातील खरीप हंगामातील पीक व पेरणी स्थिती | ५९ |
| ४.१ | आंबेगाव तालुक्यातील डिंभे जलाशय परिसरातील १९ गावांची माहिती | ६९ |
| ४.२ | डिंभे जलाशय परिसरातील १९ गावांची सविस्तर माहिती | ७१ |
| ४.३ | डिंभे धरण परिसरातील गावाची एकूण पशुधन स्थिती | ७२ |
| ४.४ | ताग लागवडीनंतर शेताच्या मातीतील बदल | ८२ |
| ४.५ | डिंभे धरण परिसरातील पारंपारिक मापे | ९१ |
| ४.६ | डिंभे जलाशय परिसरातील सर्व्हे कुटुंबापैकी भात खाचरं उत्पन्नस्थिती | १०२ |
| ४.७ | गाळपेर उत्पन्न | १०४ |
| ४.८ | आंबेगाव तालुका हिरडा उद्योग | ११३ |
| ४.९ | गौण वनउपजाची खरेदी २००७-२००८ | ११५ |
| ४.१० | गौण वनउपजांची विक्री २००८-२०१० | ११६ |
| ४.११ | पुणे जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची यादी | ११७ |
| ४.१२ | डिंभे जलाशय परिसरातील हिरडा उद्योग | ११९ |
| ४.१३ | मत्स्य उत्पादन भारत २००६-२००७ | १२४ |
| ४.१५ | जिल्हानिहाय सागरी उत्पादन वार्षिक (महाराष्ट्र) | १२६ |
| ४.१६ | डिंभे जलाशयातील मत्स्यबीज साठा २०१०-२०११ | १३१ |
| ४.१७ | डिंभे धरणातील ४ वर्षातील मत्स्य उत्पादन | १३१ |
| ४.१९ | पुणे जिल्ह्यातील धरणे / बंधारे | १३३ |
| ४.२० | पुणे जिल्ह्यातील भूजल मत्स्यव्यवसाय | १३५ |
| ४.२१ | भीमाशंकर परिसरातील माशांचे प्रकार | १३६ |

| | | |
|---|---|---|
| ५.१ | डिंभे धरण परिसरातील कुटुंबाची मासेमारी उत्पन्न | १४५ |
| ५.२ | पंच भांडवल विश्लेषण | १४७ |
| ५.३ | भातशेती करणारे मच्छिमार | १५० |
| ५.४ | गाळपेर करणारे मच्छिमार | १५० |
| ५.५ | हिरडा वेचणारे कुटुंबे | १५१ |
| ५.६ | डिंभे धरण परिसरातील वनउपजांचे महिन्यानुसार वितरण | १५९ |
| ५.७ | कातकरी कुटुंबाची उपजीविका | १६० |

**आकृतीबंध**

| | | |
|---|---|---|
| ५.१ | धरण परिसरातील आदिवासींना विविध घटकांपासून मिळणारी मदत | १४४ |
| ५.२ | पंच भांडवल आधारित शाश्वत उपजीविका विश्लेषण | १४९ |

****

## * अहवालातील आदिवासींच्या नेहमीच्या बोलीभाषेतील शब्दांचे अर्थ-

१) घोड, भीमा : स्थानिक नद्यांची नावे.

२) गाळपेर शेती : धरण पाणीसाठा कमी झाल्यानंतर उघडी पडणाऱ्या जमीनीताल शेती.

३) पडकई शेती : आदिवासींच्या डोंगरउतारावरील शेतीचा सांघीक प्रयोग.

४) राब : भात आणि नागलीचे पीक लावण्यापुर्वी जमीन पालापाचोळ्याने भाजून घेणे.

५) ट्युबवरची मासेमारी :मोटारीच्या ट्युबमध्ये हवा भरून त्यावर बसून धरणात, नदीत केली जाणारी मासेमारीची पध्दत.

६) होडगं :वेताची १ किंवा २ माणसे बसु शकतील अशा आकाराची गोल होडी.

७) * फुलवडे : आंबेगाव तालुक्यातील गावांची नावे.

* आंबेगाव :आंबेगाव तालुक्यातील गावांची नावे.

* कुशिरे खु!!: आंबेगाव तालुक्यातील गावांची नावे.

* कुशिरे बु. !!: आंबेगाव तालुक्यातील गावांची नावे. इ.

८) कातकरी : आदिम जमात (primitive Tribe Group)

९) महादेव कोळी : अनुसुचित जमात (ST)

१०) ठाकर : अनुसुचित जमात (ST)

११) आधुली, पायली आठवा : वस्तू मोजण्याचे पारंपारिक परिमाण (माप)

१२) फाटे : इंधन म्हणून गोळा केलेली लाकडे.

१३) एक कट्टा : साधारण पन्नास किलो वस्तू किंवा धान्य भरलेले पोते.

१४) 'शाश्वत' : आदिवासीसोबत ३० वर्षापासून काम करणारी स्वंयसेवी संस्था.

१५) ‘सर्च’ : डॉ. अभय बंग, राणी बंग यांनी सुरू केलेल्या गडचिरोलीतील संस्थेचे नाव.

१६) आवणी : भाताची लागवड - लावणी.

१७) बेणनी : तण काढणे (स्थानिक भाषेत यालाच गबाळ काढणे असेही म्हणतात)

१८) राबणी : शेत भाजण्यासाठी पालापाचोळा टाकून ठेवणे.

१९) मोठा हिरडा : हिवाळ्यात फळे मोठी झालेली असतात तो मोठा हिरडा (रंग बनवण्यासाठी म्हणून उपयोगी)

२०) बाळ हिरडा : उन्हाळ्यात कोवळी फळे तोडून सुकवून तयार केला जातो तो हिरडा.(औषधी वनस्पती म्हणून उपयोगी)

२१) अगोठीचा बाजार : पावसाळ्याच्या सुरवातीला ३ महिन्याकरिता करावा लागणारा एकत्रीत बाजारहाट.

२२) आदिवासी एकजूट संघटना : आंबेगाव तालुक्यातील महादेव कोळी या जमातीची संघटना.

२३) खाचरं : भात पीकाची लागवड करण्यासाठी तयार केलेली विशिष्ठ आकाराची शेतजमीन.

****

## १.१ प्रस्तावना

जंगलात राहणाऱ्या लोकांचा विकास हा मुख्य समाजाच्या विकासाच्या मानाने खुप कमी वेगाने झाला. मुख्य समाजातील लोकांचा विकास आणि जंगलातील लोकांचा विकास हा एकाच पट्टीने मोजता येणार नाही आणि विकासाचे एकच धोरणही दोन्ही घटकांना लागु करता येणे शक्य नाही. 'जंगलाचे राजे' यासारख्या पदव्या देवून जंगलवासीयांना डोंगरकपारीत निकृष्ट जमिनीच्या अधारे जीवन जगण्यासाठी सोडून मुख्य समाज मात्र तथाकथित विकासाचे फळे चाखण्यातच दंग झालेला दिसतो. जगभरातील १.६ अब्ज लोक जंगल परिसरात जीवन जगत आहेत. त्यांना आनेक अडचणींना सामोरे जावे लागते त्या अडचणीचा अभ्यास व्हावा यासाठी सदर संशोधन केले आहे.

'' विविध सामाजिक समस्यांची सोडवणूक कशी करावी, सामाजिक संबंध कसे असतात यांच्या अभ्यासाचे महत्व समाजशास्त्रज्ञांना संशोधनातून ध्यानात आले आहे. सामाजिक संशोधनामुळे केवळ ज्ञानांची भूक भागत नसून सामाजिक समस्या सोडविण्याचे महत्त्वाचे कार्य ते काही अंशी पार पाडतात.''[१] संशोधन केवळ सिध्दांत तयार करून ग्रंथालयात ठेवण्यासाठी नसावे तर त्यांच्या वापराने समस्याची सोडवणूक व्हावी. लोकांवर केलेल्या संशोधनाचा लोकांसाठीच उपयोग झाला तरच ते नैतिक संशोधन म्हणता येईल.

डिंभे धरण परिसरातील मच्छिमार परिवारांचा आर्थिक सामाजिक अभ्यास करताना उपजीविकेच्या विशेष पध्दतीचा अभ्यास निवडण्यामागे उपजीविकेतील असलेल्या समस्याचे मुख्य कारण आहे. भारतभर आदिवासींच्या जीवनपध्दतीचा संस्कृतीचा अभ्यास करताना कला, नृत्य, परंपरा,राहणीमान यांचे अभ्यास झाले आहेत. परंतु ''उपजीविका आणि आदिवासी समाज'' यांचे अभ्यास फार कमी आहेत. 'मोखाडा तालुक्यातील आदिवासीच्या स्थलांतराचा अभ्यास' प्रा. डॉ. जयवंत इंगळे यांनी करून उपजीविकाच्या समस्याला मुख्य समाजापुढे मांडण्याचे काम केले आहे.मंचर येथील 'शाश्वत' संस्थेच्या ट्रस्टी कुसुम कर्णिक आणि आनंद कपूर यांनी गेल्या ३० वर्षापासून लोकांच्या उपजीविकाचा प्रश्न हाताळला आहे.

---

१. डॉ. बोरुडे रा.र. - संशोधन पद्धतीशास्त्र, पुणे विद्यार्थी प्रकाशन, पुणे - २००८, पृ.- ६

संशोधक डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग यांनी सुरू केलेल्या युवांच्या ‘ निर्माण ’ या सामाजिक चळवळीतला असल्यामुळे आणि आदिवासी क्षेत्राचा संपर्क असल्यामुळे या विषयाकडे अध्ययनासाठी वळला आहे. आदिवासींच्या प्रमुख लक्षणाचा वेध घेतला तर त्यांच्या वैशिष्ठ्यामुळेच आदिवासीची आजची स्थिती आणि निर्मिती झाल्याचे लक्षात येते. ‘साधी अर्थव्यवस्था’ हे लक्षण आदिवासीनां दारिद्र्यचक्रात अडकवून ठेवण्यास कारणीभूत दिसते.

‘‘आदिम जमातीची साधी अर्थव्यवस्था हे एक महत्वपूर्ण वैशिष्ठ्य आहे. त्यांच्या निर्वाह- प्रधान अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट केवळ दैनंदिन गरजांची पूर्ती हेच असते. केवळ उपयोगापुरतेच उत्पादन एवढेच त्यांना ठाऊक असते. पण उपभोग्य वस्तूंचेही उत्पादन इतके अपुरे, की त्यांच्या गरजाही नीटपणे पुऱ्या होऊ शकत नाहीत. साहजिकच वस्तूंचा संचय व वस्तूंचा विनियम नसल्याने पैसा व बाजारपेठ यांचा अभाव त्यांच्या अर्थव्यवस्थेचे प्रमुख लक्षण बनले आहे.’’[२]

पुणे जिल्हयातील आंबेगाव तालुक्यातील पश्चिम भागातील अति दुर्गम आणि डोंगराळ प्रदेशातील डिंभे धरण परिसरातील आदिवसी मच्छिमार परिवारांचा आर्थिक सामाजिक अभ्यास करण्यासाठीचे क्षेत्र १२०० मिलीमीटरपेक्षा जास्त पाऊस पडणारे क्षेत्र आहे. एकूण भौगोलिक क्षेत्र १०४६५८.९१ हेक्टर पैकी वनाखालील क्षेत्र हे १९८४१ हेक्टर इतके आहे. या विभागात प्रामुख्याने आदिवासी जमातीचे लोक राहतात. संशोधक त्यापैकी ठाकर, कातकरी, महादेव कोळी या जमातीचे संशोधन करत आहे. त्यांच्या उपजीविकांची साधने कोणती आहेत, अडचणी काय आहेत यांचा अभ्यास करताना, इयान स्कुन (Ian Scoones) यांचे शाश्वत उपजीविका विश्लेषण या त्यांनी मांडलेल्या पंच भांडवल संकल्पना (Five Capital) वापरली आहे. रॉबर्ट चेंबर आणि गॉर्डन कॉनवे यांनी उपजीविकेचा केलेला अभ्यासही अभ्यासावा लागला.

डिंभे धरण परिसरातली मच्छिमार परिवारांच्या उपजीविकेचा विचार करताना त्यांच्या मुख्य गोष्टी किंवा साधनात शेती- गाळपेर शेती, पडकई शेती, भात शेती, हिरडा

---

२. डॉ. वडिखाये रेखा. - आदिवासी हलबांच्या अस्तित्वाचा अंतर्वेध, लाखे प्रकाशन, नागपूर, २८ सप्टेंबर २००९, पृ.१७

वेचणे, मासेमारी आणि वनउपज यांचा समावेश होतो. प्रस्तुत संशोधन अहवालात जंगल अधारित उपजीविका, शेती अधारित उपजीविका आणि मासेमारी अशा प्रकरणाच्या समावेश केला. आदिवासीच्या सामाजिक- आर्थिक परिस्थितीचा अभ्यासाबरोबरच एकूण उपजीविकेत मासेमारीचा किती हिस्सा आहे. मासेमारीचे एकूण सामर्थ्य किती आहे हे शोधण्याचा प्रयत्न केला. आणि आर्थिक- सामाजिक, राजकीय अडचणीचा विचार केला.देशातील मस्त्यउत्पादनात १९५०-५५ पध्ये असलेले उत्पादन ०.७५ लाख टनावरून ते ६.५० लाख टनापर्यंतची वाढ २००५-२००६ पर्यंत झाली इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ महाराष्ट्राच्या २००८-२००९ च्या आकडेवारीवरून दिसते आहे. त्यामुळे सागरी मासेमारीबरोबरच गोड्या पाण्यातील मासेमारीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. भारतातील आणि महाराष्ट्रातील अनेक धरणे, तळे आणि पर्यायाने जंगलातील लोकांच्या उपजीविक ाचे साधने असलेल्या या विभागाकडे संशोधक दृष्टीने अध्ययन होणे ही गरज आहे.

आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरण परिसरातील १४ गावामधील ८० कुटुंबाच्या अभ्यास हा प्रश्नावली, मुलाखती, चर्चा, अनुसूची, निरीक्षण वास्तव्य यांचा आधार घेऊन पुर्ण केला आहे. अभ्यास प्रामुख्याने कातकरी, ठाकर, महादेव कोळी यांच्या उपजीविका पध्दती, मासेमारी पध्दती या गोष्टींना मध्यवर्ती ठेऊन केला आहे. शेवटच्या प्रकरणात विश्लेषण केले आहे. उपाय आणि शिफारशी सुचवल्या आहेत तसेच नविन संशोधन विषय सुचले, समस्या दिसल्या त्या अधिक संशोधनासाठी दिल्या आहेत.

*****

## १.२ प्रकरण नियोजन

''संशोधनामुळे प्रश्न अथवा समस्येला उत्तर सापडते. संशोधन प्रक्रियेत झालेल्या विकासामुळेच गुंतागुंतीच्या समस्या सोडवणे शक्य होते. मानवाने संशोधनाचा उपयोग करुनच आजचा स्तर प्राप्त केला आहे.''[३]

कोणत्याही सामाजिक संशोधनामुळे समाजाच्या काही समस्या सुटल्यातरच ते संशोधन यशस्वी म्हणता येईल.

डिंभे धरण परिसरातील मच्छिमार परिवारांच्या उपजीविकेचा अभ्यास करण्यामागे तेथील ठाकर, कातकरी, महादेव कोळी यांच्या आर्थिक, सामाजिक स्थितीची कल्पना यावी आणि एकूण त्यांच्या क्षमता, उपजीविकेचे एकूण सामर्थ्य किती आहे ? हे उद्दिष्टये होते. हा संशोधन अहवाल संशोधनातील उद्दिष्टये गृहीते यानुसार तयार केला आहे.

उपजीविकेचा अभ्यास करण्यापूर्वी महाराष्ट्रात असे किती अभ्यास झाले आहेत? जगभर किती झाले आहेत ? याची पहाणी केली असता महाराष्ट्रात आदिवासींसोबत काम करणारे काही मोजके समाजसेवक स्वयंसेवी संस्था लेखक यांचा समावेश होतो. यामध्ये गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात आदिवासी सोबत काम करणारे डॉ. अभय आणि डॉ. राणी बंग, बाबा आमटे, प्रकाश आमटे, सनदी अधिकारी आणि लेखक डॉ. गोविंद गारे, मिलिंद बोकील यांच्याबरोबर मागील पिढीतील गोदावरी परुळेकर ठक्कर बाप्पा इ.चा समावेश होतो.

शाश्वत उपजीविकांचा शास्त्रीय अभ्यासक इयान स्कून (Ian scoones) रॉबर्ट चेंबर इ. शास्त्रांनी १९९२ नंतर या संकल्पनेचा अधिक विचार केला आहे.

आदिवासींना अनेक अडचणींचा सामना करत उपजीविका चालवावी लागते याचा अभ्यास संशोधनात केला आहे.

सदर संशोधनामध्ये विश्लेषणासह एकूण सहा प्रकरणाचा समावेश केला आहे. पहिल्या प्रकरणामध्ये अभ्यास विषय आणि क्षेत्र निवड, विषय निवडीचे महत्त्व, अदिम जमाती आणि उपजीविका, डिंभे धरण परिसरातील मच्छिमार कुटुंबाच्या उपजीविका

---

३. डॉ. कुऱ्हाडे बी.एम. : शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळपुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर, जुलै २००७, पृ.११

समस्या आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर शाश्वत उपजीविकाचा आग्रह धरणारे इयान स्कूनंचं पंच भांडवल विश्लेषण याची माहिती दिली आहे.

दुसऱ्या प्रकरणात संशोधन पद्धतीची माहिती दिली आहे. यामध्ये संदर्भ साहित्याचा आढावा, अभ्यासाचे महत्त्व सैद्धांतिक पार्श्वभूमी, उद्दिष्टे, गृहिते, क्षेत्र निवड, नमुना निवड यांची माहिती दिली आहे.

प्रकरण तीनमध्ये पुणे जिल्ह्याची भौगोलिक, सामाजिक आर्थिक महिती दिली आहे. तसेच पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्याची महिती याच प्रकरणात असून आंबेगाव तालुक्याची आर्थिक, सामाजिक, भौगोलिक महिती निसर्ग, जंगल यांचाही आढावा या प्रकरणात घेतला आहे.

प्रकरण चारमध्येच डिंभे धरण परिसरातील लोकजीवन यांचा विचार केला आहे. संशोधकाचे वास्तव्य चर्चा यावर अधारित माहिती, डिंभे परिसर, परिसरातील गावे यांची तपशीलवार माहिती या प्रकरणातून मिळते. शिवाय प्रमुख जमाती, महादेव कोळी, ठाकर, कातकरी यांची माहिती संदर्भासह दिली आहे. त्यांचे प्रमुख व्यवसाय भातशेती, गळपेरशेती, पडकई शेती, जंगल, मासेमारी, हिरडा गोळा करणे यांची सविस्तर माहिती आहे.

प्रकरण पाच, हे विश्लेषणाचे प्रमुख असून उपजीविकेचे विश्लेषण डिंभे धरण परिसरातील १४ गावामधील ८० कुटुंबाच्या प्रश्नावली, अनुसूची, मुलाखती चर्चा सहभाग या मिळाविलेल्या माहितीच्या आधारे केले आहे.

याशिवाय सहाव्या प्रकरणात निष्कर्ष काढले आहेत, काही सूचना/ शिफारशी दिल्या आहेत. यामध्ये विश्लेषणाच्या प्रकारानुसार उद्देश, गृहित यानुसार निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

जंगल परिसरात राहणाऱ्या आदिवासींच्या उपजीविकेचा अभ्यास करून अडचणी समजावून घेत विकास योजनांची आखणी करावी लागेल. त्यासाठी शाश्वत उपजीविका कशी असावी? समाजाचा विकास आणि पर्यावरणाचा विकास, परस्पर पुरक कसे राहतील? याचा विचार करण्यासाठी सदर संशोधन उपयोगी ठरावे.

## १.३ विषय निवडीचे महत्त्व

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्याची पूर्व-पश्चिम अशी विभागणी केली तर पश्चिमेला डोंगराळ भाग मुसळधार पाऊस यामुळे लोकवस्तीस, पिके घेण्यास प्रतिकूल भाग तर पूर्वभाग कमी पर्जन्याचा म्हणून दुष्काळी भाग अशा अस्थितीत लोकांना रहावे लागते. डिंभे धरण परिसरातीलल १९ गावामधून ९९% आदिवासी जातीचे वास्तव आहे. यात प्रामुख्याने महादेव कोळी, ठाकर, कातकरी यांचे प्राबल्य आहे. पूर्वीपासून महादेव कोळी, ठाकर यांच्या शेतजमीनी या भागात होत्या. अतिशय चांगली भातपीके या भागात होत होती. परंतु पुढे धरण बांधण्यासाठी १९७४-७५ मध्ये सरकारने लोकांकडून नाममात्र दराने जमिनी काढून घेतल्यामुळे लोंकाना डोंगर उतारावरील निष्कृष्ट जमिनीच्या अधाराने अंशत: विस्थापित जीवन जगावे लागले.

डिंभे धरण परिसरातील मच्छिमार कुटुंबाची उपजीविकाची साधने मुख्यत: डोंगरउताराची शेती (भात शेती), गाळपेरशेती (धरणातील शेती) हिरडा वेचणे, जंगलातील वनउपज गोळा करणे, मासेमारी ही आहेत. परंतु या सर्वांतून वर्षभर पुरणारे धान्य उत्पादन होत नाही. सदरील विषय निवडीमुळे स्थानिक उपजीविकेचा अभ्यास करता आला, अडचणी लक्षात आल्या तसेच उपजीविकेचे सामर्थ्यही लक्षात आले. योग्य उपाय योजना केल्या तर लोकांना जगायला पुरेसे अन्न उपलब्ध होऊ शकतेच पण अधिक उत्पन्नाची संधी साधून आर्थिकस्तर उंचावणे शक्य आहे असे दिसते.

मागील ३० वर्षापासून 'शाश्वत' संस्थेमार्फत आनंद कपूर आणि कुसूम कर्णिक यांनी आदिवासीच्या उपजीविकेच्या प्रश्नापासून अनेक समस्यांचा अभ्यास केला आहे. लोक संघटन उभे केले आहे. या संशोधनामुळे नवीन काही उपाय, मार्ग सुचले ते शाश्वत सारख्या स्वयंसेवी संस्था, शासन यांना विकास कामासाठी नियोजन करताना उपयोगी पडतील म्हणून विषय निवडीचे महत्त्व वाटते.

## १.४ डिंभे धरण परिसरातील आदिवासींच्या उपजीविकेच्या समस्या

१) डिंभे धरण परिसरातील लोकांना धरणाच्या कडेकडेने अंशत: विस्थापीत जीवन जगावे लागत आहे त्यात जमिनीची कमतरता आहे आठ महिने पुरेल एवढे उत्पन्न घेता येत नाही.म्हणून लोक मासेमारी, हिरडा गोळा करणे, वीटभट्टीवर काम करणे यासारखे पर्याय स्वीकारत आहेत. आदिवासी हे अज्ञानात दिवस कंठत असल्याने त्यांच्यासमोर अडचणींचा तर ढीग लागलेला असतो. त्यांच्या काही समस्यावर लक्ष टाकले तरी तेथील एकूण परिस्थिती कशी आहे याची कल्पना येते.

१) १९७७ च्या अधिपासून जमिनी काढून घेतल्यामुळे (धरणासाठी) मालकीच्या जमीनी फार कमी राहिल्या आहेत. त्यातून दगडधोंड्यातून कशीबशी खाचरं तयार करून भात शेती करत असतात.

२) डिंभे धरण परिसर आंबेगावच्या पश्चिमेकडील अतिपावसाचा प्रदेश डोंगराळ प्रदेश म्हणून ओळखला जातो त्याचा परिणामही लोकांच्या उपजीविकेवर पडतो.

३) उंच उंच डोंगरावर गावे वसलेली आहेत. होड्यातून प्रवास करावा लागतो.

४) धरणातील पाणी शेतीला वीज पुरवठ्याच्या अभावी घेता येत नाही.

५) अनेक गावातून हिरडा वेचला जातो, परंतु हिरडयाचया भावाच्या चढउताराचा फायदा व्यापाऱ्यांना अधिक होतो.

६) २००० मध्ये धरण पूर्ण भरले तेव्हा मासेमारीची संधी मोठ्याप्रमाणावर निर्माण झाली. परंतु प्रशिक्षण, होडी, जाळी कमतरता यामुळे अधिक क्षमता वापरली जात नाही. आदिवासींचा मासेमारीचा व्यवसाय हा पारंपारिक असूनही अजून त्याला पुरेसा वाव मिळाला नाही.

७) जंगलातून हाकलले जाण्याची सतत भीती आहे. बाहेरचे लोक विकासाच्या नावाखाली जंगले संपवतील अशी भिती ते बोलून दाखवतात.

८) स्वत:च्या वन उत्पादनाला भाव मिळत नाही.

९) गाळपेर जमिनीत लागवडीसाठी शासनाचे विविध नियम पाळावे लागतात. डिझेल इंजिन नाहीत त्यामुळे पाणी घेऊन शेती करता येत नाही. अशा अनेक समस्या सध्या या परिसरातील आदिवासींना भेडसावतात.

## १.५ आदिम जमाती आणि उपजीविका -

महाराष्ट्रातील आदिम जमाती ह्या मुख्यत्वे डोंगरदऱ्यातून राहातात त्यामुळे त्यांच्या उपजीविकासुध्दा याच भागातील निसर्गावर जंगलावर अवलंबून असल्याच्या दिसतात. परंपरेने ते त्याचाच उपयोग करुन जीवन जगताना दिसतात. आदिवासी अनादीकाळापासून मुख्य समाजातून लांब डोंगराच्या सान्निध्यात अनेक संकटांचा सामना करत राहणे पसंत करतात की, मुख्य समाजाने त्यांना हेतुपूर्वक दूर लोटले ? याचा विचार केला पाहिजे.

आदिवासी हे नैसर्गिक मुक्त जीवन जगणारे, नैसर्गिक मिळेल त्यावर गुजरण करणारे असल्याने त्यांच्या उपजीविकेत प्रामुख्याने जंगलातील वस्तू फळे, मध, औषधे, शिकार, मासेमारी यांचा समावेश असतो. थोडक्यात असे म्हणता येईल की, जगण्यासाठी जे जे आवश्यक असते ते ते निसर्गाकडून मिळवण्याचा कल आदिवासीमध्ये असतो. घरातील अन्न, घरासाठी लाकूड, घरावरचे छप्पर, जनावरांचा चारा, इंधन, शेतीचे अवजारे, शेतीच्या जमिनी यासर्व जंगलातून मिळवत असतात.

आदिवासी समाज या निसर्गाच्या सान्निध्यात राहून आपला निसर्गधर्म जोपासतो. निसर्गाचे ऋण मानतो त्याचीच पूजा करतो. ''निसर्गाची अनाकलनीय शक्ती व स्वरूप व निसर्गापासून मिळणारी उपजीविकेची साधने यामुळे आदिवासीला आश्चर्ययुक्त भीती व आदर वाटणे साहजिक होते. परंतु जंगली प्राणीसुध्दा जथ्याने राहत असतात, आपआपल्या जथ्यात ते एकमेकांवर वर्चस्व गाजवत नाहीत, ते त्याने पाहिले. निसर्गातील जीवसृष्टी व पर्यावरण यातून तो समन्वय, सह-अस्तित्व, सामुदायिकता व समता शिकला. ते त्यांच्या अंगवळणी पडले. तो त्यांचा धर्म बनला.''[४]

आदिवासी आपल्या अपली उपजीविका निसर्गापासून चालवत असला तरी कधीही त्याने निसर्गाचे शोषण केले नाही. कधीही निसर्ग ओरबडला नाही उलट निसर्गाच्या रक्षणासाठी सदैव जागृत राहिला. अनेक आदिवासी जमातीमध्ये काही झाडांना देव मानतात. त्यांना हातही लावत नाहीत. आपल्या अवतीभोवतीचे प्राणी यामुळे आपल्याला इजा होऊ नये म्हणून वाघोबा, नागोबा यांचीही पूजा करतात त्यांना ठार मारणे पाप समजतात आणि खऱ्या अर्थाने ते शाश्वत उपजीविका टिकवण्यासाठी मोलाचा वाटा उचलतात.

---

ॲड. मोरे माधव बंधू : आदिवासी बोलू लागला, सुगावा प्रकाशन

## १.६ इयान स्कूनचं (Ian Scoones) ग्रामीण शाश्वत उपजीविका - विश्लेषणचे महत्त्व :

ग्रामीण शाश्वत उपजीविका ही संकल्पना सध्या ग्रामीण विकासाच्या संबंधात खूप महत्त्वाची मानली जात आहे. दारिद्रय निर्मूलन आणि पर्यावरण व्यवस्थापन याकामी अधिक महत्त्व असलेली संकल्पना आहे. इयान स्कूननं आपल्या छोट्याशा प्रबंधातून शाश्वत उपजीविका म्हणजे काय आणि ते कशी साध्य करायची त्यासाठी कुठल्या गोष्टींचा विचार केला पाहिजे म्हणजे आपला विकास शाश्वत असेल यासाठीचा विचार मांडला आहे.

त्यामध्ये त्याने उपजीविकाच्या निती कशा असतात यासाठी काही मुद्दे मांडले म्हणजे-

शेतीत अधिक उत्पन्न घेणे २) अधिक उत्पन्न मिळवण्यासाठी नवीन जमीन लागवडीखाली आणणे ३) नवीन उपजीविका शोधणे किंवा स्थलांतर करणे यासारख्या मार्गाने उपजीविका चालवणे.

उपजीविकेची स्त्रोत कोणते असतात. तर त्यासाठी पाच भांडवलाची संकल्पना मांडली ते पाच भांडवल म्हणजे -

१) **भौतिक भांडवल** - रस्ते, वाहतूक व्यवस्था, पाणी पुरवठा, उर्जा पुरवठा, घरे शौचायले, आरोग्य व्यवस्था, शेती अवजारे, यंत्रे, जनावरे, शासन-समाजाचे संबंध कसे आहेत. यावर उपजीविका स्थिती ठरते.

२) **नैसर्गिक भांडवल** - नैसर्गिक संसाधनाचे साठे, (जमीन, पाणी पुरवठा, हवा इ.) गावाची पाणी सिंचन व्यवस्था, जमिनीची गुणवत्ता, पाण्याचे उगम स्त्रोत, जंगल इ.

३) **वित्तीय भांडवल** - उत्पन्नाचे स्त्रोत (शेती, शेतीवर आधारीत रोजगार व इतर रोजगार) जनावरांपासूनचे उत्पन्न, व्यवसाय, बचत (बँक, दागिने, बचतगट) बँकेतील रक्कम, रोख रक्कम विमा, इतर सेवा, प्रशिक्षण कौशल्य उधार मूलभूत सोईसुविधा तंत्रज्ञान इ.

४) **मानवी भांडवल** - विशेष ज्ञान, कौशल्य, योग्यता शारीरिक आरोग्य, कार्यक्षमता, शासनांच्या योजनांची माहिती धोरणे, कामगार इ.

५)    **सामाजिक भांडवल** - सामाजिक संसाधने, स्त्रोत (सामाजिक लेखा, लोकांच्या संघटनांचे जाळे, नातेवाईक शेजारी, यांच्याबरोबरचे संबंध सामाजिक, संबंध हक्क, दावे यांच्या विषयी लोकांतील जागृती, सामाजिक भांडवलात येते.

याशिवाय त्याने आपल्या प्रबंधात शासकीय संस्था संघटना, स्वयंसेवी संस्थाचा काय परिणाम लोकांच्या उपजीविकेवर पडतो? कोणत्या गरजा/मदत या संस्थाकडून लोकांना हवी याविषयी विश्लेषण महत्त्वाचे ठरते असे सुचविले.

या फ्रेमवर्कचा वापर केल्याने काय फायदे होतील यासाठी त्याने खालील गोष्टींचे विवेचन केले -

१.   दारिद्रय निर्मूलन

२.   जीवनमान उंचावणे, कार्यक्षमता वाढणे

३.   उपजीविकेतील ताण कमी होऊन सहज मिळवता येईल

४.   नैसर्गिक स्त्रोतावर अधारित शाश्वत उपजीविका टिकवणे.[५]

वरील पंच भांडवल संकल्पनेचा वापर करुन डिंभे धरण परिसरातील मच्छिमार परिवारातील सामाजिक-आर्थिक अभ्यासाबरोबरच तेथील उपजीविकेची सद्यस्थिती काय आहे? कोणत्या अडचणी जाणवतात उपजीविकेत राजकीय, सामाजिक, आर्थिक अडचणी आहेत का ? यासाठी मानवी भांडवल, सामाजिक भांडवल, भौतिक भांडवल, आर्थिक भांडवल आणि नैसर्गिक भांडवल या आधारावर प्रश्नावलीत अनुसूचित प्रश्न विचारले त्यावरुन या पाच भांडवलाचे विश्लेषण केले आहे. लोकांचा विकास व्हावा आणि पर्यावरणाचाही विकास व्हावा यादृष्टीने **Ian Scoones** चं विश्लेषण अधिक महत्त्वाचे आहे.

****

5. Scoones Ian : Sustainable Rural Livelihoods, : A framwork for analysis, IDS working paper 72 (1998) Institute of Development studies, sussex UK. Page - 6 to 7.

## १.७ अभ्यासविषय आणि क्षेत्र निवड

भारतात स्वातंत्र्य मिळून सहा दशकं उलटून गेली तरी अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण इ. सर्वसामान्य सेवा, गरजा पूर्ण करण्यासाठी माणसाला जीवाचा आटापीटा करावा लागत आहे. १९९१ साली भारतात उदारीकरण सुरू झाले त्याचे अनेक फायदे झाले. परंतु नुकसानही प्रचंड झाले. झालेली प्रगती सर्वांपर्यंत पोहचली का? गरीब श्रीमंत दरी कमी झाली का? हा खरा प्रश्न आहे. दारिद्रयाची अनेक कारणे आहेत परंतु मुख्य कारण कमी आर्थिक विकास हे आहे. भारतासारख्या विकसनशील देशात प्रादेशिक विकासात अनेक अडचणी येतात. आदिवासी बहुसंख्य असणारे विभाग हे नेहमी उपेक्षीत राहिलेले दिसतात. 'जंगलाचे राजे' म्हणवणारे आदिवासी हे अल्प उत्पन्नात, प्रसंगी उपाशी राहून जीवन जगताना दिसतात आणि भारत महासत्तेच्या उंबरठ्यावर असल्याच्या बातम्या सर्वच माध्यमे देत आहेत. हे विरोधभासाचे आहे म्हणून संशोधकाने जाणीवपूर्वक विषय निवडून विश्लेषण केले आहे. या संशोधनामुळे शासनासमोर आणि राज्यकर्त्यासमोर खरी परिस्थिती काय आहे? हे दाखवणे आणि आदिवासी विभागांकडे विकासाचा ओघ वळावा यासाठी संशोधन करण्याची प्रेरणा मिळाली.

प्रस्तुत संशोधक डॉ. अभय बंग आणि 'सर्च'[६] (SEARCH) या संस्थेने सुरू केलेल्या युवांच्या ''निर्माण'' या सामाजिक चळवळीतला असल्यामुळे अभ्यासाच्या आणि क्षेत्रभेटीच्या निमित्ताने 'शाश्वत' या स्वंयसेवी संस्थेच्या माध्यमातून आदिवासींच्या सानिध्यात वास्तव्य करून तेथील आदिवासींच्या उपजीविका, जीवनपध्दती, मानवी नातेसंबंध, पर्यावरण इ. चे अध्ययन, निरीक्षण करता आले. तेथील लोकांच्या अडचणी समस्या क्षमता यांचे ज्ञान झाले अपुरे शेतीउत्पन्न, आर्थिक- सामाजिक प्रश्न, मासेमारीच्या समस्या, भविष्यातील संकटे यांची जाणीव संशोधकास झाली होती.

संशोधनासाठी डिंभा धरण परिसरातीलच १४ गावे निवडण्याचे कारण म्हणजे या भागातील आदिवासीचे प्रमाण जास्त आहे. आणि या भागात मागील ३० वर्षापेक्षा जास्त काळ 'शाश्वत'[७] संस्थेमार्फत आदिवासी प्रश्नावर काम करणारे आनंद कपूर आणि कुसुम कर्णिक यांचे मार्गदर्शन आणि विश्वसनीय संदर्भ मिळताल म्हणून या गावांची निवड केली.

६. स्वयंसेवी संस्था, गडचिरोली. संस्थापक डॉ. अभय बंग आणि राणी बंग

७. डिंभे भीमाशंकर परिसरातील आदिवासींसोबत काम करणारी स्वयंसेवी संस्था.मंचर

महाराष्ट्रात सह्याद्रीपासून सातपुड्यांच्या डोंगररांगापर्यंत आणि आग्नेयेस महादेव डोंगररांगातून अतिशय कठिण दऱ्याखोऱ्यातून आदिवासी राहातात. उन्हाळा, पावसाळा, थंडी, वादळे, धुके अशा अनेक अडचणींचा सामना करत अतिशय नापीक निकृष्ट जमिनीच्या तुकड्यांवर भात, नागली, वरी, सावा अशी पीके घेवून आपली पोटाची खळगी भरण्यात आदिवासी वर्षेन्वर्षे गुंतला आहे. अनेक नैसर्गिक आपत्तीमुळे या भागात विकास कसा पोहचणार? या भागात विकासात अडचण निर्माण होतात. आदिवासी दारिद्रयात जीवन कंठत नशीबाला दोष देण्यापलिकडे काही करु शकत नाही.

संशोधकाने ''डिंभे धरण परिसरातील मच्छिमार परिवारांचा आर्थिक-सामाजिक अभ्यास उपजीविकेच्या पद्धतीचा विशेष अभ्यास'' या विषयाचे अध्ययन करण्यामागे आदिवासींच्या जीवनाचे, उपजीविकेचे प्रश्न समजावून घेणे ही प्रेरणा होती. आदिवासी अनादी काळापासून आपल्या पोटाच्या खळगी भरण्यासाठी , उपजीविका चालविण्यासाठी राब राब राबत आहे, प्रचंड कष्ट उपसत आहे आणि तरीही वर्षभर पुरेसे अन्न नाही, अंगावर नीट कपडा नाही, शिक्षणाची दुर्दशा झालेली. यामगच्या समस्या कुठल्या असाव्यात? त्या कशा मोजता येतील? त्यांची तीव्रता शासनाला, सुशिक्षित समाजाला समजली पाहिजे. आदिवासीच्या मूलभूत गरजा भागवणारा विकास कसा होऊ शकेल का? याच विचाराने संशोधकाने सदरचा संशोधन विषय निवडला.

## १.८ संशोधन क्षेत्राची भौगोलिक माहिती -

### १.८.१ संशोधन क्षेत्र (Study Site)

डिंभे धरण परिसरातील धरणाच्या कडेकडेने अंशत: १४ गावे संशोधनासाठी निवडली. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम डोंगराळ भागात दिंभा धरण आहे. हे क्षेत्र संशोधनासाठी निवडण्याचे कारण म्हणजे संशोधक या भागाशी परिचित आहे. शिवाय या भागात काम करत असलेल्या शाश्वत संस्थेचे मार्गदर्शन मिळाले.

**<u>संशोधन क्षेत्राचे स्थान आणि हवामान स्थिती</u>**

**स्थान** (Location) - पुणे जिल्ह्याच्या उत्तरेला आंबेगाव तालुका आहे, तालुक्याच्या पश्चिम भागात डिंभे धरण आहे. तालुक्याच्या पूर्वेस शिरूर तालुका, पश्चिमेस ठाणे जिल्हा, दक्षिणेस खेड तालुका, उत्तरेस जुन्नर तालुका असुन आंबेगाव तालुक्याचे क्षेत्रफळ ४०१५ चौरस किलोमीटर आहे. तालुक्याच्या अक्षवृत्तीय विस्तार १८° १३'' ४५' ते १८° ५१'' १०' उतार असुन रेखावृत्तीय विस्तार ७३० ३०'' ४०' ते ७४° १०'' ५' पूर्ण दरम्यान पसरलेला आहे[८].

अहुपे हे तालुक्यातील सर्वात उंचीवरचे गाव असून त्याची समुद्र सपाटीपासूनची उंची २७०० फूट आहे

तालुक्याचे महत्व- भारतातील १२ ज्योर्तिलिंगापैकी पवित्र क्षेत्र श्री भिमाशंकर हे खेड आणि आंबेगावच्या सीमेवर पसरलेले आहे. आंबेगाव तालुक्यातून वाहणाऱ्या घोडनदीवर डिंभे हे धरण उभारले आहे. आंबेगाव तालुक्यास निसर्गाचे वरदान लाभले आहे. अनेक पशुपक्षी औषधी वनस्पती येथे आढळतात. भिमाशंकर अभयारण्यात 'शेखरू'[९] ही उडती खार ( दुर्मिळ प्रजाती ) याच तालुक्यात आढळतो.

[९] **'शेखरू'**- Indian Giant Sguirrel (भीमाशंकर)

---

८. प्रा. उगले विलास, डॉ. ससर्षी प्रविण : लेख आदिवासी संशोधन पत्रिका मार्च २००७, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र शासन, पुणे, पृ.४१

९. Indian Giant Sguirrel (भीमाशंकर)

**नैसर्गिक पर्यावरण (Natural Environment)**- सहयाद्रीच्या घाटमाथ्यावर आंबेगाव तालुका आहे. आंबेगाव तालुक्यास निसर्गाचे वरदान लाभले आहे. डोंगरी भागात उगवणारी अनेक झाडे, वेली, फुले, रानवृक्ष या भागात आहेत. या तालुक्यातील जंगल राखीव ठेवले आहे. जंगलाखालील क्षेत्र ६२ चौरस मैल आहे. या भगातून घोंड नदी वाहते. पुढे तीला भीमा नदी मिळते. अशा रीतीने सह्याद्रीवर पडणारा पाऊस घोडनदीद्वारे आंबेगाव तालुक्यास येऊन मिळतो.

भौगौलिक स्थिती- भौगौलिक पार्श्वभूमीचा विचार केला तर ह्या भागातील सरासरी उंची १००० ते १२०० मीटरच्या दरम्यान आहे. घोड प्रमुख नदी असुन तिला बुब्रा व नंदा या दोन उपनद्या मिळतात. महसुली गावांची संख्या १३८ आहे. तालुक्यातील एकूण लागवडी खालील क्षेत्र १७२९४ हेक्टर आहे.

१.८.२ **हवामान- (Climate)** - आंबेगाव तालुक्याचे सरासरी तापमान ३२ सें ग्रे ते २७ सें ग्रे इतके आढळते. मान्सून प्रकारचे हवामान आहे. ८०० मीलीमीटर पेक्षा जास्त पाऊस पडतो. तीन ऋतु अनुभवायास येतात. उन्हाळा ( फेब्रुवारी ते जून) पावसाळा ( जून ते ऑक्टोंबर ) हिवाळा ( ऑक्टोबर ते फेब्रुवारी)

### १.८.३ डिंभा धरण -

* डिंभे धरणाचे एकूण क्षेत्रफळ हेक्टर- १२८०
* डिंभे धरण पाणी साठवणुक क्षमता- १३.७५ टी. एम. सी.
* उपयुक्त पाणीसाठा - १२.७५ टी. एम. सी.
* मृत पाणी साठा - १.०० टी. एम. सी.
* दिनांक २५/५/२०१० अखेर डिंभे धरणातील शिल्लक पाणी साठा १.६१ टी. एम. सी.
* डिंभे धरण डाव्या कालव्यातील सिंचन क्षेत्र- २१२४ हेक्टर
* डिंभे धरण उजव्या कालव्यातील सिंचन क्षेत्र- ८६६१ हेक्टर [१०]

१०. पंचायत समिती आंबेगाव, जिल्हा पुणे, कृषि विभाग, खरीप हंगाम, २०१०-११ नियोजन व आढावा सभा दि.२६.५.२०१०, वृत्तांत, पृ.२

# अभ्यास आणि संशोधन पध्दती

## २.१ पूर्व संदर्भ साहित्याचा आढावा

हा संशोधन अहवाल तयार करण्यापूर्वी अदिवासींच्या जीवनपध्दतीवर उपजीविकेवर अत्तापर्यंत देशातंर्गत  तसेच जागतिक पातळीवर काय अध्ययन झाले,राज्यपातळीवरती आणि स्थानिक संशोधन क्षेत्रात काही संशोधन झाले का? याचा विचार करुन मर्यादित वेळेत मर्यादित संशोधन साहित्याचा आढावा घेतला.

संशोधन  हे उपजीविकेशी संबधीत असल्यामुळे जागतिक पातळीवर आजीविकेचे काय अध्ययन आहेत हे पाहताना इयान स्कुन (Ian Scoones) यांचे ग्रामीण शाश्वत उपजीविकेचे विश्लेषण फ्रेमवर्क हा प्रबंध ‘शाश्वत उपजीविका’ ह्या अतिशय महत्त्वाची संकल्पनेचा विचार मांडतो.[११]

इयान स्कूनच्या मते “ लोकांच्या उपजीविका आणि विकासाचा विचार करताना ‘शाश्वत उपजीविका’ ही अतिशय महत्त्वाची संकल्पना आहे”

इयान स्कूनने शाश्वत उपजीविका साध्य करण्यासाठी पाच घटकांची (Five Capital) मांडणी केली ज्याद्वारे पर्यावरण समाज नैसर्गिक साधन स्त्रोत (Resources) यांची कमीत कमी हानी करून किंवा त्यांचे पुर्णभरण करत विकास कसा करता येईल? यासाठी लोकांनी पाच प्रकारच्या भांडवलांचा वापर करावा असे सुचवतो. ते भांडवल म्हणजे १.नैसर्गिक भांडवल २. आर्थिक भांडवल ३. मानवी भांडवल ४. सामाजिक भांडवल ५. भौतिक भांडवल.

या भांडवलात अधिक वाढ करुन शाश्वत विकास साध्य करता येतो असे हे सुचवते. (संदर्भ Ian Scoones -  IDS workig paper 72)

11. Scoones Ian : Sustainable Rural Livelihoods, : A framwork for analysis, IDS working paper 72 (1998) Institute of Development studies, sussex UK. Page - 3.

दुसरा अभ्यास रॉबर्ट चेंबर आणि गॉर्डन कॉनवे ( Robert Chamber and Gordon R. Conway ) यांनी १९९१-९२ मध्ये केला आहे. (Sustainable rural livelihood : practical concepts for the 21st century)या प्रबंधात केलेल्या मांडणीनुसार लोक त्यांच्या क्षमतेचा कसा वापर करतात? ते कोणत्या उपजीविकेत गुंतलेले असतात? त्यासाठी ते कोणती साधने (Resources) वापरतात? आणि त्यांचे फायदे आणि भविष्यातील परिणाम काय होतात याचा विचार केला. त्यासाठी त्यांनी दोन प्रकारच्या मालमत्तेचा विचार केला. १) दृष्य मालमत्ता (Tangible assets) यात साधनसंपत्तीचे स्त्रोत, साठे यांचा विचार केला तर (Intangible assets) अदृष्य मालमत्तेत हक्क, दावे, अधिकार यांचा विचार केला.

## २.१.१ इयान स्कूनचं (Ian Scoones) शाश्वत उपजीविका विश्लेषण फ्रेमवर्क

इयान स्कून (Ian Scoones) यांनी १९९७ मध्ये शाश्वत उपजीविकेचे विश्लेषण करण्यासाठी पाच घटक वापरले ते वापरुन शाश्वत उपजिविका कशी साध्य करता येईल याचे विश्लेषण त्यांनी Five Capital पाच भांडवले वापरली याचे विश्लेषण त्यांचा प्रबंधमध्ये केले आहे.[१२]

१) **नैसर्गिक भांडवल**(Natural Capital) - नैसर्गिक संसाधनाचे साठे, (जमिन, पाणी, हवा इ.) गावाचे पाणीसाठा सिंचन व्यवस्था, जमिनीची गुणवत्ता, पाण्याचे उगम स्त्रोत, जंगल इ.

२) **वित्तीय भांडवल** (Financial Capital)- उत्पन्नाचे स्त्रोत, (शेती, शेतीवर आधारित रोजगार, इतर रोजगार, जंगल आधारीत नसलेले उत्पन्ने, जनावरं पासूनचे उत्पन्न, इतर व्यवसाय) बचत (बँका, दागिने, बचतगट), विमा, रोख रक्कम बँकेतील रक्कम) इतर सेवा प्रशिक्षण, आरोग्य सुविधा कौशल्य स्थलांतरापासूनचे उत्पन्न, उधार, मूलभूत सोयी तंत्रज्ञान.

12. Scoones Ian : Sustainable Rural Livelihoods, : A framwork for analysis, IDS working paper 72 (1998) Institute of Development studies, sussex UK. Page -4-8

३) **भौतिक भांडवल** (Physical Capital) - रस्ते, वाहतूक व्यवस्था, पाणी पुरवठा, उर्जा आणि वीजपुरवठा, घरे-शोचालयाची स्थिती, शेती अवजारे, यंत्रे जनावरे शासन, सामाजाचे संबंध.

४) **मानवी भांडवल** (Human Capital)- विशेष ज्ञान, कौशल्य, योग्यता, उत्तम आरोग्य, शारिरिक कार्यक्षमता शासनाच्या धोरणांची नियमांची माहिती इ.

५) **सामाजिक भांडवल** (Social Capital) - सामाजिक सलोखा, नातेवाईक शेजारी यांच्याबरोबरचे संबंध, कामगारांचे संघटन सामाजीक संस्था, सण, उत्सवातील सहभाग, मंडळे, राजकिय संघटना इ.

## २.१.२ शाश्वत उपजीविका : रॉबर्ट चेंबर, कॉनवे यांची संकल्पना

१९७० पुर्वी जगभर विकासाच्या ज्या पारंपारीक संकल्पना होत्या त्यामध्ये विकासाचे ध्येय आणि ते साध्य करण्याचे मार्ग यामध्ये दरी राहून खरा विकास म्हणजे काय? तो कसा असावा? याचे चित्र फारशे स्पष्ट होत नव्हते. १९७०-८० मध्ये आणि विकासाचे ध्येय आणि तो साध्य करण्याचा मार्ग यातील तफावत दूर करण्यासाठी नविन विचार संकल्पना मुळ धरू लागल्या.

नवीन संकल्पना विचार मांडू पाहाणाऱ्यामध्ये इंग्लंडमधील रॉबर्ट चेंबर व गॉर्डन आर, कॉनवे (संदर्भ - Robert Chambers and Gordon R. Conway) यांनी १९९२ मध्ये 'शाश्वत उपजीविका' (Sustainable rural livelihoods) याद्वारे विकास केला जाऊ शकतो हि संकल्पना मांडली. [१३]

13.Chambers R and Gorden R Conway (1992) sustainable Rural livelihoods : Practical concepts for twenty first century. IDS discussion paper 296, Brighton IDS, page No. 2-11

## रॉबर्ट चेंबरच्या मते-

### * बदल आणि अनिश्चितता

भविष्यात मानवी जीवनातील बदल खुप वेगाने होणार आहेत तसेच ते सातत्याने घडणार आहेत. याचे कारण मानवी इच्छात होणारी वाढ आणि प्रंचड वेगाने होणारी तांत्रिक प्रगती. त्यामुळे भविष्यातील स्थिती अधिक कठिण असणार आहे. भविष्यात जगाच्या लोकसंख्याचा वाढीचा दर अधिक असणार आहे. शहरातील लोकसंख्या जवळपास सगळीकडे २ कोटीपेक्षा अधिक असणार आहे. त्यामुळे या सर्वांचा ताण शहरी व ग्रामिण विकासावर निश्चित होणार आहे. शहरातील स्थलांतराचे आणि ग्रामिण भागातील उपजीविका स्त्रोत वापराचे परिणाम खूप वाईट असतील. यातून ग्रामिण भागात चांगले जीवनमान जगणाऱ्यांचे प्रमाण कमी होऊन शाश्वत उपजीविका नष्ट होईल. म्हणून नविन निति आखून उपजीविका स्त्रोतांची जपणूक केली पाहिजे कारण कमी उत्पन्न गटातील देशांमध्ये उपजीविका स्त्रोतांचा (Resources) अधिक अशाश्वत वापर केला आहे. तो टिकवणे काळाची गरज आहे.

### विकास विश्लेषणाचे पारंपारिक दृष्टीकोन

रॉबर्ट चेंबरच्या मते विखासाकडे पाहण्याचे तीन पारंपारिक निकष आहेत.

१) उत्पादनाचा विचार- Production thinking

२) रोजगार -Employment thinking

३) दारिद्र्य रेषा- Poverty ling thinking

१) **उत्पादन विचार** - पारंपारिक विचार सांगतात जगात गरीबी आहे. दारिद्र्य आहे. कारण 'भूक' आहे. भूकेचा प्रश्न दिसतो म्हणून उत्पन्न वाढवा. लोकांना पुरेसे अन्न मिळेल असे पहा, परंतू रॉबर्टच्या मते उत्पन्न वाढवा परंतू ते कसे वाढवा! त्याचे वितरण कसे पाहिजे. उत्पन्न वाढवत असताना संसाधनाची हानी होते का? याचा विचार केला जात नाही.

२)  **रोजगार विचार** - पारंपारिक विचारानुसार विकास होण्यासाठी रोजगार वाढला पाहिजे. रोजगार नसेल तर गरीबी आहे असा संबंध मांडला जातो परंतू ग्रामिण भागात लोक वेगवेगळे कामे करत उपसतातच म्हणून विकासाचा हा निकष अपूरा आहे असे चेंबर म्हणतात.

३)  **दारिद्रयरेषेचा विचार** - पारंपारीक विचारानुसार विकास मोजण्याचे निकष म्हणजे दारीद्रयरेषा ठरवा. दारिद्रयरेषेच्या वर आले की विकास झाला असे मानले जाते. परंतु हे निकष दारिद्ररेषा ठरवली गेली ती कशी ठरले गेली यासाठी खरी स्थिती नजरेत येत नाही. चेंबरच्या मते विकास मोजण्यासाठी ह्या तीनही गोष्टी अपुऱ्या आहेत. त्यासाठी स्थानिक संसाधने, सामाजिक स्थिती, उपजीवीकाच्या पध्दती, यांची जपणूक झाली पाहिजे. त्या वाढल्या पाहिजेत, यासाठी ''शाश्वत विकास'' कसा असावा यासाठी चेंबरने तीन संकल्पना मांडल्या.

१)  कार्यक्षमता - Capability

२)  समता - Eguity

३)  शाश्वतता - Sustainability

चेंबरच्या मते या तीन्ही संकल्पनामध्ये काहीएक धागा आहे. परंतु त्या एकमेकांना पूरक असतील अवलंबून असतीलच असे नाही. त्या विकासाचे साधन आहेत आणि साध्य सुध्दा आहेत.

या तीन्हीचा वापर करुन 'शाश्वत' विकास कसा होईल याचा विचार केला पाहिजे.

१)  **कार्यक्षमता** (Capability) - चेंबरच्यामते हि शब्दरचना विकासाच्या बाबतीत प्रथम अमर्त्यसेन यांनी १९८४, १९८७ मध्ये वापरली. जगण्यासाठी जे काही करावे लागते त्याचे ताण, धोके यातून तरुन निघणे, बदलाना अनुसरुन जीवन जगणे म्हणजे लोकांच्या कार्यक्षमता. या कार्यक्षमता परिस्थितीनुसार बदलतात.

संसाधने (Resources) सहज वापरण्याच्या क्षमता, माहिती सेवाचा वापर, दूरदृष्टी, नविन प्रयोग करता येणे, स्पर्धा करता येणे, आपले विचार इतरांसमोर मांडता येणे ह्या सुध्दा कार्यक्षमता आहेत.

२) **समता** (Eguity) - याठिकाणी आर्थिक समानता संपतीचे वितरण यापेक्षा खूप व्यापक संकल्पना आहे. लोकांना त्यांच्या संसाधने वापरण्याची संधीची समता, माहिती मिळवण्याची समता, उपजीवीका निवडण्याची समता अभिप्रेत आहे. लोकांना त्यांच्या क्षमता वापरण्याची आणि वाढवण्याच्या समता असली पाहिजे.

३) **शाश्वतता** (Sustainabilit̤)- आपली उपजीविका मिळवताना तीचे पर्यावरणावर समाजावर संसाधनावर काय परीणाम होतील? याचा विचार आधि करणे म्हणजे शाश्वत विकासाचा विचार करणे. स्थानिक पातळीवर आणि जागतीक पातळीवर संसाधनाचा वापर करून त्याची हानी न करता वाढ झाली पाहिजे म्हणजेच शाश्वत विकास. त्यामुळे आत्मनिर्भय होता येईल अडचणीचा संकटांचा सामना करता येईल यासाठी या तिन्ही गोष्टीचा विचार करुन त्या एकमेकांना कशा पूरक ठरतील हे पाहिले पाहिजे.

✻ **उपजीविका** – कार्यक्षमता, समता, शाश्वतता ह्या सर्व संकल्पनेचा समावेश असलेली संकल्पना शाश्वत उपजीविका; एक एकात्मिक संकल्पना आहे. ''जीवनासाठी जे जे पाहिजे ते म्हणजे उपजीविका अशी उपजीवीकेची सोपी व्याख्या करता येई'' असे चेंबर म्हणतात.

**उपजीविका कशी ठरते?**

काही लोकांना उपजीविका हि जन्माने मिळते. उदा. सुतारकाम, कुंभारकाम इ. तशीच ती स्त्री-पुरूष, जातीनुसारही ठरत असते.

नवीन पिढीला उपजीविकेत वाढ करण्याची, बदलण्याची स्वातंत्र असते. उपजिवीकाची प्रेरणा सुधारण्याची इच्छाशक्ती यामुळे उपजीविका निवड ठरते.

माणसांच्या उपजीविकाचे स्वरुप - उपजीविकेचा विचार करताना विश्लेषण करताना वैयक्तीक पातळीवर किंवा कुटूंबे किंवा जेथे एका चुलीवर स्वयंपाक करणारे जेवढे सदस्य असतील त्यांचे संपूर्ण घरदार, खटले (Household) यांचा विचार केला जाऊ शकतो.

* **शाश्वतता** (Sustainability)

शाश्वतता दोन प्रकारच्या आहेत असे चेंबर मांडतो.

१) **पर्यावरणीय शाश्वतता** - स्थानिक पातळीवरील संसाधने (Resources) काटकसरीने वापरुन त्याचे पुर्णभरण झाले पाहिजे ते स्त्रोतांचा वापर योग्य झाला पाहिजे वाढला पाहिजे. ते नष्ट झाले तर पुढील पिढीला नुकसान सहन करावे लागू नये म्हणून हवा, पाणी, माती यांचे प्रदुषण कमी करणारी उलट पर्यावरणाला पोषक असणारी उत्पादकता वाढवणारी उपजीविकेचा विचार झाला पाहिजे. जागतीक पातळीतील स्त्रोतांचे सुध्दा रक्षण होण्यासाठी स्थानिक पातळीवर विचार व्हावा. ज्यामुळे प्रदूषण, ग्लोबल वॉर्मींग, ग्रीन हाऊस इफेक्ट कमी करण्यासाठी मदत होईल.

व्यापारी धोरणे, नीती मालकी यांचाही शाश्वत उपजीविकेवर सकारत्मक नकारात्मक परिणाम होतात.

२) **सामाजिक शाश्वतता** - वैयक्तिक लोक, कुटुंबे, (Household) खटले, यांच्यावर नकारत्मक, सकारात्मक परिणाम होतात. नकारात्मक परिणामाला लोक संकटे,

तणाव मधून तग धरण्यासाठी काहि कृती करतात. तर सकारात्मक परिणाम म्हणून ते बदल संकटांशी जुळवून घेतात क्षमता वाढवतात.

*** अनपेक्षित धक्के आणि ताण-**

अनिश्चीत धोके, ताण तणाव यांच्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक प्रमान, कुटुंबे, समाज सर्व प्रयत्न करतात.

* ताण (Stress) - हे विशिष्ठ काळाने सातत्याने येणारे असतात. त्यांचा अंदाज करता येतो. उदा. रोजगार नष्ट होणे, उत्पन्न कमी होणे, पीक नष्ट होणे, मातीची धूप होणे, जमिन खारवणे, सामाईक मालमत्तेचे स्त्रोत नष्ट होणे, पाऊस कमी होणे, इंधनासाठी लाकूड फाटा, गवत आणण्यासाठी दूर जावे लागणे, गावाचा पाणीसाठा कमी होणे यासारख्या ताणाचा अंदाज करता येतो म्हणून याची पर्यायी व्यवस्था करता येते. परंतु अंदाज न करता येणारे संकटे (Shocks) म्हणजे पूर, दुष्काळ, रोगराई, दंगली, युध्द, वादळे, आग, पीककिड, प्राण्यांचे माणसाचे आजार-अपघात यामुळे आकस्मीक हानी होते. उपजीवीकेवर याचा फार मोठा परिणाम होतो.

यासाठी माणसांना कुटुंबांना या ताण तणाव संकटांचा सामना करण्यासाठी काही डावपेच, योजना वापराव्या लागतात.

१) **वापर मी करणे** (Stint) - उपभोग कमी करणे निकृष्ठ दर्जाच्या अन्नाची निवड करणे.

२) **साठा करणे** (Hoard) - अन्न आणि इतर मालमत्तेचा साठा करणे.

३) **काळजी घेणे** (Protect) - उपजीविकेच्या मार्गाची शोध होऊ पर्यंत संकटातून उभारु पर्यंत मालमत्तेची काळजी घेणे जपणे इ.

४) **वापर करणे** (Deplete) - घरदारातील अन्नसाठी वापरुन टाकणे, मालमत्ता तारण ठेवणे, विकणे इ.

५) **विविधता आणणे** (Diversify) - अन्नाचे नविन स्त्रोत शोधणे. उदा. जंगलातील अन्न, कंद, भाज्या, फळे, जंगली प्राण्याची शिकार करणे, उंदीर इतर प्राण्यानी बीळात जमा केलेले अन्नधान्य मिळवणे. कामाचे नविन मार्ग शोधणे, इ. हे सर्व मुख्यत्वे बिनमोसमी काळात करतात.

६) **दावे, हक्क** (Claim) - नातेवाईक, शेजारी, समाजात, स्वयंसेवी संस्था, शासन, आश्रयदाते, आंतरराष्ट्रीय संघटना यांनी कर्ज मागणे, अवाहन करणे. राजकिय कृती संप मोर्च इ. करणे.

७) **हालचाल करणे** (Move) - कुटुंबे, जनावरे यांचे विखरुन राहाणे. मालमत्ता विखरुन ठेवणे स्थलांतर करणे. [१३]

## २.१.३ महाराष्ट्रातील आदिवासीं सोबत अध्यायन

महाराष्ट्रात आदिवासींच्या समस्या सोडवण्यासाठी अनेक माणसे जीवनभर धडपडली आहेत.

आदिवासी सेवेचे जनक म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो. ज्यांच्यावर आदिवासी सेवेची जबाबदारी महात्मा गांधींनी सोपवली ते पूज्य ठक्कर बाप्पा यांनी अखिल भारतीय अदिम जाती सेवासंघ स्थापन करुन आदिवासींच्या सेवा कार्यासाठी निरनिराळ्या राज्यात अनेक संस्था स्थापन केल्या.

वारली लढयाच्या सेनापती गोदावरी परूळेकर यांनी १९४५ मध्ये ठाणे जिल्ह्यातील वारली जमातीला अन्याय, अत्याचार, शोषण याविरुध्द आवाज उठवण्यास सक्षम बनवले ''जेव्हा माणूस जागा होतो'' या पुस्तकातून त्यांनी याचा आढावा घेतला आहे.

वयाच्या ८० व्या वर्षापर्यंत आदिवासी बालशिक्षणासाठी काम करणाऱ्या अनुताई वाघ अतिशय प्रतिकूल परिस्थितीत कोसबाड येथे कार्यरत होत्या. ''कोसबाडच्या टेकडीवरुन'' या पुस्तकात खूप मौलिक विचार मांडतात.

डॉ. अभय आणि राणी बंग हे गडचिरोलीतून आदिवासीच्या आरोग्य समस्यावर काम करत आहेत. बालमृत्यू, दारुबंदी, कुपोषण यावर मार्ग काढण्यासाठी अनेक वर्षापासून ''सर्च'' ही स्वयंसेवी संस्था स्थापन केलेली आहे.

---

१३ Chambers R and Gorden R Conway (1992) sustainable Rural livelihoods : Practical concepts for twenty first century. IDS discussion paper 296, Brighton IDS, page No. 512

आदिवासीचे प्रश्न, जीवनपद्धती, रुढी परंपरा, यांना आपल्या पुस्तकातून लेखणीतून उतरवणारे सनदी अधिकारी डॉ. गोविंद मारे 'आदिवासी जमाती', आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन, आदिवासीची लोकनृत्ये इ. पुस्तके प्रसिध्द आहेत.

'कातकारी विकास की विस्थापन?', 'जनांचे अनुभव पुसता', या पुस्तकांतून आदिवासी प्रश्नांची समिक्षा करणारे मिलिंद बोकील.

नर्मदा खोऱ्यातील 'नर्मदा बचाव आंदोलन' मेधा पाटकरांचा संघर्ष संजय संगवाईने' नद्या आणि जनजीवन' या पुस्तकातून मांडला आहे.

आदिवासी संशोधन पत्रिका मधून आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र शासन हे आदिवासींचे प्रश्न विकास योजना प्रकाशीत करते.

'हाकारा' हे मासिक महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेमार्फत काढले जाते, आदिवासींच्या जीवनाचे विविध विशेषांक काढले जातात.

संशोधक ज्या क्षेत्रामध्ये संशोधन करत आहे तो भाग पुणे जिल्ह्यातील आदिवासी प्राबल्याचा आंबेगाव तालुका असुन त्या परिसरातील डिंभा धरण परिसरात राहाणाऱ्या आदिवासी जमातीची पारंपारिक उपजीविका साधने, स्त्रोत धरण बांधल्यामुळे नष्ट झाले आहे. परंतु धरण्याच्या पाणीसाठ्यात मासेमारीची नविन उपजीविकाची संधी निर्माण झाली. परंतु शासन, समाज, आर्थिक अडचणीमुळे या उपजीविकेच्या पुर्ण क्षमता वापरणे शक्य होत नाही. त्यांच्या प्रश्नाचा अभ्यास मागील ३० वर्षापासून 'शाश्वत' संस्थेच्या माध्यमातून आनंद कपूर आणि कुसुम कर्णिक यांनी केला आहे. याच तालुक्याला लागून असलेल्या भिमाशंकर अभयाअरण्यातील लोकांच जीवनमान समजून घेण्यासाठीचे अध्ययन मुंबई आय. आय. टी. चे संशोधक कल्याण टांकसाळे यांनी केले आहे. संशोधक हे डिंभे धरण परिसरातील मच्छिमार परिवारांच्या उपजीविकेचा अभ्यास करत असून विशिष्ठ जात-जमात, समुदाय आणि त्यांच्या उपजीविकेचा अभ्यास त्यांचा पर्यावरणावर होणारा परिणाम, अडचणी, क्षमता यांचा अभ्यास या क्षेत्रात प्रथमच केला आहे.

***

## सैध्दांतिक पार्श्वभूमी

डिंभे धरण परिसरातील मच्छिमार परिवारांचा आर्थिक, सामाजिक अभ्यास करताना उपजीविकेचा अभ्यास करण्यासाठी सिध्दांताच्या दृष्टीने इयान स्कू न यांच्या 'शाश्वत उपजिविकेचा' Sustainable livelhood या संकल्पनेचा उपयोग केला. विकासाच्या प्रक्रियेत दिवसेंदिवस शाश्वत उपजिविका या संकल्पनेला अधिक महत्व येताना दिसत आहे. हि संकल्पना अलिकडेच विकसीत होताना दिसत आहे, त्यामुळे यामध्ये काही नविन गोष्टीची भर पडून त्या अधिक सशक्त होण्यासाठी थोडा वेळ लागेल परंतू 'शाश्वत उपजीविका' हि काळाची गरज आहे. कदाचित याशिवाय विकासाचे नियोजनच अशक्य ठरेल.

इयान स्कून (खरप डळेपशी), रॉबर्ट चेंबर (Robert Chambers) आणि गॉर्डन आर कॉनवे ( Gordon R Conwa) यांनी शाश्वत उपजीविकेचा बराच अभ्यास केला आहे. सदर संशोधनासाठी इयान स्कून (Ian Scoones) यांच्या या संशोधन प्रबंधातील पंचभांडवल संकल्पना (Five Capital) वापरली आहे. [१४]

उपजीविकाचे स्त्रोताचे विश्लेषण करण्यासाठी वापरलेले पाच भांडवल

१) नैसर्गिक भांडवल - ( Natural Capital )

२) आर्थिक भांडवल - ( Economic Capital )

३) मानवी भांडवल - ( Human Capital )

४) सामाजिक भांडवल - ( Social Capital )

५) भौतिक भांडवल - ( Physical Capital )

### १) नैसर्गिक भांडवल-

नैसर्गिक साधन सामग्रीचे साठे माती/जमीन, पाणी, हवा इ. हवामान चक्र इ.

### २) आर्थिक/वित्तीय भांडलव -

रोख रक्कम, कर्ज उधार, बचत इतर आर्थिक संपत्ती, मूलभूत सोयीसुविधा, उत्पादनाची साधने, तंत्रज्ञान यांचा समावेश होतो.

14. Scoones Ian : Sustainable Rural Livelihoods, : A framwork for analysis, IDS working paper 72 (1998) Institute of Development studies, sussex UK. Page -7-8.

## ३) मानवी भांडवल -

मानवाचे विशेष ज्ञान, कौशल्य, कामाची योग्यता, उत्तम शरीर संपत्ती, शाररीक कार्यक्षमता यांचा समावेश होतो.

## ४) सामाजिक भांडवल -

सामाजिक सलोख्याचं जाळं, मंडळे, संस्था, संघटना यांच्याशी लोकांचे संबंध समाजातील लोकांची हक्क अधिकार, याविषयी जागृती इ.

## ५) भौतिक भांडवल -

रस्ते वाहतूक व्यावस्था, बाजार व्यावस्था, पाणी पुरवठा, उर्जा, वीज घरे, शौचालय स्थिती, शेती अवजारे, यंत्रे , अवजड मशिनरी, जनावरे, शासन आणि सामाजिक बंध कसे आहेत यांचा विचार.

इयान स्कून ने वरिल भांडवलाच्या आधारे लोकांची विकासाची स्थिती कशी आहे हे मांडले वरील भांडवलाचे विश्वेषण मोजमाप करुन शाश्वत उपजीविकाचे परिणाम काय होतील हे मांडणी केले. उपजीविकाच्या दृष्टीने

१) कामाच्या / रोजगाराच्या दिवसात वाढ झाली पाहिजे.

२) दारिद्रय कमी झाले पाहिजे.

३) जीवनमान उंचावणे आणि क्षमता वाढल्या पाहिजेत असे ते सुचवतात.

संशोधनकाने वरील सिध्दांताच्या अधारे उपजीविकेचे मोजमाप करण्याचा प्रयत्न केला आहे. डिंभे धरण परिसरातील मच्छिमार परिवारांच्या उपजीविकेचा अभ्यास करताना पंच भांडवल संकल्पनेचा विश्लेषणासाठी उपयोग केला.

* शाश्वत उपजीविका (Sustainable livelhood) - उपजीविका चालवताना येणारे ताण, संकटे, धोके, यांच्याशी झुंजत त्यातून मार्ग काढणे. उपजीविकाचे स्त्रोत, संसाधाणची

पर्यावरणाचा तोल संभाळत जपणूक करणे अधिक दिर्घकाळ टिकावेत म्हणून त्यात वाढ करणे. भविष्यात सर्वांना उपयोगी पडावेत म्हणून साठे जपणे आणि स्थानिक पातळीपासून जागतीक पातळीपर्यंत उपजीविकेवर चांगला परिणाम होईल हे पाहाणे म्हणजे शाश्वत उपजीविका अशी व्याख्या इयान स्कूनने केली आहे.

संशोधकाने खालील मुद्यांच्या अधारे पंच भांडवल संकल्पना मांडली. प्रश्नावलीत त्यासाठी अधिक प्रश्नांची मांडणी केली आहे. यातील महत्त्वाचे घटक खालीलप्रमाणे -

१) **नैसर्गिक भांडवल (यातील घटक)** - धरण आणि त्यातील पाणीसाठा, जंगल अधारीत उपजीविका, जमीन, शेतीप्रकार, मासेमारी, भरपूर पाऊस.

२) **मानवी भांडवल (यातील घटक)**- आदिवासींची कौशल्य, त्यांचे निसर्ग संबध, त्यांना असलेली सरकारी योजना, कामे याची माहिती. आदिवासींचे आरोग्य, शिक्षण, स्थलांतर, प्रशिक्षण, संकटात तरण्याची क्षमता.

३) **सामाजिक भांडवल (यातील घटक)** - आदिवासींच्या संघटना, इतर संघटना संस्थाशी त्यांचे संबंध, बचत गट, नातेवाईक, सण यांचे संबंध, जातीतले संबंध.

४) **वित्तीय भांडवल (यातील घटक)** - बँकेत खाते, बचत करण्याची सवय, आर्थिक मिळकत, रेशनकार्डाची उपलब्धी, वन उपजाला मिळणारा भाव.

५) **भौतिक भांडवल (यातील घटक)** - रस्ता व्यावस्था, पाणी व्यावस्था, वीज, घरे शौचालये, बाजार व्यवस्था, जनावरे, शेती अवजारे, शासन आणि सामाजिक संबंध.

****

**संशोधनाची उद्दिष्टये -**

संशोधनासाठी पुढील उद्दिष्टये ठरविण्यात आली-

१. डिंभे धरण परिसरातील आदिवासी मच्छिमार परिवारांची, आर्थिक-सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२. डिंभे धरण परिसरातील मच्छिमार समाजातील सद्यस्थितीच्या उपजीविकांचा अभ्यास करणे.

३. सद्यस्थितीच्या उपजीविकेतील मासेमारीचा हातभार किती? याचा अभ्यास करणे.

४. मच्छिमार समाजाच्या उपजीविकेत वाढ करण्यासाठी मासेमारीचे एकूण सामर्थ्य कीती आहे? याचा अभ्यास करणे.

५. मासेमारीचे सामर्थ्य वाढवण्यातील सामाजिक -आर्थिक- राजकिय अडचणीचा अभ्यास करणे.

## संशोधन पध्दती

आदिवासींच्या प्रश्नांचा अभ्यास चांगल्या प्रकारे करता यावा यासाठी आदिवासी कसे जीवन जगतात याची माहिती संशोधकाला असणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधकाने काही महिने आदिवासी समाजात वास्तव्य केले होते. आदिवासीच्या जीवनपध्दतीचे निरिक्षण केले होते, त्यामुळे मच्छिमार आदिवासी परिवारांचा अभ्यास करण्यासाठी पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुका निवडून डिंभा धरण परिसरातील १४ गावे निवडली.

तसेच या तालुक्याची निवड करण्यामागे दुसरे कारण म्हणजे या भागात आदिवासीचे प्रमाण जास्त आहे. या भागात ३० वर्षापिक्षा जास्त काळ आनंद कपूर आणि कुसुम कर्णिक ह्या उभयंतानी 'शाश्वत' संस्थेमार्फत आदिवासीच्या जीवनाचा अभ्यास केला आहे. त्याच्या अडचणी सोडवल्या आहेत. त्यामुळे संशोधनाच्या दुय्यम साधनाद्वारे विश्वसनिय अचूक संदर्भ मिळू शकले. आदिवासी समाजातील मच्छिमार कुटुंबाच्या उपजीविकेचा आणि आर्थिक सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करताना जास्तीत जास्त प्राथमिक स्त्रोताचा वापर केला. त्यासाठी ८० आदिवासी मच्छिमार कुटुंबे, सर्वेक्षणासाठी निवडली. आदिवासी समाजातील वास्तव्य, सहभागी निरीक्षण, चर्चा, मुलाखती, प्रश्नावली इ. साधनांचा वापर केला.

### <u>संशोधन क्षेत्र आणि नमुना निवड</u>

* संशोधन क्षेत्र - पुणे जिल्ह्यातील पश्चिमेकडील डोंगराळ भागातील आंबेगाव तालुक्यातील डिंभा धरण परीसर.
* गावांची निवड - आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरण परिसरातील २०१ मासेमार कुटुंबे राहत असलेली १४ गावे.
* नमुना निवड - २०१ कुटुंबापैकी ८० कुटुंबे निवडली आहेत.

| | |
|---|---|
| ठाकर कुटुंबे | ४ |
| दलित कुटूंबे | २ |

| | |
|---|---|
| मुस्लीम कुटुंब | १ |
| कातकरी कुटुंबे | २३ |
| महादेव कोळी कुटुंबे | ५० |
| **एकूण** | **८०** |

## * संशोधनाची प्राथमिक साधने (Primary data)

पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील डिंभा धरण परिसरातील आदिवासी मच्छिमारांच्या उपजिविकेचा अभ्यास करताना प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत यांचा वापर केला. या संशोधनकामी प्राथमिक स्त्रोताचा अधिक वापर केला कारण आदिवासींच्या जीवनावर झालेले अभ्यास हे मुख्यत्वे त्यांच्या सांस्कृतीक जीवन आणि आर्थिक स्थिती कला साहित्य या अंगाने आधिक झाले आहेत परंतु विशिष्ठ समुदायाला, जमातीला लक्ष करुन त्यांचे उपजीविकांचे स्त्रोत आणि त्यांचा पर्यावरणावर होणारा परिणाम यांच्या उपजीविकांच्या एकूण क्षमता यांचे अध्ययन फारसे उपलब्ध न झाल्यामुळे संशोधकाला प्राथमिक स्त्रोतांवर अवलंबून रहावे लागले आहे.

डिंभे धरण परिसरातील १४ आदिवासी जमातीचे प्राबल्य असलेल्या गाव/वाड्यामधून २०१ मच्छिमार कुटुंबापैकी ८० कुटुंबे सर्वेक्षणासाठी निवडली आहेत. त्यानंतर नमुना प्रश्नावली, अनुसुची भरल्या आहेत. सहभागी निरिक्षण गावांतील मच्छिमारांसोबत गटचर्चा, समाजात वास्तव्य, आदिवासी सोबत स्थानिक प्रश्नांवर काम करणारे समाजसेवक, कार्यकर्ते, अभ्यासक यांच्या मुलाखती याद्वारे माहिती गोळा केलेली आहे.

## * संशोधनाची दुय्यम साधने (Secondary data)

सामाजिक संशोधनाच्या नियमानुसार संशोधनाच्या दुय्यम साधनाद्वारे माहिती गोळा करण्यासाठी पुढील दुय्यम साधनाचा वापर केला आहे.

यासाठी ग्रंथालयातील पुस्तके, संशोधन अहवाल, सरकारने प्रसिध्द केलेली कागदपत्रे व अहवाल, स्वयंसेवी संस्थांनी प्रसिध्द केलेले अहवाल, इंटरनेट वेबसाईट इ.चा वापर केला आहे. त्यापैकी महत्त्वाचे ग्रंथालये खालीलप्रमाणे -

१) ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

२) ग्रंथालय, धनंजयराव गाडगीळ, गोखले इन्स्टियुट, पुणे

३) ग्रंथालय, बी. जी. काळे, बँक ऑफ महाराष्ट्र, केंद्रीय कार्यालय पुणे

४) ग्रंथालय, भांडारर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे

५) 'शाश्वत' संस्था मंचर, पुणे

६) आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे

७) पंचायत समिती कार्यालय आंबेगाव-डिंभे .

****

## २.५ संशोधनाची गृहीतके

१. डिंभे धरण परीसरातील आदिवासी मच्छिमार कुटूंबाची उपजीविका साधने अपुरी आहेत त्यामुळे त्यांच्या शाश्वत विकासात अडचणी आहेत.

२. आदिवासी मच्छिमार कुटुंबाना उपजीविकेत वाढ करण्यामध्ये सामाजिक परंपरा, शासकिय नियम, आर्थिक स्थिती इ. अडचणी आहेत.

३. डिंभे परिसरातील आदिवासी मच्छिमारांसाठी प्रशिक्षण आणि बाजारपेठेची व्यवस्था अपुरी आहे.

## २.६ संशोधन मर्यादा

सदर संशोधन करीत असताना संशोधकास आदिवासी क्षेत्रातील वास्तव्याच्या काळात मच्छिमार आदिवासी कुटुंबाना भेडसावणाऱ्या विविध समस्यांची जाणिव संशोधकास झाली होती. संशोधक मुख्यत्वे आदिवासीचे उपजीविका, जीवन यांचा अभ्यास करत आहे. आदिवासी कुटुंबाना उपजीविकेची साधने अपुरी आहेत. काही उपजीविका साधनांचा पुर्ण विकास क्षमताचा वापर करण्यात आर्थिक, सामाजिक, राजकिय अडचणी जाणवतात. उपजीविकेत वाढ करण्यासाठी शिक्षण, योग्य परिक्षण, साधणे, याबरोबरच शासकीय नियम, शासन कामातील दिरंगाई, अंतर्गत जातीव्यवस्था, पारंपारिक विचारसरणी या समस्या जाणवतात.

पुणे जिल्ह्यातील विकासाच्या दृष्टीने दुर्लक्षित आदिवासी प्राबल्य असणाऱ्या तालुक्यापैकी आंबेगाव तालुक्यातील डिंभा धरण परिसरातील १४ गावे/वाड्या यामधील २०१ मच्छिमार कुटुंबापैकी ८० कुटुंबापूरताच मर्यादित केलेला हा अभ्यास आहे.

संशोधनाला मिळालेला वेळ, संशोधन विषयाचा आवाका या सर्वांचा विचार करुन केलेला हा अभ्यास आहे. कोणताही शास्त्रीय अभ्यास हा १०० टक्के यशस्वी किंवा पुर्ण म्हणता येत नाही, ही मानवी मनाची मर्यादा आहे. हाताशी असणारी साधने, वेळ, विषय आणि क्षेत्राच्या मर्यादेत हा अभ्यास बरोबर आहे.

****

## २.७ अभ्यासाचे महत्व

''सर्वसाधारणपणे आदिवासीविषयी प्रामुख्याने दोन प्रकारचे अभ्यास झालेले आढळतात, एक त्यांच्या सांस्कृतीक पैलूविषयी तर दुसरा, आर्थिक पैलू विषयक. सांस्कृतीक अभ्यास करताना आदिवासी बोलीभाषा, हास्तकला, नृत्य, पेहराव, चालीरीती, दागीने, वनौषधी इ. विषय मांडले जातात. आर्थिक अभ्यास शेतीची पध्दती, जमीनीवरचे हक्क, गौण वनोपजाचा वापर इ. संबधी असतात. पण जेंव्हा आदिवासीच्या विकासासंबधी बोलले जाते तेव्हा. प्रामुख्याने 'आर्थिक विकास' अभिप्रेत असतो. आदिवासीच्या सांस्कृतीक जीवनाविषयी सामान्यत: कौतूक केले जाते पण आर्थिक दृष्ट्या मात्र आदिवासी अतिशय मागसलेले आहेत व त्यांचा विकास झालाच पाहिजे असाच सूर असतो.[१५]

आदिवासी जाती-जमाती विषयी आणि त्यांच्या जीवनपध्दतीविषयी सर्वांनाच कुतूहलं असते. परंतु त्याचा विकास व्हावा त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणावे यासाठी खुपच कमी प्रयत्न होताना दिसतात. आंबेगाव तालुक्यातील डिंभा धरण परिसरातील मच्छिमार परिवारांचा अभ्यास करताना संशोधक स्वत: त्या गावात राहून त्यांच्या जीवनपध्दतीचे निरीक्षण करुन अभ्यास करत असल्यामुळे आदिवासी समाजाचे प्राबल्य असलेल्या १९ गावापैकी १४ गावांतील ८० कुटुंबांचा अभ्यास केला.

आदिवासी समाज समाजाच्या मुख्य प्रवाहात का नाही? अजूनही तो मच्छिमारी, हिरडा, पडकई, गाळपेर, मध इ. प्राथमिक क्षेत्रात का उपजीविका करत आहे? इ. साठी हा अभ्यास महत्वपूर्ण आहे. तसेच या भागात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आणि शासन यांना योजना बनविण्यासाठी सुध्दा या अभ्यासाचा उपयोग होईल.

१९८१ पासून आंबेगाव तालुक्यात कुसुम कर्णिक आणि आनंद कपूर यांनी 'शाश्वत' संस्थेमार्फत येथे सामाजीक काम चालविले आहे. प्रामुख्याने या भागात महादेव कोळी,

---

१५ डॉ. घाटे ऋचा : लेख - आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, सप्टेंबर १९९४, पृ.४९

कातकरी आणि ठाकर अशा जमातीवर त्यांच्या जीवनपध्दतीवर काम करताना या संशोधनाचा उपयोग हाईल.

सामाजिक संशोधनातून प्राप्त ज्ञानाची सामाजिक योजना तयार करण्यासाठी विशेष मदत होते. सामाजिक योजना या समाजाला पुनर्जिवित करतात आणि त्याद्वारे महत्वपूर्ण आणि अनुकूल परिवर्तन घडवून आणले जाते.

प्रस्तुत संशोधक डॉ. अभय बंग आणि सर्च (SEARCH) या संस्थेने सुरू केलेल्या युवांच्या 'निर्माण' या सामाजिक चळवळीतला असल्यामुळे, अभ्यासाच्या क्षेत्रभेटीच्या निमित्ताने आंबेगाव तालुक्यातील आदिवासीच्या सान्निध्यात वास्तव्य केले आहे. आदिवासी क्षेत्रातील वास्तव्याच्या काळात मच्छिमार आदिवासीनां भेडसावणाऱ्या विविध समस्यांची जाणिव संशोधकास झाली होती. याच भागात ३० वर्षाहून अधिक काळ आदिवासी बरोबर काम करणाऱ्या 'शाश्वत' या स्वंयसेवी संस्था आणि शासनाला आदिवासी विकासाच्या योजना राबविण्यासाठी हा अभ्यास महत्वाचा ठरेल. संशोधक मुख्यत्वे आदिवासी समाजाच्या उपजीविकेचा अभ्यास करत असल्याने सद्यस्थितीला उपजीविकेची काय स्थिती आहे? आणि भविष्यात एकूण उपजीविकेत वाढ होण्यामध्ये मासेमारी आणि इतर घटकाचे एकूण सामर्थ्य किती आहे? हे समजून घेण्यासाठी हा अभ्यास अत्यंत महत्वाचा आहे.

****

# पुणे जिल्हा आरेखन

पुणे जिल्हा १७.५° व १९.२° उत्तर अक्षांश व ७३.२° ते ७५.१° पुर्व रेखांश मध्ये वसला आहे. पुणे जिल्ह्याच्या पूर्व व उत्तर बाजुस अहमदनगर जिल्हा, दक्षिणेला सातारा व पश्चिमेला रायगड जिल्हा आहे. आग्नेय दिशेला सोलापूर जिल्हा असून वायव्येला ठाणे जिल्हा आहे.

पुणे जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १५.६४२ चौ. कि. मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्याच्या ७.५ टक्के आहे.

२००१ च्या जनगणनेनूसार जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमीटरला ४६२ व्याक्ती अशी आहे. हे प्रमाण ग्रामिण व नागरी भागात २०२ व ६७६५ असे अनुक्रमे आहे. राज्याची लोकसंख्येची घनता ३१४ आहे.

२००१ च्या जनगणनेनूसार जिल्ह्यात एकूण १४ तहसील असून १३ पंचायत समित्या आहेत. त्याचप्रमाणे जिल्ह्यात एकूण २५ शहरी भाग असून त्यापैकी २ महानगरपालिका, ३ कटकमंडले व ११ नगरपरिषदा आहेत. ९ गणना शहरे आहेत. जिल्ह्यात एकूण १८६६ खेडी आहेत.

## ३.१ हवामान आणि पर्जन्यमान

पुणे जिल्ह्याचे हवामान सर्वसाधारणपणे उष्ण असले तरी पश्चिमेकडील भागातील हवामान थंड तर मध्य भागात ते कोरडे असल्याचे आढळते. पूर्वेकडील इंदापूर, बारामती व दौंड तालुक्यात हवा उष्ण व कोरडी असते. जिल्ह्यात बहुतांशी पऊिस नैऋत्य मोसमी वाऱ्यापासूनही पाऊस पडतो.

जिल्ह्यात पश्चिमेकडून जसजसे पूर्वेकडे जावे तसतसे पावसाचे प्रमाण कमी कमी होत जाते. दुष्काळी अति पूर्व भागात सुमारे ६०० ते ७०० मीलीमिटर पाऊस पडतो. तर पश्चिमेस ११७१ मिलीमीटर पाऊस पडतो.जिल्ह्याचे जमिनीचे उंच सखलपणामुळे घाटमाथा, मावळ आणि पठार असे तीन स्वाभाविक विभाग पडतात. घाटमाथ्यावरील जमिन हलकी व तांबड्या रंगाची आढळते. जिल्ह्याच्या इतर भागातील जमिन काळी, तांबडी व किरमीजी लंगाची असुन त्यात काही ठिकाणी वाळू व चुनखडीचे मिश्रण आढळते.

ज्या विद्यापीठाचा लौकिक संपूर्ण जगामध्ये आहे. असे पुणे विद्यापीठ याच जिल्ह्यात असून त्याच्या कला, वाणिज्य, शास्त्र, वैद्यकीय व संगणक शाखेत केवळ राज्यातील नव्हे तर देशातील तसेच परदेशातील विद्यार्थीही शिक्षण घेत आहेत. पुण्यामध्ये अनेक अभिमत विद्यापीठ आहेत. त्यामध्ये अभियांत्रिकी, वैद्यकीय, विधी, विज्ञान, कला, वाणिज्य या विविध शाखांची सहविद्यालये एकाच संकुलात विद्यादानाचे कार्य करीत आहेत. पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये सर्व वैद्यकीय सुविधा असणारे व सर्वात मोठे असे एकमेव रूग्णालय याच संस्थेच्या परिसरात आहे.

जिल्ह्यामध्ये पर्यटकाला आकर्षित करणारी अनेक ठिकाणे आहेत. त्यापैकी खंडाळा, लोणवळा ही थंड हवेची ठिकाणे असून तेथे महाराष्ट्रातून तसेच परराज्यातून अनेक पर्यटक येतात. त्याचप्रमाणे शिवनेरी, सिंहगड, पुरंदर, राजगड, तोरणा इ. ऐतिहासिक महत्व असलेले किल्लेही याच जिल्ह्यात आहेत. मावळ तालुक्यातील कार्ला व भाजे येथिल लेणी प्रसिध्द आहेत. धार्मिकदृष्टया महत्त्व असलेले अष्टविनायकापैकी पाच गणपती, जेजुरीचा खंडोबा, ज्ञानेश्वरांची आळंदी तसेच तुकाराम महाराजांनी ज्या ठिकाणाहून सदेह वैकुंठगमण केले असे देहू क्षेत्रही याच जिल्ह्यात आहे. बारा ज्योतिर्लिंगापैकी श्रीक्षेत्र भिमाशंकर तसेच दत्ताचे ठिकाण असलेले नारायणपूर याच जिल्ह्यात आहे. नव्याने पुरंदर तालुक्यात केतकावळे गावी बालाजी मंदीर ( तिरूपती बालाजी मंदिराची प्रतिकृती) उभारण्यात आली आहे.

पुणे येथे बालेवाडी येथे श्री शिवछत्रपती स्टेडियम उभारण्यात आलेले आहे. तसेच हिंजवडी येथे माहिती तंत्रज्ञान पार्क (IT PARK) उभारला आहे. [१५]

## ३.२. जिल्ह्याचे स्थान व प्राकृतिक रचना

* पुणे जिल्हा १७.५° व १९.२° वर अक्षांश आणि ७३.२° व ७५.१° पूर्व रेखांश मध्ये पसरला आहे.
* पुणे जिल्ह्याच्या उत्तरेस आणि पूर्वेस अहमदनगर जिल्हा, दक्षिणेस सातारा, पश्चिमेस रायगड जिल्हा आहे आग्नेय दिशेला सोलापूर असून वायव्येला ठाणे जिल्हा आहे.
* पुणे जिल्ह्याचे क्षेत्रफळ १५.६४२ चौरस किलोमीटर असून ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५% आहे. जमीन उंच सखल असल्याने घाटमाथा, मावळ व पठार असे जिल्ह्याचे तीन स्वाभाविक विभाग पडले आहेत.

जुन्नर, आंबेगाव, मावळ, मुळशी, वेल्हे, भोर हे तालुके घाटमाथ्यावर असून उर्वरीत ८ तालुके आणि मावळ हे पठाराच्या पश्चिम कडा भागात आहेत. पठाराच्या पश्चिम कडा खूपच उंच आहे. सह्याद्री पर्वताच्या मोठ्या रांगा उत्तरेकडून दक्षिणेस पसरल्या आहेत.

**जिल्ह्यातील महत्त्वाच्या डोंगररांगा पुढीलप्रमाणे-**

**अ)** हरीशचंद्र पर्वत **ब)** जीवधान **क).** ढाक आहुपे (Ahupe)

पुणे जिल्ह्यात काळी, तांबडी व किरमीजी रंगाची जमीन आहे. पश्चिमेकडून जसजसे पुर्वेकडे जावे तसतशी जमीन कसदार व सुपीक आढळते. पश्चिमकडील तालुक्यात ती तांबडी व हलकी आहे.

चिंचवडजवळ मजबूत व टिकाऊ दगडाच्या खाणी आहेत. एरंडवणे, पाषाण या भागात शिरगोळे गारेचे दगड व रंगासाठी लोणारी व गेरूची लाल माती सापडते. पूर्व भागात चुनखडी सापडते.

---

१५. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, पुणे जिल्हा, २००५-२००६ प्रकाशन अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन, पृ.१

* **खनिज :** सोने, रूपे, तांबे, लोखंड अशा प्रकारची मौल्यवान धातू जिल्ह्यात सापडत नाहीत. इमारतीला लागणाऱ्या मजबूत काळ्या दगडाच्या खाणी याच जिल्ह्यात आहेत. याशिवाय गारेचे दगड रंगाची माती चुनखडी सापडते.

* **जिल्ह्यातील नद्या**– भीमा नदी ही जिल्ह्यातील प्रमुक नदी आहे. ती पुणे जिल्ह्याच्या पश्चिमेस सह्याद्री पर्वतातील भिमाशंकर येथे उगम पावते. जिल्ह्यातून दक्षिणपूर्व अशी वाहात जाऊन भीमा नदी सोलापूर जिलाह्यात प्रवेश करते. भीमा नदीच्या डाव्या बाजूस वेकू, घोड आणि उजव्या बाजूस भामा, इंद्रायणी, मुळा, मुठा अशा उपनद्या आहेत. पुणे जिल्ह्याच्या दक्षिण सरहद्दीवर नीरा नदी आहे. कऱ्हा, कुकडी, पवना, मीना, गुंजवणी, पुष्पावती, शिवगंगा अशा नद्या पुणे जिल्ह्यातून वाहतात . या सर्व नदी पावसाळ्यात टुथडी भरून वाहतात व उन्हाळ्यात कोरड्या पडतात. पुणे जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यातून एक तरी नदी वाहात आहे असे आढळून येते.

## ३.३ प्रशासकीय विभाग–

पुणे जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्य ठिकाण पुणे येथे आहे. हे ठिकाण राज्याच्या मुंबई या राजधानीपासून रेल्वेने १९२ कि. मी. तर रस्त्याने १६० कि. मी. अंतरावर असून मुंबई– बेंगलोर या राष्ट्रीय महामार्गावर आहे.

### ३.३.१ पुणे जिल्ह्यात १४ तहसील ते पुढीलप्रमाणे –

१) जुन्नर २) आंबेगाव ३) शिरूर ४) खेड ५) मावळ ६) मुळशी ७) हावेली ८) पुणे शहर ९) दौंड १०) पुरंदर ११) वेल्हे १२) भोर १३) बारामती १४) इंदापूर.

या तहसीलांच्या जिल्ह्याच्या एकू ण क्षेत्रफळाशी टक्केवारी पाहिली असता असे आढळते की, शिरूर तालुक्याचे क्षेत्र सर्वात मोठे म्हणजे १०% आहे तर पुणे शहराचे सर्वात कमी म्हणजे १% आहे. आंबेगाव, पुरंदर, मुळशी व मावळ यांचे क्षेत्र अनुक्रमे ७% आहे. दौंडचे ८% असुन इंदापूर, बारामती, हावेली, खेड, जुन्नर यांचे क्षेत्र प्रत्येकी ९% आहे. भोर व वेल्हा तहसीलाचे अनुक्रमे ६% व ३% आहे.

पुणे जिल्ह्यात पुणे व पिंपरी या दोन महानगरपालिका असुन पुणे, खडकी आणि देहू रोड येथे कटक मंडळ आहेत. त्याचप्रमाणे खेड तालुक्यात आळंदी, पुरंदर मध्ये सासवड व जेजुरी मावळमध्ये तळेगाव दाभाडे व लोणावळा आणि भोर, दौंड, बारामती, शिरूर, जुन्नर इंदापूर अशा अकरा नगरपालिका आहेत.

पुणे जिल्ह्यात ३१ मार्च, २००६ रोजी १४०१ ग्रामपंचायती होत्या. त्यातल निवडून आलेल्या सभासदांची संख्या ११,५८० होती.

## ३.४ लोकसंख्या-

**( जनगणना अंतिम आकडेवारी )**

२००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ७२.३३ लाख असुन यामध्ये ३७.६९ लाख पुरूष व ३४.६४ लाख स्त्रिया आहेत. जिल्ह्यातील १९९१-२००१ या दशकातील दहवार्षिक लोकसंख्या वाढीचे प्रमाण ३०.७३% आहे. पुणे जिल्ह्यातील पुणे शहर व हावेली या तालुक्यातील नागरी लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या अनुक्रमे १००% व ७८% आहे. जिल्ह्याच्या या दोन तालुक्यामध्ये उद्योगधंदे, शिक्षण संस्था, व्यापारी केंद्राचे केंद्रीकरण मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळे या तालुक्याच्या नागरी भागाकडे लोकसंख्याचा लोंढा आला आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी पुणे शहर तालुक्यात ३७% लोकसंख्या आहे.

## ३.५ लोकसंख्येची घनता-

२००१च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची लोकसंख्याची घनता दर चौरस किलोमीटरमागे ४६२ माणसे एवढी आहे. नागरी भागात ती ६७६५ आहे. ग्रामीण भागात ती २०२ आढळते. जिल्ह्यात पुणे शहर तहसीलात घनता सर्वात जास्त म्हणजे १४,६५२

एवढी आहे. वेल्हे तहसीलात सर्वातकमी म्हणजे ११२ आहे. लोकसंख्येच्या घनतेनुसार पुणे जिल्ह्याचा राज्यात दुसरा क्रमांक येतो.

३.५.१ **नागरी व ग्रामीण लोकसंख्या-**

सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या ४२% लोकसंख्या ग्रामीण भागात राहाते तर ५८% लोकसंख्या नागरी भागात आहे. जिल्ह्याच्या नागरी भागाच्या लोकसंख्येपैकी जवळजवळ ८९% लोकसंख्या पुणे- व पिंपरी-चिंचवड शहरात सामावली आहे.

३.५.२ **स्त्री पुरुष प्रमाण-**

२००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील दर हजार पुरूषामागे स्त्रीयांची संख्या ९१९ आहे. ग्रामीण व शहरी भागात ती अनुक्रमे ९४६ व ८९९ आहे. राज्याचे दर हजार पुरूषामागे स्त्रीयांचे प्रमाण ९२२ असून ते ग्रामीण व नागरी भागात ते अनुक्रमे ९५९ व ८७३ आहे.

३.५.३ **अनुसुचित जाती/ जमाती-**

२००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील अनुसुचित जातीची संख्या २.६२ लाख एवढी होती. एकूण लोकसंख्याशी तुलना करता अनुसुचित जातीची लोकसंख्या १०.५३ % व अनुसुचित जमातीची लोकसंख्या ३.६१% आहे.

३.६.६ **साक्षरता -**

२००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात ५०.३९ लाख म्हणजेच ८०% लोक साक्षर होते. साक्षरतेचे प्रमाण (८० ते ६ वयोगट काळता) नागरी व ग्रामीण भागात अनुक्रमे ८६ व ७२% आहे. स्त्री पुरूषानुसार साक्षरतेचे प्रमाण पहाता असे आढळते की जिल्ह्यात साक्षर स्त्रीयांचे व पुरूषांचे प्रमाण अनुक्रमे ७२% व ८८% आहे.

### ३.७. **वयोगट-**

२००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण लोकसंख्याच्या १३% लोकसंख्या ० ते ६  वयोगटात होती. तर १७% ७ ते १४ वयोगटात, १०% १५- १९ वयोगटात, १०% २० ते २४ वयोगटात,९% २५ ते २९ वयोगटात, ८% ३० ते ३४ वयोगटात, ७% ३५ ते ३९ वयोगटात, १८% ६० व त्यापेक्षा अधिक वयोगटात होती

### ३.८ **पिकांचे स्वरूप-**

जिल्ह्यात ज्वारी हे पीक महत्त्वाचे आहे. १९९९-२००० ज्वारी पीकाखालील क्षेत्र एकूण क्षेत्राच्या ३५% होते. त्याखालोखाल बाजरी हे महत्त्वाचे पीक असून त्याच्यातील क्षेत्र एकूण पिकाखालील क्षेत्राच्या १४% आहे. याशिवाय भात व गहू या पिकाखालील वर्षे १९९९-२००० मध्ये अनुक्रमे ५% ते ६% क्षेत्र होते. एकूण तृणधान्याखालील ६३% क्षेत्र होते. तर कडधान्याखाली ७% क्षेत्र होते. खेड, मावळ, भोर, वेल्हे, जुन्नर, आंबेगाव या तालुक्यामध्ये जिल्ह्यातील भाताच्या पिकाखालील क्षेत्र जास्त आहे. पश्चिमेकडील डोंगराळ भागात भाताचे पीक उत्तम येते. आंबेमोहोर, इंद्रायणी, जिरेमाळ वगैरे भाताच्या जाती प्रसिध्द आहेत. बारामती या भागात कापसाचे पीक उत्तम येते.तसेच इंदापूर शिरूर, बारामती, दौंड व पुरंदर तालुक्यात ज्वारीचे पीक उत्तम येते. खेड व जुन्नर, आंबेगाव भागात भुईमुगाचे पीक चांगले येते. आंबेगाव, खेड, जुन्नर तालुक्यात बटाट्याचे पीक चांगले येते. कांद्याचे पीक शिरूर, दौंड, जुन्नर भागात चांगले येते. हडपसर, पुणे यांच्या आसपास भरपूर भाजीपाला, कांद्याच्या पीकाचे उत्पादन होते. दौंड, शिरूर, इंदापूर व बारामती  या भागात संत्री व मोसंबीचे उत्पादन चांगले  होते.जुन्नर भागात केळीच्या बागा आणि फुलांचे मळे प्रसिध्द आहेत तर बारामती, जुन्नर, उरळीकांचन हे भाग द्राक्षासाठी प्रसिध्द आहेत. पुरंदर तालुक्यात अंजीर, डाळींब व सीताफळ या फळबागाखालील

क्षेत्र भरपूर आहे. बारामतीचा पूर्व भाग इंदापूर तालुक्याचा पश्चिम भाग व हवेली तालुक्यातील लोणी, हडपसर, मांजरी या भागात ऊसाचे उत्पादन चांगले निघते.

## ३.९ मुख्य पिकांचे उत्पादन-

सन २००५- २००६ मध्ये कृषी संचालनालयाचे पुरविलेल्या माहितीवरून असे दिसते की, सन २००४- २००५ च्या तुलनेत गहू- ज्वारी उत्पादनामध्ये वाढ झालेली दिसून येते तर तांदूळ, बाजरी पिकांच्या उत्पादनामध्ये घट झालेली दिसून येते.

## ३.१० जमिनधारणा, जमिनीचा वापर-

कृषी क्षेत्राची १९९९-२००० ची पूर्ण सुधारीत आकडेवारी कृषी संचालनालयाने पुरवली असुन तिचे विवेचन पुढीलप्रमाणे-

पुणे जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ, १५६२०३३ हेक्टर असून यापैकी वर्ष १९९९-२००० मध्ये ११% क्षेत्र (१.७१ लाख हेक्टर) जंगलाखाली आहे. १९९९- २००० च्या पूर्ण सुधारीत आकडेवारीनुसार एकूण भौगौलिक क्षेत्रफळाच्या अनुक्रमे ४% क्षेत्र बीगरशेती वापराखाली आहे. १९९९-२००० मध्ये लागवडीखाली येऊ शकणारे क्षेत्र १२२२००३ हेक्टर होते. ते एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ७८% होते. जिल्ह्यात यावर्षी पिकाखालील निव्वळ क्षेत्र ९७०४८१ हेक्टर होते. दुबार व तिबार पिकाखालील क्षेत्र १९९९-२००० मध्ये १७५२०१ हेक्टर होते. म्हणजेच एकूण पिकाखालील क्षेत्र ११४५६८२ हेक्टर होते.

## ३.११ जमीनधारणा-

कृषी गणना १९९०-९१ अंतीम आकडेवारी पाहता असे आढळते की, जिल्ह्यात एकूण ४९८२२ विहीती खाली होती. व त्याखाली ११२७७८४ हेक्टर क्षेत्र होते. यापैकी ९५% विहीती खाती, वैयक्तीक खाती होती. उर्वरीत संयुक्त वहीती खाती होती.

३.१२ **सिंचन-**

सन १९९९-२००० या वर्षाच्या अंतिम आकडेवारीनुसार जिल्ह्यात निव्वळ ओलीताखाली क्षेत्र अनुक्रमे २६३२०८ हेक्टर होते. ते जिल्हयातील एकूण पीकाखालील क्षेत्राच्या २३% आहे. इंदापूर, बारामती, जुन्नर, शिरूर व दौंड तालुक्यामध्ये निव्वळ ओलीताखालील निव्वळ पीक घेतलेल्या क्षेत्राच्या अनुक्रमे ३४%, २८%, ३१%, २४%, व ३५% होते.

सन १९९९-२००० च्या आकडेवारीनुसार जिल्हयातील सिंचीत क्षेत्रापैकी जवळजवळ ९२% क्षेत्र खाद्य पीकाखालील आढळते, तर उर्वरीत ८% क्षेत्र अखाद्य पीकाखालील आढळते. बागायत खाद्य पीकाखालील क्षेत्रापैकी ४४% क्षेत्र तृणधान्याखाली आहे.

जिल्हयात सन १९९९-२००० या वर्षात पूर्ण सुधारीत आकडेवारीनुसार वापरात असलेल्या सिंचन विहीरीची संख्या ९०४२७ इतकी झाली आहे. त्याचप्रमाणे वापरात असलेल्या विहीरीवरील वीजपंपाची संख्या ५६११८ इतकी आहे. त्यामुळे १६८४२६ इतके क्षेत्र भिजले आहे.

**३.१३ पशुसंवर्धन व पशुवैद्यकीय सेवा-**

सन १९९७ च्या जनगणनेची आकडेवारीनुसार जिल्हयात २२९००८१ इतके पशुधन होते. याशिवाय कुक्कूटवर्गीय पक्षांची संख्या ३९४१९८५ होती. या गणनेनुसार एकूण २२९००८१ पशुधनापैकी गाई, बैल ३९%, म्हैस व रेडे १३%, शेळ्या मेंढ्या ४५% व इतर ३% होते. जिल्हयात कुक्कूटपालन व अंडी उबविण्याचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर होतो. पुणे येथे ‘ मध्यवर्ती अंडी उबवणी’ केंद्र आहे.

**३.१४ पशुवैद्यकीय सेवा सुविधा-**

जिल्हयात ३१ मार्च रोजी सहा पशुवैद्यकीय सर्व चिकीत्सालय, २७० दवाखाने. या प्रकारच्या सुविधामार्फत जिल्हयातील जनांवरावर औषध उपचार करण्यात आले.

३.१५ **वनक्षेत्र व  वन उत्पादने-**

वन खात्यामार्फत पुरविलेल्या २००५- २००६ या अस्थायी आकडेवारीनुसार जिल्हयातील वनक्षेत्र १६९१ चौरस किलोमीटर इतके आहे. त्यापैकी जवळजवळ अर्धे जंगल व्याज  क्षेत्र जिल्हयाच्या पश्चिम भागातील मावळ, भोर,मुरूशी, आंबेगाव व वेल्हे या तालुक्यात होते. पश्चिमेकडील जंगलात मध, मेण, डिंक या औषधी वस्तु मिळतात. याशिवाय साग, हिरडा, खैरे यांचे उत्पन्न भरपूर निघते. आंबेगाव तालुक्यातील भिमाशंकरचे डोंगरावर व सिंहगड किल्लयाभोवती व इतर ठिकाणी वनखात्याने झाडांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली आहे.सामाजिक वनीकरण खात्याने जिल्हयात डोंगर उतारावर सपाट जमीनीवर व रस्त्याच्या कडेस थोड्या प्रमाणावर सामाजिक वनीकरणाचा कार्यक्रम राबिवला आहे. ३१ मार्च २००६ रोजी संपलेल्या वर्षात वनखात्याने जळाऊ लाकडाच्या विक्रीपासून ३ लाख रूपये उत्पन्न व गवत, हिरडा, शिकेकाई, चिंच व इतर गौण पीक उत्पादनाच्या विक्रीपासून यावर्षी २.६५ लाख रूपये उत्पन्न मिळविले.

३.१६ **मस्त्य व्यवसाय-**

जिल्हयात समुद्र किनारा नाही, त्यामुळे नद्या, तलाव व मोठ्या जलाशयात मस्त्योत्पादन होते.जिल्हयातील नद्याची लांबी १२५२ किलोमीटर आहे, नद्या, तळी मोठ्या जलाशयामध्ये मार्च २००६ अकेर २७८५६ हेक्टर क्षेत्र मस्त्योत्पादनासाठी अनुकुल होते. या अनुकुल क्षेत्राच्या ८०% क्षेत्र प्रत्यक्ष वापरात आणले आहे. अनुकुल क्षेत्रातील मस्त्योत्पादन लिलाव पध्दतीने विकले जाते. २००५-०६ वर्षात मे. टन माशाचे उत्पादन झाले व त्यापासून १३६०.५० लाख रूपये उत्पन्न मिळाले. संदर्भ वर्षात १३० लाख मस्त्यबीज विविध जलाशयात सोडण्यात आले.

३.१७ **दुग्धव्यवसाय-**

जिल्हयात गाई, म्हैशी व संकरित जनावरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. जिल्हयासाठी पुणे येथे १९५० साली स्वतंत्र दुध योजना मंजूर झाली. १९७९-८० साली जिल्हयातील दैनंदिनी सरासरी दुध संकलन ८४ हजार लिटर होते. ते दि. ३१.१.२००६ अखेर ५२६ हजार लिटर झाले.सध्या पुणे व कात्रज येथे एक एक दुग्धशाळा आहे. मार्च २००६ अखेर जिल्हयात शासनाची व पुणे जिल्हा दुध उत्पादक संघाची एकूण १२ शीतकरण केंद्र आहेत. त्यांची क्षमता ९.१० लाख लीटर आहे.

३.१८ **सहकार-**

३१ मार्च,२००६ रोजी जिल्हयात सर्व प्रकारच्या २०९०७ सहकारी संस्था होत्या या सर्वाची सभासद संख्या ४० लाख ३८ हजार होती.

३.१९ **वीज-**

१९६०-६१ साली जिल्हयातील फक्त २४ खेड्यांना वीज उपलब्ध होती. गेल्या तीस वर्षात यात नेत्रदीपक प्रगती झालेली असून मार्च,२००६ पर्यंत १८४४ गावांना वीजेची सोय उपलब्ध झालेली आहे. विद्युतीकरणात होणाऱ्या वाढीचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे.

वीजेचा वापर घरगुती औद्योगिक व शेती अशा विविध कारणासाठी होतो. २००५-२००६ मध्ये जिल्हयात एकूण वीज वापर ६८८.६५ लाख किलोवॅट तास होता. घरगुती वापरांचे प्रमाण १७.२२% असून औद्योगिक वीज वापरांचे प्रमाण ५५.२८% आहे. तर व्यापारी, कृषी व इतर वीज वापरांचे प्रमाण अनुक्रमे ६.०८, १६.२९, व ५.१३% असे आहे.

### ३.२० वाहतुक व दळणवळण

शासन व जिल्हा परिषद तसेच नगरपरिषदा यांचे मार्फत रस्ते तयार करणे, त्यांची निगा राखणे ही कामे केली जातात. जिल्हयामध्ये मार्च, २००६ अखेर शासकीय व जिल्हा परिषद येथे अनुक्रमे ४६५७ व ९१४७ कि. मी. लांबीचे रस्ते होते. या व्यतिरिक्त नगरपालिका हद्दीतील ३६ कि. मी. लांबीचे रस्ते होते. त्यापैकी एकूण १२% रस्ते राष्ट्रीय व राज्य महामार्ग होते. तर ४०% जिल्हा व इतर जिल्हा रस्ते होते. पृष्ठभागाचे वर्गीकरणानुसार ४४% डांबरी होते. तसेच खडीचे पक्के रस्ते २७% आहे.

जिल्हयामधून मुंबई- बेंगलोर, पुणे- हैद्राबाद, व पुणे- नाशिक हे तीन राष्ट्रीय महामार्ग आहेत.

### ३.२१ नोंदणीकृत वाहाने

जिल्हयात ३१ मार्च, २००६ रोजी १८,५२,४०० स्वयंचलित वाहाने असून त्यापैकी १४०७०६० दुचाकी वाहाने व ३१७३१६ प्रवासी वाहने आहेत. तसेच जिल्हयामध्ये ३१.३.२००६ अखेर १२८०२४ मालवाहतूक वाहने आहेत.

### ३.२२ डाक, तारघरे व दुरध्वनी

जिल्हयात ३१.३.२००६ रोजी ७९३ डाकघरे कार्यरत होती. जिल्हयात ३१.३.२००६ रोजी.

### ३.२३ उद्योग

१९४८ च्या फॅक्टरी ॲक्ट या कायद्यानुसार डिसेंबर २००४ अखेर ३७३० कारखाने नोंदविलेले होते. त्यापैकी २६५९ चालू होते. या कारखान्यामध्ये२०३४१५ कामगार काम करीत होते. जिल्हयात शेतीचे अवजारे नांगर, पंप  व इंजिने, कापड गिरण्या, औषधे, रबरी व प्लास्टीकच्या वस्तू साबण, नायलॉन, बिस्किटे, वीजेचे सामान,

भांडी, लाकडाची खेळणी असे अनेक  छोटे मोठे कारखाने आहेत.

खडकी व देहूरोडला केंद्र सरकारचा दारुगोळा बनिवण्याचा कारखाना आहे. पिंपरी येथे पेनिसिलीन, तळेगाव-दाभाडे येथे काचसामान व थर्मास, चिंचवड येथे रिक्षा, ट्र क व स्कुटर, लोणी काळभोर व पिंपरी येथे रेडिओ कारखाना आहे. जिल्ह्यात छोट्या उद्योगाचे प्रमाण वाढत आहे. जुन्नर येथे हातकागद बनविला जातो. याच तालुक्यात मेंढरे पाळून त्याच्या लोकरीपासून घोंगडी विणण्याचा व्यवसाय चालतो. जुन्नर व खेड तालुक्यात भूईमूगाचे तेल काढण्याच्या गिरण्या आहेत. विड्या वळणे, दोर बांधणे कोंबड्या राखणे हे घरगुती उद्योग मोठ्या प्रमाणात चालतात. जिल्ह्यात हावेली, जुन्नर, भोर, शिरुर व मुळशी, आंबेगाव येथे प्रत्येकी १ साखर कारखाने आहेत. तसेच दौंड बारामती तालुक्यात प्रत्येकी २ व इंदापूर तालुक्यात ३ साखर कारखाने आहेत.

जिल्ह्यात पुणे, हडपसर, गुलटेकडी, पर्वती, बारामती भोर व लोणी काळभोर या ठिकाणी औद्यागिक वसाहती आहेत. या शिवाय महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पिंपरी-चिंचवड, भोसरी क्षेत्रात मोठे औद्योगिक क्षेत्र विकसित केले आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहती बारामती, जेजरुरी, कुरकुंभ येथे विकसित केल्या आहेत.

## ३.२४ शिक्षण

जिल्ह्यात २००२-०३ यावर्षी ४०४० प्राथमिक, १९९९ माध्यमि व उच्च माध्यमिक संस्था होत्या. त्या संस्थानामध्ये अनुक्रमे ७.८०लाख,६.७० लाख विद्यार्थी पटावर होते. तर सन २००३-०४ मध्ये ७३ कनिष्ठ महाविद्यालयीन संस्था होत्या. त्या संस्थामध्ये ०.९१ लाख विद्यार्थी पटावर होते. सामान्य शिक्षण महाविद्यालया

व्यतिरिक्त जिल्ह्यात वैद्यकिय महाविद्यालये ४ असून आयुर्वेदिक ५ महाविद्यालये, १२ शिक्षण विषयक पदवी महाविद्यालये व १५ पदवीका महाविद्यालये कार्यरत होती. जिल्ह्यात एकूण १५ औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत. औंध प्रशिक्षण संस्था सर्वात मोठी असून या ठिकाणी मुलीसाठी एकमेव संस्था आहे.

## ३.२५ सार्वजनिक आरोग्य व वैद्यकिय सेवा

जिल्ह्यामध्ये वैद्यकिय सुविधा व साधने यामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. वर्ष २००५-०६ अखेर जिल्ह्यात ४८ रुग्णालये, ८५ दवाखाने, ४८ प्रसुतिगृहे व ९६ प्राथमिक आरोग्य केंद्र होती. लोकसंख्याची बेसुमार वाढ थोपवण्यासाठी शासनाने कुटूंब नियोजन कार्यक्रमाचा मोठ्या प्रमाणावर प्रचार केला आहे.[१६]

****

१६. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, पुणे जिल्हा, २००५-२००६ प्रकाशन अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन, पृ.२ ते ८

## ३.२ आंबेगाव - तालुका आरेखन

''आंबेगाव, भिमाशंकर आणि लाखनपूर या विभागाच्या मध्ये वसलेले आहे. पुणे जिल्ह्याचा उत्तरेचा तालुका म्हणजे आंबेगाव तालुका. सह्याद्रीच्या डोंगररांगाच्या पायथ्याला आंबेगाव तालुका दोन विभागात विभागला आहे. उत्तर विभाग, दक्षिण विभाग. उत्तर विभागात पावसाचे प्रमाण कमी आहे. दक्षिण विभागात जोरदार पावसाचा असल्यामुळे येथे घनदाट जंगल आढळते तसेच आनेक जंगली प्राणी, पध्दती सहज नजरेला पडतात. उदा. वाघ, बिबट्या, लांडगा, हरिण, कोल्हा, ससा इ. पक्षी मोर, बुलबुल, पोपट इ.

दोन नदी या भागात आहेत. घोड, डिंभे शेतीला पाणी पुरवठ्याचे प्रमुख स्त्रोत म्हणजे घोड नदी. १०० मीटर उंचीचे डिंभे धरण याच भागात असून त्याची क्षमता १३.५ (टी.एम.सी.) प्रसिध्द भिमाशंकर मंदीर याच भागात आहे.''*

### ३.२.१ आंबेगाव तालुका

- ✻ राष्ट्रीय महामार्ग - पुणे नाशिक (रोड क्र. ५० )
- ✻ लोकसंख्या - १९९१ च्या जनगणनेनुसार अंदाजे १,८६,८०९
- ✻ नदी - मीना, घोड, वेळू
- ✻ राज्य महामार्ग - शिरूर ते भिमाशंकर (मंचर ते भिमाशंकर ६३ किमी)
- ✻ रेल्वे - नाही. (जवळचे रेल्वे स्टेशन पुणे)
- ✻ आंबेगाव सीमा - उत्तर दक्षिण (लोणी ते भिमाशंकर) पुर्व-पश्चिम (पेठ ते कळंब)
- ✻ जंगल विभाग - भिमाशंकर
- ✻ एकूण खेडे - १४२ (शहरे - मंचर आणि घोडेगाव)
- ✻ पवित्र ठिकाण - भिमाशंकर (आंबेगावच्या सीमेवर)

---

✻ website : https://mail.google.com : Ambegaon District (Pune Diary.com)

* दुध संकलने केंद्रे - १९७
* शिक्षण व्यवस्था - माध्यमिक विद्यालय २, केंद्रीय शाळा २३, प्राथमिक शाळा २२२, आश्रम शाळा ५, जिल्हा परिषद बालवाडी ७४
* शिक्षक - ८२५, तलाठी ३३, पोलीस पाटील १०३, कोतवाल १०५.[१७]

### ३.२.२ आंबेगाव तालुक्याची सर्वसाधारण माहिती

* मुख्यालयाचे ठिकाण - घोडेगाव
* जिल्हा मुख्यालयापासूनचे अंतर - ७६ कि.मी.
* तालुक्याच्या चतु:सीमा - तालुक्याच्या पूर्वेस शिरूर तालुका, पश्चिमेस ठाणे जिल्हा, दक्षिणेस खेड तालुका, उत्तरेस जुन्नर तालुका.
* महसुली गावांची संख्या - १३८
* आदिवासी क्षेत्रातील गावे - ५८
* एकूण ग्रामपंचायतीची संख्या - १०३
* आदिवासी ग्रामपंचायत संख्या - ३७
* पंचायत समिती स्थापना वर्ष - १/५/१९६२
* पंचायत समितीचे एकूण सदस्य - १०
* तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्य - ५
* तालुक्याची लोकसंख्या

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | पुरूष | - | ९२६६५ |
| (ब) | स्त्रिया | - | ९४२२४ |
| | एकूण | - | १८६८८९ |

* अनुसूचित जातीची लोकसंख्या - ६४६१

१७ website : https://mail.google.com : Ambegaon District (Pune Diary.com)

✻ अनुसूचित जमातीची लोकसंख्या - ३८४६६

✻ एकूण कुटूंबाची संख्या - ३३४८५

✻ आदिवासी भागांतील कुटूंबे - २३२४९

(अ) अनु. जातीचे कुटूंबे - १५४२

(ब) अनु. जमातीचे कुटूंबे - ५१७९

✻ तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र - १०४२९८ हे.

१) तालुक्यातील एकूण लागवडीलायक क्षेत्र - १७२९४ हे.

२) खरीप पिकाखालील क्षेत्र - ३३००० हे.

३) रब्बी पिकाखालील क्षेत्र - २७१०० हे.

४) वनीकरणाखालील क्षेत्र - २३,७६२ हे.

५) पडिक क्षेत्र - ५१३ हे.

✻ तालुक्याचे सरासरी पर्जन्यमान - ८६४ मि. मीटर

✻ तालुक्यातील प्रमुख नद्या (१) घोडनदी

(२) भीमा नदी

✻ तालुक्यातील महत्वाची पिके व त्याखालील क्षेत्र -

| | | |
|---|---|---|
| १) | भात | ३८०० हे. |
| २) | बाजरी | १५००० हे. |
| ३) | भूईमूग | ५५०० हे. |
| ४) | नाचणी | २२०० हे. |
| ५) | ज्वारी | ५०० हे. |
| ६) | भाजीपाल | ३८७ हे. |
| ७) | ऊस | ८०० हे. |
| ८) | गहू | १६०० हे. |

✻ आदर्श गाव योजनेअंतर्गत गावे - ५

१) गावडेवाडी

२) चांडोली बु.

३) धोंडमाळ / शिंदेवाडी.

४) तांबडेमळा

५) भराडी

✻ तालुक्यातील रस्ते

१) द्रुतगती मार्ग - पुणे-नाशिक (राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० )

२) राज्यमार्ग - १) भीमाशंकर-मंचर-बेल्हे (राज्यमार्ग क्र. ५३)

२) जेजुरी-बेल्हे (राज्यमार्ग क्र. ६१ )

✻ तालुक्यातील पिण्याचे पाणी पुरवठा करण्याची साधने

१) नळ पाणीपुरवठा योजना संख्या - ७

२) सार्वजनिक विहिरींची संख्या - ५७७

३) कूपनलिकांची संख्या - ५६७

४) लघु पाणीपुरवठा योजना - ३९

✻ तालुक्यातील शैक्षणिक सुविधा -

१) प्राथमिक शाळा - २२२

२) केंद्र शाळा - २३

३) माध्यमिक शाळा - ४१

४) औद्योगिक प्रशिक्षण संस्था - १

५) आश्रमशाळा - ५

६) जिल्हा परिषद बालवाड्या - ७५

७) ए. बा. वि. प्र. अंतर्गत

आंगणवाड्या - २६३

८) वाचनालय / ग्रंथालये - ८८

### ३.२.३ व्यवसाय

आंबेगाव तालुक्यातील शहरी भागात ७९१३६ एवढे कामगार होते. पशुपालन, मासेमारी, रोपे लावणे इत्यादी कामे करणारे १९२८ मजूर होते. त्यापैकी पुरूष १६१७, व स्त्रिया ३११ होत्या. खाणकाम करणारे ६८ मजूर होते. पैकी ६१ पुरूष व ७ स्त्रिया होत्या. उद्योग व्यवसायात ११४८ लोक होते. पैकी ८२३ पुरूष, ३२५ महिला होत्या. घरगुती उद्योग व लघुउद्योगात २३४९ लोक गुंतले होते. पैकी २०९२ पुरूष, २५७ महिला होत्या. बांधकाम व्यवसायात १३५६ लोक होते पैकी १०९९ पुरूष, २५७ स्त्रिया होत्या. व्यापार व्यावसायात २८६७ जन गुंतले होते. इतर व्यवसायात ४७८३ लोक होते.

### ३.२.४ दुग्धव्यावसाय -

गिरवली, चिंचोली, काशिंबबेग, भुगाव, तांबडेमळा, घोडेगाव, लांडेवाडी, शेवाळवाडी, कारेगाव, पेठ, घोडा, चिंचोडी, कुरवंडी, शिंदेमळा, पारगाव तर्फ खेड, कोटबंदरा, वाळुंगवाडी, निगुटवाडी, मोरडेवाडी, अवसरी खु., अवसरी बु, गावडेवाडी, पहाडदरा, धामणी, पोंदेवाडी, जारकरवाडी, निरगुडसर, लाखनगाव, काठापूर, पारगाव तर्फ अवसरी, शिंगवे, खडकी, नांदूर, चांडोली बु, रांजणी, कळंब, एकलहरे, लौकी, टाकेवाडी, ठाकरवाडी या गावातून दुग्धव्यावसाय चालतो.

### ३.२.५ लघुसिंचन-उपसा-जलसिंचन

गोऱ्हे बु, कानसे, गंगापूर खु, धोंडमळा शेणोली, गिरवली, चास, चिंचोडी वडगाव, साकोरे, महाळूंगे, पडवळ, एकलहरे, चांडोली खु, पिंपळगाव तर्फ महाळुंगे खडकी, नागापूर, रिगुडसर, पारगाव तर्फ, अवसरी शिंगवे.

### ३.२.६ मधुमक्षिकापालन

अहुपे, पिंपरगणे, डोण, तिरपाड, आसाणे, माळीण, आमेड, वचपे, बोरघर, बलवीरवाडी, कुशिरे बु, साकिरे, कोंढवळ, शिंदेवाडी, राजापूर, फुलोढे, मधाली, जांभोरी, तळेघर आणि कोलतावडे या गावातून मध गोळा करण्याचा व्यवसाय चालतो.

### ३.२.७ वीटभट्टी व्यावसाय

डिंबे खु, गंगापूर बु, घोडेगाव, चास, नारोडी, मंचर, पेठ, कळंब अवसरी खु. पारगाव तर्फ अवसरी, कळंब या गावातून हा व्यावसाय चालतो.

### ३.२.८ शेळी-मेंढीपालन

महाळुंगे पडवळ, टाकेवाडी, कुरवंडी, भावडी, कोलारवाडी, लौकी, थोरांदळे, जाधववाडी, खडकी, खडकवाडी, लोणी, साकोरे या ठिकाणी शेळी-मेंढीपालन केले जाते.

### ३.२.९ हिरडा खरेदी-विक्री व्यावसाय

ढगेवाडी, कोंठवळ, राजपूर, फुलोदे, जांभोरी, तळेघर, बलवीरवाडी, पिंपरगणे, असाणे, माळीण, गोटे बु, अमाडे, अडिवरे, बोरघर, कोलतावले, गोटे खु.

### ३.२.१० मत्स्यव्यावयास

पांचाळे, डिंभे खु, डिंभे बु, फुलवडे, कानसे, गोटे बु, गंगापूर बु, घोडेगाव, नारोडी, चास, वडगाव, कळंब, चांडोली बु, चांडोली खु, खडकी, जावळे, पिंपळगाव तर्फ, महाळूंगे, निरगुडसर, शिंगवे, पारगाव तर्फ, अवसरी, काठपूर. [१८]

### ३.२.११ आंबेगाव तालुक्याचे पर्जन्यमान व विभागानुसार पीक पध्दती

आंबगाव तालुका विस्ताराने पुर्व पश्चिम असल्याने पडणाऱ्या पावसाच्या प्रमाणानुसार नैसर्गिकरित्या तीन भाग पडले आहेत. त्या विभागाचे पर्जन्यमान खालील प्रमाणे.

### १) पश्चिम विभाग

पश्चिम विभाग भिमाशंकर ते शिनोली या भागातील ६२ गावांचा समावेश होतो. हा विभाग अति पावसाचा असुन १२०० ते २५०० मि.मी. पाऊस पडतो. प्रामुख्याने या विभायांत आदिवासी जमातीचे लोक राहातात. खरीप हंगामात भात, नाचणी, कारळे, भूईभूम ही पिके प्रामुख्याने या विभागात घेतली जातात.

---

१८. आंबेगाव दर्शक २००० प्रकाशन अक्षरमानव, मंचर, पृ.४५ते ६०

## २) मध्य विभाग

पिंपळगाव घोडे ते मंचर या भागातील ३६ गावांचा समावेश या विभागांत होतो. ६०० ते १००० मि. मी. पाऊस या विभागात पडतो. प्रामुख्याने या विभागात भात, बाजरी, भूईमूग, बटाटे उडीद, कारळे, वाटाणा, इतर कडधान्ये भाजीपाला, ऊस ही पिके या भागात खरीप हंगामात घेतली जातात.

## ३) पुर्व विभाग

हा विभाग कमी पावसाचा असून ४०० ते ५०० मि. मी. पाऊस पडतो. मंचर ते लाखणगांव या पट्ट्यातील ४४ गावांचा समावेश या विभागात होतो. बाजरी, भूईमूग, तूर, इतर कडधान्य व ऊस इत्यादी पिके या विभागात घेतली जातात.[१९]

### सन २००९-२०१० मध्ये ४७६.६० मि. मी. पाऊस झाला आहे.

१) तालुक्याची पर्जन्यमान सरासरी - ७५० ते ८०० मि. मी. इतकी आहे.

२) डिंभे धरण पाण्याची साठवणूक क्षमता - १३.७५ टी. एम. सी.

३) उपयुक्त पाणी साठा - १२.७५ टी. एम. सी.

४) मृत पाणीसाठा - १.०० टी. एम. सी.

५) दिनांक २५/५/२०१० अखेर डिंभे धरणातील शिल्लक पाणीसाठा - १.६१ टी. एम. सी.(९२.९८%)

६) डिंभा धरण डावा कालव्याखालील सिंचन क्षेत्र - २१२४ हेक्टर

७) डिंभा धरण उजव्या कालव्याखालील सिंचन क्षेत्र - ८६६१ हेक्टर

(स्त्रोत - पंचायत समिती आंबेगाव, जि. पुणे कृषी विभाग २०१०-२०११ नियोजन व आढावा)

१९. पंचायत समिती आंबेगाव, जि. पुणे कृषि विभाग, खरीप हंगाम, २०१०-२०११, नियोजन आढावा सभा, वृत्तांत दि. २६.५.२०१० पृ.२

## कोष्टक क्र. ३.१

***   खरीप हंगाम २००९-२०१० चा आढावा व खरीप हंगाम २०१०-२०११ नियोजन**

आंबेगाव तालुक्याची सर्वसाधारण माहिति व भुमीउपयोगिता वर्गीकरण

तालुक्यातील महसुली गावांची संख्या १४२, पैकी आदिवासी भागातील गावांची संख्या ६२, ग्रामपंचायत १०३

| अ.क्र. | बाब | क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|
| १) | एकूण भौगोलिक क्षेत्र | १०४,६५८.९१ |
| २) | वनाखालील क्षेत्र (हे) | १९८४१ |
| ३) | पिकाखालील क्षेत्र (हे) | ७४९०० |
| | अ) खरीप | ३६८०० |
| | ब) रब्बी | ३५२०० |
| | क) उन्हाळी | २९०० |
| ४) | खातेदाराची संख्या | ५८७६० |
| ५) | अ) बिगर आदिवासी उपयोगाकरिता आणलेले क्षेत्र | ६४८.५० |
| | ब) ओसाड जमिन व मशागतीस अयोग्य क्षेत्र | ६५८३.८७ |
| | एकूण (अ + ब ) पेरणीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | ७२३२.३७ |
| ६) | अ) कायमची कुरणे व चराऊ कुरणे क्षेत्र | २४७.५८ |
| | ब) झाडे झुडपे व फळझाडाखालील क्षेत्र | ७६०५.५० |
| एकूण (अ + ब) पडीक जमीन सोडून इतर मशागतीस अयोग्य क्षेत्र | | ७८५३.०८ |
| ७) | अ) चालू पडीक क्षेत्र | ३४२९.७२ |
| | ब) इतर पडीक क्षेत्र | २१५५.२३ |
| | क) मशागतीस योग्य पडीक क्षेत्र | ४९५७.५० |

| | | |
|---|---|---|
| | एकूण (अ + ब + क) पडीक क्षेत्र | १०५४२.४५ |
| ८) | एकूण सिंचन क्षेत्र<br>(भौगोलीक क्षेत्राच्या २५.२९%) | २६४७३ |
| ९) | अ) निव्वळ पेरणी केलेले क्षेत्र | ७४९०० |
| | ब) दुसोटा क्षेत्र | २१४१८ |
| | एकूण ( अ + ब ) पिकाखालील क्षेत्र | ८१८३०.०१ |

**(संदर्भ - पंचायत समिती आंबेगाव, जि. पुणे कृषी विभाग-खरीप हंगाम २०१०-२०११ नियोजन व आढावा सभा)**

**कोष्टक क्र. ३.२**

**आंबेगाव तालुक्यातील खरीप हंगामातील पीक व पेरणीची स्थिती**

| **अ.क्र.** | **पिकाचे नाव** | **सरासरी क्षेत्र (हेक्टर)** | **पेरलेले क्षेत्र (हेक्टर)** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| १) | भात | ४७०० | ४०० पेर भात<br>४३०० लाव भात | १००% |
| २) | बाजरी | १४२०० | १५०० | ११% |
| ३) | ज्वारी | ७०० | ५०० | ७१% |
| ४) | रागी | १२०० | १२०० | १००% |
| ५) | मका | ७०० | ८०० | ११४% |
| ६) | इतर तृण | १०० | १०० | १००% |
| ***** | **एकूण तृणधान्य** | **२१६००** | **९४००** | **४३%** |
| ७) | तुर | ६०० | ५०० | ८१% |
| ८) | मुग | ४०० | ३०० | ७५% |
| ९) | उडिद | ५०० | ४०० | ८०% |
| १०) | इतर कडधान्य | ११०० | ८०० | ७३% |
| ११) | एकूण कडधान्य | २६०० | २००० | ७७% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ***** | **एकूण अन्नधान्य** | **२४२००** | **१०२००** | **४२%** |
| १२) | भुईमूग | ५३०० | ४५०० | ८५% |
| १३) | तीळ | ६०० | ४०० | ६७% |
| १४) | काराळा | ५०० | ४०० | ८०% |
| १५) | सुर्यफुल | – | – | – |
| १६) | सोयाबीन | – | १०० | – |
| १७) | इतर गळीत धान्य | – | – | – |
| ***** | **एकूण** | **६४००** | **५४००** | **८४%** |
| १८) | कापूस | – | – | – |
| १९) | ऊस | २१०० | ३१०० | – |
| ***** | **एकूण खरीप** | **३२७००** | **१९९००** | **६१%** |

*** पर्जन्यमान**

| | |
|---|---|
| २७-८-२०१० | ३४.६० |
| २८-८-२०१० | ४.०० |
| २९-८-२०१० | ०.० |
| ३०-८-२०१० | ४२.०२ |
| ३१-८-२०१० | २८.०० |
| १-९-२०१० | १५.०० |
| २-९-२०१० | ४.०० |
| **एकूण** | **१२७.६२** |

* आठवड्याचा एकूण पाऊस – १२७.६२

* ०१ जून २०१० पासून एकूण – ५५२.६४, पावसाचे एकूण दिवस – ३९

**(संदर्भ – महाराष्ट्र शासन कृषि विभाग विस्तार – सन २०१० – २०११ कार्यालय, तालुका कृषी अधिकारी आंबेगाव (घोडगाव) पुणे– अंतिम अहवाल २६-८-२०१० अखेर)**

### ३.२.१२ शेतीविषयक -

**मुख्य पिके**

१) **भात** - आहुपे, बलवीरवाडी, पिंपरगणे, डोण, तिरपाड, कापरवाडी, ढगेवाडी, शिंदेवाडी, पालखेवाडी, राजपूर, मधाली, फुलोदे, असाणे, माळीण, पोखरी, राजेवाडी, गोऱ्हे खु., गोऱ्हे बु., बोरघर, माळवाडी, गंगापूर खु, गंगापुर बु., पिंपळगाव, पवारवाडी, या ठिकाणी भाताचे पिक जास्त होते.

२) **खरीप पिके** - कुरवंडी, भुगाव, कारेगाव, पिंपळवाडी, सावंतवाडी.

✻ बाजरी - पिंपळवाडी, वडदरा, रानमळा, लाखणगाव, ठाकरवस्ती, मुळेवाडी, भोकरे वस्ती, थोरंदळे, गणेशवाडी, वडगाव, गायकवाड वस्ती, ठाकरवाडी, रिवली, माळवाडी या भागात प्रामुख्याने होते.

✻ ज्वारी - कुदळेवाडी, वेताळवाडी, सावंतवाडी, वाघवस्ती, घोडेगाव, चिंचोली, कळंब, वळसे, मळा, नागापूर, लाखनगाव.

✻ हरभरा - गावडेवाडी, पोंदेवाडी, करमळा वस्ती.

३) **व्यापारी पिके**

✻ कांदा - गवारवाडी, जोगविहीर फाटा, गणेशवाडी, सुलतानपूर, ठाकूर वाडी.

✻ बटाटा - जारकरवाडी, जोगविहीर फाटा, थोरांदळे, गणेशवाडी, ठाकूरवाडी, साकोरे, कुरवंडी, श्रीरामनगर, ढगेवाडी, अवसरी खु.

### ३.२.१३ आंबेगाव तालुक्यातील छोटी-मोठी वैशिष्ट्ये -

१) परदेशी मालावर बहिष्कार टाकण्याच्या चळवळीत या तालुक्याचा मोठा वाटा आहे. आणि तीचे नेतृत्व केले महाळुंगे पडवळ येथील युवकाने. तो म्हणजे स्वातंत्र्य

चळवळीतील हुतात्मा बाबू गेणू सैद. त्यांचे स्वातंत्र्यलढ्यातील बलीदान हे आंबेगावचे भूषण आहे.

२) भारतामधील १२ (बारा) ज्योतिर्लिंगापैकी पवित्र क्षेत्र श्री भीमाशंकर हे खेड आणि आंबेगावाच्या सिमेवर वसलेले आहे.

३) आंबेगाव तालुक्यातील थापलिंग येथील खंडोबाची यात्रा ही तालुक्याचे आगळेवेगळे आकर्षण आहे. यातच धामणीची यात्रा जिल्हयात प्रसिध्द आहे.

४) पुणे जिल्हयात भरणाऱ्या जनावरांच्या बाजारात मंचरच्या 'आठवडे बाजार' महाराष्ट्र ात प्रसिध्द आहे. हा बाजार खूप मोठ्या प्रमाणात दर रविवारी भरतो.

५) आंबेगाव तालुक्यातील रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या विद्यमाने आंबेगाव तालुक्यातील मंचरला असणारे सर्व विभागाचे कै. अण्णासाहेब आवटे हे महाविद्यालयात आज मोठ्या डौलाने शिक्षणाचे पवित्र कार्य करत आहे.

६) आंबेगाव तालुक्यातील वाहाणाऱ्या घोडनदीवर डिंभे हे धरण उभारले गेले आहे. धरणांचे डावे- उजवे कालवे तालुक्यातून जातात.

### ३.२.१४ आताचा आंबेगाव तालुका-

या तालुक्याचे क्षेत्रफळ ४०१५ चौरस किलोमीटर असून श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भीमा नदीचा उगम झाला असून ही नदी पुढे खेड तालुक्यातून वाहत जाते. तालुक्याचे वरदान ठरू पाहाणारी घोडनदी ही पुर्ववाहिनी असून तिचा उगम आहुपे या ठिकाणी झाला आहे. सध्या या नदीवर अवलंबीत असे बरेच क्षेत्र आहे. महसूल पंचायत समिती, न्यायालय व इतर विविध खात्यांची प्रमुख कार्यालये घोडेगाव येथे असून  हे एक प्रमुख बाजारपेठ आहे. आंबेगाव हे हिरडा उत्पादनाचे प्रमुख केंद्र आहे.

तालुक्याचे मध्यवर्ती व सर्वात मोठे व्यापारी दळणवळणाचे केंद्र मंचर येथे कला, वाणिज्य व शास्त्र शिक्षणाचे केंद्र असून पदव्युत्तर शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करलेल्या महाळंगे पडवळच्या हुतात्मा बाबू गेणू यांचा त्याग व तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांनी स्वातंत्र्याकरिता केलेला प्रयत्न व त्याग अमोल आहे. १९६२ च्या तुलनेने आज तालुक्याने विविध क्षेत्रात भरीव कार्य केलेले आहे. यामध्ये तालुक्यातील अनेक शाळांनी, शिक्षकांनी, शेतकऱ्यांनी, कर्मचाऱ्यांनी, जिल्हा परिषद, राज्य, राष्ट्रीय पातळीवर तालुक्यास बहुमान प्राप्त करून दिला असून १९८८ हे रौप्यमहोत्सवी वर्ष तालुक्यानी साजरे केले आहे.

वीस कलमी कार्यक्रमांतर्गत, शिक्षण, कुंटुंब कल्याण, प्राथमिक आरोग्य, समाजकल्याण, शेती, पशुसंवर्धन व आदिवासीसाठी विविध उपाययोजना कार्यक्षम रितीने राबवून उल्लेखनीय यश पंचायत समितीने मिळवले आहे.

शालेय मुलांना सकस आहार योजनेअंतर्गत ५९ शाळातील ३१२१ लाभार्थीना लाभ मिळतो. शाळेच्या इमारती १९८७ अखेर नविन बांधण्यात आल्या. तालुक्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक संस्थाना इमारत बांधकामासाठी अल्पबचत निधीतून १४,६१,००० रूपये निधी देण्यात आला.

## ३.२.१५ आंबेगाव तालुक्यातील तीर्थ व पर्यटनस्थळे -

- श्री कुलस्वामी खंडेराय, लोणी, धामणी.
- भार्गवराव भागडेश्वर, वळती
- नृसिंह देवालय, राम मंदीर, रांजणी
- वेळेश्वर महादेव देवस्थान,कुरवंडी
- घोडनदी उगमस्थान, आहुपे
- हरिश्वर महादेव मंदीर, घोडेगाव.

* श्री वाळेश्वर महादेव मंदीर पेठ
* श्री भैरवनाथ देवस्थान, अवसरी
* निरगुडेश्वर निरगुडसर
* तपनेश्वर महादेव दुदुंभी तळे, मंचर- भीमाशंकरचे विसावास्थान
* कमळजादेवी शक्तिपीठ, भीमाशंकर
* अष्टविनायक अर्धपीठ, वडगाव काशिंबेग.
* डिंभे धरण व जलविद्युत प्रकल्प.
* सौरंगनाथ (सुवर्ण पर्वत) भावडी (दत्त मंदीर)
* कमळजादेवी, कळंब.
* राममंदीर पिंपळगाव.
* शामाधर पर्वत, एकलहरे
* रामेश्वर, महादेव पांडवकालीन बभ्रुवाहन मंदीर, मणिपूर, मंचर.
* भैरवनाथ खिंड- लांडेवाडी.
* दत्तमंदीर- शिणोली
* राममंदीर, आंबेगाव गावठाण
* (पाचपीर), वडगाव पीर.
* अहिल्याबाई होळकरांचा किल्ला, वाफगाव.

### ३.२.१६ निसर्ग-

‘‘ सहयाद्री पर्वताच्या रांगात वसलेल्या अहुपे या गावी घोडनदी उगम पावते. भीमा नदीच्या उगमस्थळापासून घोडनदीचे उगमस्थान उत्तर दिशेकडे ९ मैलांवर आहे. समुद्रसपाटीपासून या स्थानाची उंची २७०० फूट आहे,’’[२०] तेथून सुमारे ८०० फूट खोल

२०. बॉम्बे डिस्ट्रीक्ट गॅझेटर्स, पुणे डिस्टीक्ट १९५४, पृ.७

घोडनदीचे पात्र दरित उतरते आणि तेथून १६ किलोमीटर अंतरावर असलेल्या आंबेगावात ती शिरते. आंबेगावापासून अग्नेय दिशेस घोडनदीचे पात्र वळण घेते.आणि घोड, वडगाव या गावांना जाते. हि गावे खेडच्या उत्तरेकडे आहेत. घोटनदीस पुढे मीना नदी मिळते. अशा रीतीने सह्याद्री पर्वताच्या रांगावर पडणारे पाणी घोडनदीच्या माध्यमातून आंबेगाव तालुक्यास मिळते.

आंबेगाव तालुक्यास निसर्गाचे वरदान लाभले आहे. डोंगरी भागात उगवणारी अनेक झाडे, वेली, फुले, गवत, रानवृक्ष या भागात आहेत. भीमाशंकर हे प्रसिध्द देवस्थान याच क्षेत्रात आहे.

भीमाशंकर हे छोटेसे महाबळेश्वरच आहे. देवस्थानाच्या पश्चिमेस दाट जंगल आहे. जंगलात अंजनी, जांभूळ, पीसा या जातीचे झाडे अधिक प्रमाणात आहेत. या तालुक्यातील जंगल राखीव ठेवले आहे. जंगलाखालील क्षेत्र ६२ चौरस मैल आहे. त्यापैकी ३४ चौरस मैल क्षेत्र पश्चिम घाटाकडचे आहे. आंबेगाव तालुक्याची ती पश्चिम सरहद्द होय. श्रावण महिन्यात शंकराच्या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक भीमाशंकरला येत असतात. मंदीरानजीक असलेले ७२५ एकर क्षेत्र राखीव ठेवले आहे. डोंगरी भागातील वनस्पती सदैव टवटवीत राहावी, वनक्षेत्रात उताडपणा येऊ नये म्हणून या राखीव क्षेत्रात रोप वाटीकेसारखी रोपे तयार केली जातात. पुणे जिल्हयातील विशेषत: खेड, जुन्नर आंबेगाव हे तालुके सदैव ‘हरित’ दिसावेत यासाठी वनखात्याने ही व्यवस्था केली आहे.

### ३.२.१७ भीमाशंकर

पुणे जिल्हयात खेड (राजगुरूनगर) वाडे, घोडेगाव या भागात सह्याद्रीच्या एका फाट्यावर उंच उंच भागात भीमाशंकर हे पवित्र क्षेत्र आहे. या फाट्यात रथाचल आणि भीमाशंकरचे डोंगर अशी नावे आहेत. येथील दाट अरण्यात वाघ आहेत. जंगली श्वापदे, वनऔषधीचे भांडार आहे. भीमाशंकर अपत्तीबद्दल भीमकाय रूद्र, भीमारी शंकर, स्वयंभू महादेव या कथा पुराणात आहेत.शीपलाला मृत, गुरूचरित्र, स्तोत्ररत्नाकर इत्यादी ग्रंथात

भीमाशंकरचे वर्णन आहे. गंगाधर पंडीत, रामदासस्वामी, श्रीधरस्वामी, नरहरीमाळी, ज्ञानेश्वर तर हे क्षेत्र म्हणजे 'स्कंदासी उपदेश स्थान, पुरखा पुण्यक्षेत्र' असे वर्णन केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज, राजाराम महाराज, बाळाजी विश्वनाथ, रघुनाथदादा पेशवे, पुण्याचे चिंतामणी अंताजी नाईक- भिडे सावकार, नाना फडणीस यांनी भिमाशंकर मंदीरास जीर्णोध्दार केला.

भीमाशंकर मंदीर हेमाडपंती दगडी बांधणीचे असून त्यावर दशावताराच्या सुरेख मूर्ती आहेत. नंदीचे ही स्वतंत्र मंदीर आहे. हे वन पूर्वी राफेनी- डाकिनी आदिचे वस्तीस्थान होते. भीमा, भीयरथी नदीचे उद् गमकुंड अद्यापही तेथे आहे. मोक्षकुंड, ज्ञानकुंड, गुप्तभीमेश्वर, साक्षी विनायक, गोरखनाथांचा मठ, कमलजा देवीचे स्थान, कमलजा तळे, हनुमान तळे इत्यादी प्रसिध्द स्थळांचा अभ्यास करताना तेथील पाण्यात उपयुक्त क्षार, ओझोन व औषधी गुण असल्याचे आढळते.

वैश्वीक उर्जास्त्रोतांतील अल्ट्राव्हायोलेट, रक्त-नाल किरणांचे चैतन्य या प्रदेशात प्रामुख्याने आढळते.

त्या अनुषंगाने होणारे वातावरणीय परिणामही दृष्टोत्पत्तीस येतात. कातडीचे योग बरे करण्याकरिता येथील झऱ्यातील पाण्याचा व सर्पगंधा- नागफनी, पांढऱ्या दुर्वाचा औषधी उपयोग होतो.आंबेगाव तालुक्यास निसर्गाचे वरदान लाभले आहे. डोंगरी भागात उगवणारी अनेक झाडे, वेली, फुले, गवत, रानवृक्ष या भागात आहेत. भीमाशंकर हे प्रसिध्द देवस्थान याच क्षेत्रात आहे.[२१] STUDY OF THE PEOPLE- FOREST RECATIONSHIP AND COCAL RESOURCE MANAGEMENT SYSTEMS IN THE BHIMA-SHANKAR AREA, DISTRICT PUNE, MAHARASHTRA. FINAL REPORT 2004 या 'शाश्वत' ट्रस्टच्या रिपोर्टवर नजर टाकली असता या परिसरातील प्राणी, वनस्पती, जलचर, पक्षी इत्यादीची विविधता जाणवते.

****

२१. डॉ. दीक्षित दुर्गा, महाराष्ट्र संस्कृतीकोष (संपादन) - डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २००९-१०, पृ. १४९

# आदिम समाज (आदिवासी)

''आदिवासी'' या शब्दाची परिभाषा करताना पं. महादेवशास्त्री जोशी यांनी भारतीय संस्कृती कोषामध्ये लिहले आहे की, '' आर्य व द्रविड हे भारतातील दोन मोठे मानव समाज सोडून, त्यांच्याही पुर्वी भारतात राहाणाऱ्या किंवा बाहेर देशातून येऊन वने व पर्वत यांच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या जमातींना 'वन्य जमाती' किंवा 'आदिवासी' म्हणतात'' पं. महादेवशास्त्री जोशींच्या मते भारतात प्राचीन काळी प्रोगो-ऑस्ट्रेलाईड, मंगोलाईड व मेग्रिटो हे भिन्न मानव वंश राहात होते.

जंगलाच्या आश्रयाने निवास करुन नैसर्गिक पर्यावरणात राहाणाऱ्या लोकांना काही लोक 'जंगलाचे राजे' म्हणतात. काही त्यांना 'धरतीचे लेकरे' म्हणतात. या लोकांचा उल्लेख 'आदिवासी किंवा आदिम समाज असाही केला जातो. विचारवंत, अभ्यासक, प्रशासक व सामाजिक कार्यकर्ते यांनी या समाजाला विविध नावे दिली. रिसले, लॅस्सी, एल्विन, ग्रिअर्सन, सेडविक, मार्टिन, ए.व्ही. ठक्कर यांनी या लोकांना 'अगदी प्राचीन' (Aboriginal) किंवा 'अगदी मुळचे रहिवासी' (Aborigines) म्हटले. [२२]

## ४.१ आदिवासींच्या मानवशास्त्रीय व्याख्या-

विविध मानवशास्त्रज्ञांनी व अभ्यासकांनी आदिम समाजाच्या केलेल्या व्याख्या.

१) गिलीन व गिलिन यांच्या मते, '' एक विशिष्ट भूप्रदेशावर राहाणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतीक जीवन जगणारा पण अक्षरओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुदायाला आदिवासी समाज म्हणतात.

२) डब्ल्यु जे पेरी यांनी आदिवासी समाजाशी वैशिष्ठ्ये सांगितली. ते म्हणतात ''समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एकाच समान भूप्रदेशावर वास्तव करणाऱ्या समुहाला आदिम समाज असे म्हणतात.''

---

२२. डॉ. वडिखाये रेखा : आदिवासी हलबांच्या अस्तित्वांचा अंतर्वेद, लाखे प्रकाशन, नागपूर, २८ सप्टे.०९, पृ. १३

महाराष्ट्रात आदिवासी प्रामुख्याने डोंगर दऱ्याच्या साधिन्यात आढळून येतो. प्रतिकूल परिस्थितीत निसर्गाच्या साथीने राहाणाऱ्या आदिवासीचे विभाजन प्रामुख्याने तीन विभागात झाल्याचे आढळते.

## ४.२ महाराष्ट्रातील आदिवासी

१) सह्याद्री विभाग - (ठाणे, नाशिक, पुणे, अहमदनगर, रायगड जिल्हे)

महादेव कोळी, वारली, कातकरी, कोकणा, ठाकर, ढोर, कोळी, मल्हार कोळी, काथोडी.

२) सातपुडा विभाग - (धुळे, जळगाव, अमरावती, औरंगाबाद, नांदुरबार जिल्हे)

भिल्ल, गावीत, धानका, पावरा, हुबळा, पारधी, कोलम, तडवी, माबची, कोरकू.

३) गोंडवन विभाग - (गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, नांदेड जिल्हे)

गोंड, माडिया गोंड, कोला, परधान, आंध, कोया, हलबा, करन [२३]

* पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुका डिंभा धरण परिसरातील प्रमुख आदिवासी जमाती.

    १) कोळी महादेव - अनुसूचित जनजाति (ST)

    २) कातकरी - आदिम जमात (Primitive Tribe Group-P.T.G.)

    ३) ठाकर - अनुसूचित जनजाति (ST)

---

२३. डॉ. दास्ताने संतोष : महाराष्ट्र २००८ प्रकाशन दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, सदाशिव पेठ, पुणे - ३०,२००८ पृ.३६

## ४.३ डिंभे जलाशय परिसर -

घोडेगावापासून अर्धा पाऊण तासाच्या प्रवासानंतर भिमाशंकर रस्त्याला उजव्या बाजूला डिंभे जलाशय लागतो. ''धरणाच्या पायाभरणीला १९७७ साली सुरूवात झाली आणि संपुर्ण धरण २००० रोजी पुर्ण भरले आणि त्यापरिसरातील जमिनी पाण्याखाली गेल्या.''[२४] धरणाच्या कडेकडेने अंशत: विस्थापित १९ गावे आहेत. या संपूर्ण गावांमधून ९९% आदिवासी राहातात. डिंभा जलाशय परिसर हा आंबेगाव तालुक्याचा पश्चिम विभाग असून हा अति पावसाचा विभाग आहे. पश्चिम भागात भिमाशंकर ते शिनोली या भागातील एकूण ६२ गावांचा समावेश होतो. डिंभे धरण पाण्याची साठवणुक क्षमता १३.७५ टी. एम.सी. इतकी आहे. १२८० हेक्टर क्षेत्रात पसरले आहे.

डिंभे जलाशय परिसरात राहाणाऱ्या प्रमुख जमाती महादेव कोळी, कातकरी, ठाकर या असून त्यांची उपजीविका शेती, (पडकई शेती), (गाळपेर शेती) मासेमारी, हिरडा गोळा करने, वनउपज, विटभट्टीवर काम करणे इ. साधनाद्वारे चालते तसेच कामनिमित्ताने स्थलांतर करण्याचे प्रमाणही मोठे आहे.

**कोष्टक क्र. ४.१**

**आंबेगाव तालुक्यातील डिंभे जलाशय परिसरातील १९ गावांची संक्षिप्त माहिती**

| अ.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | एकूण गावं | १९ |
| २ | एकूण ग्रामपंचायत | ०७ |
| ३ | लोकसंख्या | ८४५८ |
| ४ | एकूण कुटुंबसंख्या | १७२६ |
| ५ | पैकी दारिद्रयरेषेखालील कुटुंब संख्या | ४७५ |
| ६ | अंगणवाड्या | ३० |

२४. Tanksale Kalyan : Participatary system dynamics modeling of engery use and livelihoods of a forest dwelling community I.T.I. Bombay, July 2010, page 125.

| | | |
|---|---|---|
| ७ | प्राथमिक शाळा | २० |
| ८ | आश्रमशाळा | ०२ |
| ९ | प्राथमिक आरोग्य केंद्र | ०२ |
| १० | उपकेंद्र | ०६ |
| ११ | एकूण भौगोलिक क्षेत्र | ५३१८.४३ हेक्टर |
| १२ | जलमग्न क्षेत्र | २२०२ हेक्टर |
| १३ | प्रमुख पिके | नाचणी, भात, वरई, सावा |
| १४ | पशुवैद्यकिय दवाखाने संस्था | ०२ |
| १५ | मुख्य रस्ता असलेली गावे | ११ |
| १६ | मुख्य रस्ता नसलेली गावे | ०८ |
| १७ | पोस्ट ऑफिसची सोय असलेली गावे | ०५ |
| १८ | आठवडे बाजार असलेल्या गावांची संख्या | ०२ |

**(संदर्भ - मा. आयुक्त पुणे विभाग, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०-०५-२००५ रोजी झालेली बैठक टिपणी (पंचायत समिती आंबेगाव) डिंभे जलाशय दारिद्रय निर्मुलन कार्यक्रमाची संक्षिप्त माहिती.)**

# कोष्टक क्र. ४.२

## डिंभे जलाशय परिसरातील १९ गावांची सविस्तर माहिती [२६]

| अ. | गावाचे नांव | लोकसंख्या | एकूण कुटुंब | द्रारिद्र्य रेषेखालील | लाभ दिलेले | इंदिरा आवास | दारिद्र्य | दारिद्र्य क्षेत्र | गावास रस्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | संख्या | कुटुंब संख्या | कुटुंब संख्या | योजनेतील | रेषेखालील | रेषेखाली नसलेले | (हेक्टर) | कुटुंब संख्याबचत गट | बचत गट |
| १ | कुशिरे बु।। | २१६ | ४९ | १९ | ०४ | १४ | – | ०२३२७.०० | नाही |
| २ | कुशिरे खु।। | ३२९ | ६८ | २४ | ०३ | ११ | ०१ | ०१३४८.०१ | नाही |
| ३ | कोंढारे | २१९ | ५१ | ०७ | ०३ | ०६ | – | ०२२७१.०० | आहे |
| ४ | दिगद | १०० | ३६ | १० | ०३ | ०३ | ०१ | ०१२४०.०० | नाही |
| ५ | मेघोली | ११२ | २८ | २१ | ०२ | ०३ | – | ०११७०.९८ | आहे |
| ६ | पाटण | १६५ | २६ | ०८ | ०७ | ०४ | – | ०२४९३.०० | आहे |
| ७ | पिंपरी | २७३ | ५० | १८ | ०४ | ०३ | – | ०१६११.५८ | नाही |
| ८ | साकेरी | २०० | ३५ | १२ | ०३ | १० | ०१ | – ४१०.५२ | नाही |
| ९ | सावरली | ९३ | १७ | १९ | ०८ | ०१ | ०१ | – १२७.११ | नाही |
| १० | महळुंगे | ७१ | १८ | ११ | ०२ | ०२ | – | ०१ ५६.८५ | आहे |
| ११ | पंचाळे बु।। | २८९ | ५४ | ०६ | ०३ | ०६ | ०१ | ०४२९७.०० | आहे |
| १२ | पंचाळे खु।। | १६४ | ३५ | ०६ | ०२ | ०५ | – | ०३ ९१.१३ | नाही |
| १३ | वचणे | १७२ | १०१ | १८ | ०६ | ०८ | ०१ | ०१४६१.०० | आहे |
| १४ | अडीवरे | ३६१ | ६८ | १७ | ०५ | ०४ | ०१ | ०१२१८.०० | आहे |
| १५ | आंबेगाव जुना | – | – | – | – | – | – | – – – | |
| १६ | कोलतावडे | ३९१ | १४५ | ४५ | ०८ | १९ | ०१ | ०२१५१.०० | आहे |
| १७ | बेंढारवाडी | १५३२ | २१३ | ०२ | ०१ | १० | – | ०९५६०.०० | आहे |
| १८ | फुलवडे | १५२४ | २९५ | ८५ | १० | २८ | ०१ | ०५२६९.०० | आहे |
| १९ | बोरघर | २२३९ | ४३७ | १४७ | २५ | २५ | ०४ | ०७२१५.२५ | आहे |
| | **एकूण** | **८४५८** | **१७२६** | **४७५** | **९९** | **१६२** | **१३** | **४३५१९१.३२** | |

**([२६] संदर्भ – मा. आयुक्त पुणे विभाग, पुणे यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक १०-५-२००५ रोजी झालेली बैठक टिपणी – पंचायत समीती आंबेगाव कार्यालय)**

## कोष्टक क्र. ४.३

## डिंभे धरण परिसरातील गावांची एकूण पशुधन स्थिती

## सन २००७

| अ.क्र. | कार्यक्षेत्रातील | संकरित जनावरे | | देशी जनावरे | | म्हैसवर्ग | | एकूण पशुधन | शेळ्या | मेंढ्या | कोंबड्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गावे | बैल | गाय | बैल | गाय | रेडे | म्हैस | | | | |
| १ | बोरघर | १ | ५५ | ६४९ | ३१३ | ५९ | ३९९ | १४७६ | ५५९ | - | ७४७ |
| २ | फुलावडे | - | - | २५१ | १५५ | ७ | ११७ | ५३० | ३६१ | - | ४०३ |
| ३ | कोलतावडे | - | - | ८४ | ९३ | ४ | २९ | २१० | २६३ | - | ७९७ |
| ४ | सावरली | - | - | ३२ | २३ | ४ | १६ | ७५ | ९५ | - | १३५ |
| ५ | अडिवरे | - | - | ५६ | १९ | - | ८ | ८३ | १९८ | - | १०८ |
| ६ | पंचाळे बु।। | - | - | ६० | १३ | - | - | १९ | ९२ | - | १४८ |
| ७ | पंचाळे खु।। | - | - | ४५ | २१ | - | - | ९ | ७५ | - | १२० |
| ८ | वचणे | - | - | ६५ | ३५ | - | ५ | १०५ | १०२ | - | १२९ |
| ९ | पाटण | - | - | ६८ | ८७ | ५ | ४१ | २०१ | ९४ | - | २०१ |
| १० | कुशिरे खु।। | - | - | १२३ | १०२ | २ | १० | २३७ | १०४ | - | १९६ |
| ११ | कुशिरे बु।। | - | - | ४६ | १८ | - | १० | ७४ | ५९ | - | ९२ |
| १२ | दिगद | - | - | ३० | १२ | १ | १४ | ५४ | ६२ | - | १३१ |
| १३ | मेघोली | - | - | २२ | ५ | - | २ | २९ | ३२ | - | २६ |
| १४ | आंबेगाव | - | - | २२ | २२ | ९ | २९ | ८२ | ९२ | - | १५२ |
| १५ | कळबंई | - | १७ | ६ | १ | ३ | १३ | ४० | - | - | - |

**(संदर्भ - पचांयत समिती आंबेगाव-पशुसंवर्धन १८ वी पंचवार्षिक पशुगणना सन २००७)**

## ४.४ डिंभे धरण परिसरातील धरणाच्या कडेकडेने वसलेल्या १९ गावामधील प्रमुख जमाती

### ४.४.१ कातकरी

'' कातकरी जमातीत दोन पोट भेद आहेत. पहिला म्हणजे 'ढोर कातकरी' आणि दुसरी 'सोन कातकरी'. ढोर कातकरी गोमांस भक्षण करतात, तर सोन कातकरी गोमांस वर्ज्य समजतात. ढोर कातकरी हे सोन कातकऱ्यांपेक्षा कनिष्ठ दर्जाचे समजले जातात.

कातकरी लोकांचा खास असा कोणताही धर्म नसला तरी दे देवक माननारे आहेत. त्यांचा कोणताही पवित्र धर्मग्रंथ नाही किंवा त्यांचा कोणी धर्मगुरूही नाही. ते स्वतः कोणतीही प्रार्थना म्हणत असल्याचे दिसून येत नाही किंवा स्वत:साठी प्रार्थना म्हणण्याकरिता दुसऱ्या कोणा मध्यस्थाची योजना करत नाहीत. अपणावर वाघदेवाची विशेष कृपादृष्टी असून तो अपणांस कसलाही उपद्रव देत नाही अशी त्यांची श्रध्दा असल्यामुळे वाघदेव हे त्यांचे मुख्य आराध्यदैवत आहे. म्हणूनच ते त्याला बंदुकीने ठार मारु इच्छित नाहीत. सर्वसाधारणपणे जंगलात किंवा गावाच्या वेशीवर वाघाच्या मुर्तीची प्रतिस्थापना करण्यात येते.[२७]

कात बनवणे हा कातकरी लोकांचा पारंपारिक व्यवसाय होता. त्यांच्यापैकी काही लोक कोळसा पाडण्याचे काम करत असल्याचे आढळून येते. काही थोड्या लोकांकडे शेतजमिनी आहेत, परंतु त्या अतिशय तुटपुंज्या असून डोंगराळ भागात असल्यामुळे त्या सुपीकही नाहीत. त्यांच्यापैकी बरेच जण मजूर आहेत. व ते कंत्राटदाराच्या हाताखाली काम करतात. स्त्रिया जळाऊ लाकूड व इतर जंगली माल गोळा करून, तो जवळच्या बाजारात विकतात. कातकरी जमात ही अनुसुचित जमातींपैकी सर्वात गरीब जमात आहे.

''कातकरी त्यांच्या शारिरीक ताकद, शिकार, कौशल्य आणि सहनशीलता याकरिता ओळखला जातो. पुर्वी सर्व कातकरी जमात विशिष्ठ उद्योगातील ( कात) विशेषण म्हणून

२७. डॉ. गारे गोविंद : महाराष्ट्रातील आदिवासी जमाती कॉन्टिन्टेल प्रकाशन, पुणे - ३०, २०००, पृ. १०७

ओळखली जात असे. परंतु संपुर्ण कातकरी जमात हळूहळू दारिद्रयचक्रात आडकली गेली.बहुतेक कातकरी  कुंटुंबे कंत्राटी कामगार (bonded labour) म्हणून विटभट्यावर वर्षेनुवर्ष काम करताना दिसतात. माणसे, स्त्रीया, मुले या सर्वांना विटभट्टीवर  कामासाठी घरापासून दूर जावे लागते.याठिकाणी त्यांना अनेक पिळवणुकीला लैगिंक अत्याचाराला अपघाताला समोरे जावे लागते तसेच ' गुन्हेगार जमाती' म्हणून पोलिस सतत चोरी, दरोडे यासारख्या गुन्ह्याचा तपास म्हणून त्रास देत असतात.''[२८]

## ४.४.२ **महादेव कोळी**

' महादेव कोळी' हे डोंगर कोळी म्हणूनही ओळखले जातात. त्यांच्यात पुरूषप्रधान कुंटुंबव्यवस्था आहे. 'महादेव कोळी' जमातीत कोणतेही उपगट नाहीत. त्यांच्यात बहिर्विवाह करणारे कुंटुंबाचे गट असून एकेका गटात आडनावांनी ओळखली जाणारी १२ कुळे किंवा घराणी असतात. बारा कुळे मिळून बनलेल्या परिवाराला ' बारकुडे ' किंवा ' गोतेभाऊ ' असे म्हणतात.

महादेव कोळी हे नामाभिधान या लोकांना त्यांच्या वस्तीस्थानावरून पडले आहे. व्यवसायावरून नव्हे म्हणून महाराष्ट्रातील सालापूर, सांगली, धुळे, जळगाव, मराठवाडा, विदर्भ आणि कोकण किनारपट्टीतील ' कोळी ' गटांचे या जमातीशी सांस्कृतिक, सामाजिक किंवा वांशिक संबंध नाहीत. कोळी जातीचे इतर गट म्हणजे सोनकोळी किंवा मच्छिमार कोळी, पानभरे कोळी किंवा चुंबळे कोळी, सुर्यवंशी कोळी आणि ख्रिश्चन कोळी इत्यादी. या सर्व कोळी जाती बिगर आदिवासी संवर्गातील आहेत. अनुसुचित जनजातीच्या सवलती मिळवण्यासाठी आज त्या स्वत:ला ' महादेव कोळी ' म्हणवितात. [२९]

महादेव कोळी जमातीच्या मुख्य व्यावसाय शेती व शेतमजुरीचा आहे. शेती जुन्याच पध्दतीने  व तुटपुंज्या साधनसामग्रीवर केली जाते. त्यांच्या जमिनी माळराबाच्या व झिकस असतात त्यामुळे शेतीतून उदरनिर्वाहाला पुरेसे उत्पन्नही त्यांना मिळत नाही. ''ठ जनावरे पाळणे, जंगलाची कामे करणे, हिरडा, बेहडा, मोहारी व जंगल फळे गोळा करून विकणे हे

२८. website : https://mail.com.(Kathakari)

२९. डॉ. गारे गोविंद : महाराष्ट्रातील आदिवासी जमाती कॉन्टिन्टेल प्रकाशन, पुणे - ३०, २०००, पृ. १२६-१२७

त्यांचे दुय्यम व्यावसाय हात. या समाजातील अनेक कुंटुंबे दैन्यावस्थेत व दरिद्री जीवन जगताना दिसतात. डोंगराळ भागातील निकृष्ठ शेतामुळे या समाजात उर्जितावस्था अभावानेच आढळते. जोडधंदे व इतर व्यावसाय ४ वर्षभर पुरणारे नसतात.''

## ४.४.३ **ठाकर**

ठाकर, ठाकूर जमातीत दोन क्षेत्र आहेत. एकाला ' क ' ठाकूर ' क ' ठाकर म्हणतात. तर दुसऱ्यांना ' म ' ठाकूर ' म ' ठाकर म्हणतात. ' क ' ठाकरांची वस्ती जन्हार, वाडा, मोखाडा या भागात आहे. तर ' म ' ठाकर प्राधान्याने दक्षिणेकडे दिसतात. ' क ' ठाकरांपेक्षा ' म ' ठाकर सुधारलेले दिसतात . ठाकर जमातीची ही गटवारी कोणत्या कारणाने पडली असावी ह्याबद्दल ही संशोधकांनी निरनिराळी मते व्यक्त केली आहेत.

कुणी म्हणतात, कि महाल देशात राहाणारे म्हणून त्यांना 'म' ठाकर म्हणतात, तर 'क' हा शब्द कोकणवाचक असून कोकणांत राहणारे म्हणून 'क' ठाकर असा भेद रूढ झाला असावा असे काहींचे म्हणणे आहे. 'क' ह्याचा अर्थ कनिष्ठ असेही काही लोक म्हणतात.

ठाकर आपल्या शेतात मुख्यत: नागली व वरी हे धान्ये पिकवतो. त्यांच्या जोडीला भात, रताळी, मिरच्या व काही भाज्याही तो लावतो. घाटावरील पुणे, अहमदनगर व नाशिक या जिल्हयातील ठाकूर गहूदेखिल पिकवतो. शेतीचे कामे सुरू करण्यास ठाकूर मंगळवार हा दिवस अशुभ समजतात. व त्या दिवशी कामाची कधीच सुरूवात करीत नाहीत

'क' ठाकूर आपल्या शेतीचे काम सुरू करण्यापूर्वी कोंबडा बळी देतो. नागलीचा पेरा करण्यापूर्वी नागलीला कोंबड्याचे रक्त चोळण्याचा प्रघात ठाकूर लोकांत आहे. इतर धान्यालाही ह्याचप्रमाणे पेरण्यापूर्वी कांदा किंवा गोडेतेल लावण्याची प्रथा आहे. असे धान्याला लावल्याने ते उगवेपर्यंत सडत नाही किंवा खराब होत नाही अशी त्यांची समजूत आहे.

जोपर्यंत धान्याचे पेरे चालू असतात तोपर्यंत बायकांना घरात दळण्याची व पुरूषांना हजामत करण्याची परवानगी नसते. [३०]

३०. डॉ. गारे गोविंद : महाराष्ट्रातील आदिवासी जमाती कॉन्टिन्टेल प्रकाशन, पुणे - ३०, २०००, पृ. १५०-१५१

## ४.५ डिंभे धरण परिसरातील लोक आणि त्यांचे जीवन -

( संशोधकाच्या सहा महिन्याच्या निरीक्षण, वास्तव्य चर्चा, प्राथमिक सर्वेक्षण यावर अधारित माहिती)

महाराष्ट्रात सह्याद्रीच्या पुर्व- पश्चिम उतारापासून सलग सातपुड्याच्या रांगांतून आग्नेयेस महादेव डोंगरच्या रांगापर्यंत आदिवासींचे वास्तव्य आहे. या डोंगरांच्या दऱ्याखोऱ्यातून ऐंशी टक्के आदिवासी राहातात. पावसाळ्यात भरपूर पाऊस, हिवाळ्यात कडाक्याची थंडी, आणि उन्हाळ्यात भाजून काढणाऱ्या उन्हाचा तडाखा अशा निसर्गाच्या रौद्ररूपाशी हसत खेळत, संकटाशी आणि दारिद्र्याशी दोन हात करत आदिवासी जीवन जगताना दिसतात.

पुणे जिल्हयातील आंबेगाव तालुक्यातील पश्चिमेकडील डोंगराळ भाग, ८०० मिली मीटरपेक्षा जास्त पाऊस, सह्याद्रीच्या डोगररांगावर पडणारा पाऊस ओहोळ, नाले, झरे, यामार्फत अहुपे येथे उगम पावणाऱ्या घोडनदीला येऊन मिळतो. हि नदी म्हणजे आंबेगाव तालुक्याची जीवन रेखा, काकड, काटेसावर, कंठी आवूळ, क रंज, कोकम, कळंब, साग, जांभूळ, कवठ, आवळा, करवंद, हिरडा, बेहडा, पिंपळ, फणस, खैर, कारवी, आंबा अशा झाडांनी भरलेले जंगल, लांडगा, कोल्हा, मुंगुस, उंट, बाऊल, डुक्कर, खवल्या मांजर, शेखरू, भेकर, तरस, वान्नर, माकड, बिबट्या असे विविध वन्यप्राणी, मोर, घार, मोरघी, ससाणा, सोळंकी, लांडोर, रानकोंबडी, काकोत्री, होलंगा, पारवा, कुंभार, कुकडा, घुबड पिंगळा इ. पक्षी यांनी समृध्द असलेल्या भीमाशंकर परिसरातील आणि आंबेगावच्या पश्चिमेकडील डोंगराळ भागातील घोडनदीवरील डिंभे धरण आणि या परिसरातील लोक त्यांना असलेल्या क्षमतांचा वापर करून रोजची उपजीविका मिळवताना आपले आर्थिक, सामाजिक सांस्कृतिक जीवन आपल्या वैशिष्ठ्यासह टिकवून आहेत.

''आंबेगाव तालुक्याच्या पश्चिमेकडील भागात डोंगराळ परिसरात २२०० हेक्टर परिसरात पसरलेल्या पाणीसाठ्यावर बांधलेले धरण म्हणजे डिंभे धरण.''[३१] या धरण

३१. आदिवासी मच्छिमार कार्यालय, डिंभे

परिसरात धरणाच्या मुखापासून शेवटाकडील भागाकडे अंशत: विस्थापित १९ गावे असून या गावांमधून ९९% आदिवासी समाजाचे लोक वास्तव्य करत आहेत. यात प्रामुख्याने महादेव कोळी, कातकरी, ठाकर या जमातीचे प्राबल्य आहे. पावसाळ्यात भरपूर पाऊस, हिवाळ्यात कडाक्याची थंडी, दाट धुके अशा परिस्थितीत निकृष्ट जमीनींच्या सहाय्याने कमीत कमी गरजामध्ये भागवून काटकसरीने जीवन जगत आहेत. येथील लोकांचा व्यवसाय हा जंगल, शेती, मासेमारी अशा प्राथमिक स्वरूपाच्या क्षेत्रातील असल्यामुळे पारंपारिक पध्दती अवजारे यामुळे त्याची वाढ फारशी झाली नाही. मर्यादित उपजीविकेच्या साधनामार्फत लोकांची रोजची गुजरण चालते. ५/६ महिने पुरेल एवढे अन्नधान्य, वनउपज याद्वारे यावर जीविका चालविली जाते. अन्नाचा तुटवडा झाला तर जंगलातील कंद, भाज्या, शिकार, मासेमारी, खेकडे, याद्वारे भूक भागवली जाते. शिवाय स्थलांतर करून पंचक्रोशीतील शेतीत शेतमजूर, सरकारी कामाची मजुरी बांधकाम व्यवसायातील मजुरी याद्वारेही थोडे पैसे मिळवतात.

डिंभे धरण परिसरातील लोक वस्तू मोजण्यासाठी पारंपारिक खंडी, मण, अधुले पायली असे मोजमापे वापरत आहेत. येथील लोक हे कष्टाळू आहेत. दाट धुके, थंडी, वादळ, पाऊस कशाचीही तमा न बाळगता क्षेत्रात काम करतात. धरणात मासेमारी करतात. भात, वरी, नाचणी, गहू, हरभरा, खुरसणी, सावा यांची शेती करताना स्त्री पुरूष दोघेही शेतीत कष्ट करतात. याशिवाय स्त्रीयांना फाटे गोळा करणे, धरणावरून आणि उन्हाळ्यात डोंगरातील झऱ्यावरून पाणी भरणे इ. कामे करावी लागतात. लोकांचा वेश हा ठाकर, महादेव कोळी मध्ये पुरूष शर्ट- पँट, स्त्री साडी चोळी असा आहे तर कातकरी मध्ये काही पुरूष धोतर-लंगोटी असे दिसतात. येथील लोकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे. १० वी पर्यंत बऱ्याच मुलांची शाळा सुटते ( गळती होते).

धरण परिसरातील लोकांची घरे तीन-चार खणाची आहेत. पाऊस पाणी आणि वादळाचा त्रास कमी व्हावा म्हणून कमी उंचीचे कौलाची घरे असतात. घराची रचना २,३

विभागात विभागलेली दिसते. एका भागात गुरे ढोरे आणि अंघोळीची मोरी असते तर एक दोन चुली असलेले स्वयंपाक घर असून तिसऱ्या भागात झोपण्यासाठी खोली असते. येथील बऱ्याच लोकांकडे शौचालये आहेत आणि ते वापरात आहेत. डिंभे धरण परिसरातील घरे गावे हि धरणाच्या अगदी काठाकाठावर बसलेली असतात. धरण पूर्ण भरले असता धरणाचे पाणी लोकांच्या घरापासून ३०, ४० फुटावर येते. सर्व गावांना जोडणारा रस्ता पक्का असून तो धरणाच्या कडेकडेने गेलेला आहे. बहुतेक गावांना वीजेचा पुरवठा चांगला आहे. १९ गावांना मिळून २, ३ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत तरी लोक छोट्यामोठ्या आजारावर वनऔषधांचा उपचार करतात. गावातील मुलांना शिक्षण आश्रमशाळेतून मिळते अधिक शिक्षणासाठी लोक नातेवाईक किंवा तालुक्याच्या ठिकाणी मुलांना ठेवतात.

येथील लोकांना वाहतुकीची व्यावस्था बऱ्यापैकी आहे. गावातून राज्य परिवहन मंडळाची बस ( एस. टी) दिवसातून २, ३ वेळा जाते. शिवाय खाजगी वाहातूक उपलब्ध असते. नदीपलीकडच्या दूरवरच्या गावांना जाण्यासाठी लोकांना होडीचा वापर करावा लागतो.२०, २५ किलोमिटरच्यापरिसरात ठराविक गावात आठवडा बाजार भरतो. आठवडा बाजारात लोक कापड, भाज्या, फळे, मसाले, साखर, तेल, साबण, पादत्राणे असे विविध जीवनोपयोगी वस्तूची खरेदी करतात.गावामध्ये एक, दोन दुकानं असतात.

डिंभे धरण परिसरातील लोक पुर्वी नदीकाठी शेती करत होती. मासेमारी करत होती. डोंगरउताराची शेती, जंगल उपज ( मध, हिरडा, बेहडा इ.) गोळा करत फिरत असत, परंतु धरण बांधल्यानंतर मासेमारीची संधी तर निर्माण झाली परंतु सर्व शेती पाण्याखाली गेली. गावांचा संपर्क तुटला त्यामुळे एक प्रकारची अस्थीरता सर्वांना जाणवू लागली. काही गावांचे विस्थापन दुसऱ्या गावांना केल्यामुळे तेथील गैर आदिवासी लोकांशी तंटे, संघर्ष करावा लागतो. ते मिसळून घेत नाहीत असे लोक सांगतात शिवाय शेतीनां पाणी मिळत नाही. सध्या डिंभे धरण परिसरातली गाळपेर शेती, मासेमारी, हिरडा, मध इ. माध्यमाने आपली उपजीविका चालवत आहेत. लोकांच्या जेवणात नागली, वरी, तांदूळाच्या कण्या दळून

केलेली भाकरी, गव्हाची चपाती ( पोळी),  डाळ, चवळी, बटाटे, रानभाज्या, मासे, खेकडे इ.चा समावेश असतो.

महादेव कोळी लोकांमध्ये शिक्षणाचे महत्व वाढत आहे ते प्रामुख्याने शेती करतात, मासेमारी करतात, ठाकर शेती, मासेमारी, विटभट्टीवर ती कामे स्थलांतर करून मजुरी करतात. कातकरी संकोची स्वभावाचे असल्याने दारिद्रयात जीवन जगताना दिसतात. अज्ञान यामुळे लोकांत मिसळत नाहि. आणि नदीकाठी भटकत, मासेमारी, शिकार, कंद यावर अवलंबून असल्यामुळे हालचालीचे दिवस काढतो. हालाखीचे जीवन जगताना गरीबी, कष्ट यामुळे त्रास झाला तरी प्रदूषणमुक्त हवा,सुंदर निसर्ग, घनदाट अरण्य, स्वच्छ पाणी यावर अभिमान सांगणारे लोक या परिसरात राहातात.

## ४.६ डिंभे धरण परिसरातील लोकांच्या उपजीवीका मिळवण्याचे प्रमुख संसाधने (Resources) -

**४.६.१ डिंभा धरण पाणीसाठा**- घोड नदीवर डिंभा येथे बांध घालून धरण बांधले आहे. या पाण्याचा साठा २२०० हेक्टरपर्यंत क्षेत्रात पसरले आहे. परंतु मासेमारी करण्याची क्रिया १२७८ हेक्टर क्षेत्रातच चालते. डिंभा धरण परिसरातील लोकांना २००० नंतर या धरणाद्वारे अपल्या उपजीविका चालवण्यासाठी एक नविन संसाधन मिळाले आहे. उन्हाळ्यात पाणी कमी झाल्यानंतर शेवटच्या २/३ महिन्यात धरण क्षेत्रातील ( पाण्याखाली गेलेली जमीन) गाळपेर जमीनीत लागवड करता येते. मासेमारी आणि शेती या दुहेरी फायद्यामुळे धरण खुप महत्त्वाचे साधन झाले आहे.

४.६.२ **जमीन** - डिंभा धरण परिसरातील आदिवासी कुंटुंबाकडे पारंपारिक मालकीची काही जमीनी धरणाखाली गेल्यामुळे ज्या थोड्याफार शिल्लक आहेत आणि शासनाला थोडे पैसे भरून गाळपेर जमीन कसण्यासाठी मिळते, ती जमीनुतून तांदूळ, गहू, हरभरा, वरी, नाचणी, हुलगा इ. पीके काढून उपजीवीका चालवतात. उपजीविकेचे हे प्रमुख साधन आहे.

निकृष्ठ, वरपीक जमीनीत खुप कष्टाने शेती करत असल्याने पुरेसे अन्न मिळत नाही.

४.६.३ **जंगल** - आंबेगाव, भिमाशंकर या परिसरात जंगल घनदाट आहे. डिंभा धरण परिसर याच जंगलात आहे. जंगल, डोंगराळ भाग यामुळे येथलि उपजीविकेचा बराचसा भाग जंगलावर अवलंबून आहे. जंगलातून नैसर्गिकरित्या मिळणारा मध, हिरडा, बेहडा, आवळा, आनेक वनऔषधी, लाकूड, फळे या सर्वांबरोबर स्वच्छ हवामान, स्वच्छ सुर्यप्रकाश मोकळी हवा आणि मानसिक शांती हे सुध्दा जगण्यासाठी आवश्यक असते. त्याचा ही लाभ जंगल या संसाधनाद्वारे होतो.

## ४.७ डिंभे धरण परिसरातील लोकांच्या उपजीविका

आंबेगाव तालुक्यातील पश्चिम भागातील डोंगराळ आणि अति पावसाच्या विभागात डिंभे धरण आहे. नैसर्गिक वैशिष्ठ्यामुळे येथील उपजीविका हि प्राथमिक क्षेत्रातील आहेत. धरणपरिसरातील अंशत: विस्थापीत गावांमधील बहुसंख्य आदिवासी लोकांची उपजीवीका मुख्यत्वे १) भात शेती २) धरणातील गाळपेर शेती ३) मासेमारी ४) पकडई शेती ५) जंगलातील उत्पादने (हिरडा, बेहडा, मध, गवत इ.)

या वरील मार्गाने चालणाऱ्या उपजिवेकचे स्त्रोत मुख्यत्वे जंगल, जमीन, पाणीसाठा आशी नैसर्गिक आहेत. याशिवाय स्थलांतर करुन मजूरी मिळवणे, विटभट्टीवरती काम करणे, बचतगटामार्फत छोटी मोठी कर्ज वाटप करुन उपजीविकेला आधार लावणे.

वरिल उपजिविकेच्या मार्गाने आठ, नऊ महिने पुरेल ऐवढा धान्यसाठी जमा होतो.

४.७.१ **भात शेती** - डिंभे धरण परिसरातील लोकांचे प्रमुख पीक भात आसल्याने बऱ्याचशा कुटुंबाकडे मालकीची थोडी थोडी भात खाचरं आहेत. उन्हाळ्यात खाचरे खोदून दुरूस्त केले जातात. पावसाच्या सुरूवातील भातखाचरातील जमीन पालापाचोळा टाकून भाजून काढली जाते. याला ‘राब’ भाजणे म्हणतात. त्यामुळे मातीचा कस वाढतो. कोकणात

भौगोलिक परिस्थितीमुळे शेतीच्या दोन पध्दती आहेत. मिलींद बोकील यांनी आपल्या 'कातकरी' विकास कि विस्थापन? या पुस्तकात सांगीतले आहे ''.... विशिष्ठ भौगोलिक परिस्थितीमुळे तेथे शेती करण्याच्या दोन ठोकळ पध्दती आहेत एक 'आळी' दुसरी 'दळी'. सखल प्रदेशात जमीन नांगरुन खाचरे करुन, राब भाजून आणि चिखल करुन जो भात लावला जातो, त्याला 'आळी' म्हणतात. तर डोंगरउतारावर तिथलाच झाडझाडोरा जाळून त्यात बी फेकून जे पीक घेतले जाते, त्याला 'दळी' म्हणतात. दुसऱ्या शब्दात, शेतात भाजलं की आळी, डोंगरावर भाजलं की दळी.

आपले शेत कुठे आणि कसे आहे यावर 'आळी' करायची की 'दळी' हे ठरवले जाते''.[३२]

एक दोन पाऊस झाल्यानंतर एका खाचरात भाताची रोप लावली जातात. महिन्यानंतर ती रोपे काढून मुख्य खाचरात लावली जातात. त्यांना लावणी म्हणतात. पीक मोठे झाल्यावर कापून ते भात गिरणीतून कांडून आणावे लागते. यातून पाच, सहा महिने पुरेल येवढा तांदूळ मिळतो. भात पिके हे मुख्य अन्न आसल्यामुळे यावर खुप परिश्रम करावे लागतात. पाऊसाच्या लहरीचा (कमी पाऊस, जास्त पाऊस दोन्हीचा) फटका बऱ्याच वेळेला बसतो. तेव्हां भात पीक कमी होते. शिवाय पारंपारिक शेतीपध्दत, शेतजमीनीची कमी उपलब्धता, आदनाचा अभाव, भांडवल कमतरता इ. अडचणी या पीकाला भेडसावतात.

**४.७.२ 'गाळपेर' शेती** - आंबेगाव तालुक्यातील धरण परिसरातील मच्छिमार समाजाच्या उपजीविकेच्या साधनामध्ये 'गाळपेर' जमीन ही एक प्रमुख उत्पादन साधन आहे. 'गाळपेर' जमीन म्हणजे धरणाच्या पाण्याखाली गेलेली जमीन. खालच्या गावांना सिंचनासाठी पाणीपुरवठा केल्यामुळे धरणाचा पाणीसाठा उन्हाळ्यात कमी होत जावून मार्च-एप्रिल पर्यंत पाण्याखालील बरीचसी जमीन उघडी पडते. हीच जमीन पुर्वी या भागातील लोकांच्या शेतीची जमीन होती. या जमीनीत जी शासनाच्या परवानगीने जी शेती केली जाते तिला 'गाळपेर' म्हणतात. पुर्वी या जमीनी शासनाने अतिशय कमी भावाने खरेदी केल्या होत्या.

३२. बोकिल मिलिंद : 'कातकरी' विकास की विस्थापन? मौज प्रकाशन, मुंबई. २००६, पृ. १०७

पाणी कमी झाल्यानंतर शासनाला ठराविक रक्कम देऊन (भाडेपट्ट्याने) वार्षिक ११ महिन्याच्या कराराने जमीनीचे काही गुंठे शेतीसाठी उपलब्ध होतात. ही येथील लोकांच्या उपजीविकेसाठी खुप महत्वाचा हिस्सा गाळपेर जमीनीतून प्राप्त होतो.

गाळपेर जमीनीत लागवडीसाठी खुप कमी कालावधी मिळतो. शिवाय धरणाच्या शेपटीकडील गावांना लवकर पाणीसाठा कमी झाल्यामुळे पीके लवकर लागवड करता येते. भाज्या, लागवड करता येते. परंतू पुढील भागात पाणीसाठा उशीरा कमी होतो म्हणून ३ महिनेच लागवडीसाठी मिळतात. या जमिनीत बाजरी, गहू, हरभरा, भुईमूग, भाज्या यांची लागवड करतात. त्यामुळे उत्पन्न वाढते. मागील काही वर्षापासून या जमीनीत ढेंचा व तागाची लागवड केल्यामुळे जमीनीची सुपीकता वाढल्याचे लक्षात आले तसेच माशाना खाद्यही उपलब्ध झाले.

शाश्वत संस्थेमार्फत धरणपरिसरातील जमीनीत ताग/ढेंचा लागवड केल्यामुळे उत्पादनात वाढ झाली जमीनीची सुपीकता वाढली.

ताग लागवडीनंतर शेताच्या मातीतील बदल

**कोष्टक क्र. ४.४**

| क्र. | तपशील | ढेंचा लावलेले शेत | शेजारील शेत |
|---|---|---|---|
| १ | मातीचा रंग | गडद तपकीरी | हालका तपकीरी |
| २ | मातीचे PH | ७.५ | ७.४ |
| ३ | वाळू (%)(Sand) | ४०.० | ४०.० |
| ४ | माती (%) (Soil) | ३५.० | ४०.० |
| ५ | चिकण माती (Clay) | २५.० | २०.० |
| ६ | पाणी धरूण ठेवण्याची क्षमता (Water refentio capacity) | ५४ | ४४ |
| ७ | सेंद्रीय कर्बन(%)(Organic Carbon) | १.५४ | ०.१४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | सेंद्रीय पदार्थ (%) | २.५८ | ०.२४ |
| ९ | एकूण नत्र Total Nitrogen (मिलीग्राम १०० ग्रॅम माती) | १.५० | ०.१४ |
| १० | फॉस्फरस (Total Phosphorous) (मिलीग्राम १०० ग्रॅम माती) | ६.५ | २.० |

१) माती नमुना दि. १२-१२-०७ ठिकाण फुलेवडे येथील गाळपेर जमीन, माल श्री. धनाजी महादु भारमळ

२) माती परिक्षण मुंबई येथे केले गेले.

**(संदर्भ - डिंभे जलायश मासेमारी प्रगती अहवाल / २००८.. डिंभे जलाशय श्रमिक आदिवासी मच्छिमार सह. सोसा. मर्यादित दिगद.)**

**४.७.३ पडकई* शेती** - डिंभे धरण परिसरातील लोक डोंगरउतारावरची जमीन लागवडीखाली आणून जी शेती करतात तीला 'पडकई' शेती म्हणतात. 'पडकई' हा शेतकऱ्याचा सांघीक शेतीचा प्रयोग आहे. सांघीक पध्दतीने एकत्र येऊन प्रत्येकाच्या वाट्याची शेतीची मशागत सांघीक पध्दतीने करतात. आपली अवजारे घेऊन एखाद्याचे शेत, बांधबंदिस्ती, नांगरणी इ. साठी २,४ दिवस मदत करण्यासाठी लोक एकत्र येतात. त्यासाठी कुठलाही मोबदला घेतला जात नाही. फक्त जेवणाची व्यवस्था जमीनमालकाने करायची असते. अशाप्रकारे सर्वांची पडकई शेती केली जाते. डोंगराचे उतार अतिशय तीव्र असल्याने येथे शेती फार कष्टाची असते. ज्या शेतात डोंगरउतारावरती सामान्य माणसाला उभा राहण्यासाठी कसरत करावी लागते तेथे या भागातील लोक हुलगा, नाचणी, वरी, सावा, भाताची लागवड करतात.

*** आदिवासी शेतकऱ्यांचा सांघिक शेतीचा प्रयोग.**

सध्या शासनाच्या मदतीने सात/बारा वरती किती डोंगरउताराची जमीन आहे त्यानुसार दुरुस्ती करिता आर्थिक मदत मिळत आहे. शाश्वत या संस्थेच्या मदतीने धरणपरिसरातील ३८ आदिवासी गावातील खाजगी मालकीच्या जमिनीवर 'पडकई कार्यक्रम' राबवला गेला आहे. तो ७०% पूर्ण झाला आहे. बांधबदिस्तीसाठी सरकारकडून ठराविक मर्यादितच(साधारण २ एकर) जमीनीवर लागवडिसाठी, दुरूस्तीसाठी निधी उपलब्ध होत आहे. पडकई कार्यक्रमामुळे उपजीविकेच्या साधनात वाढ झाली आहे. भविष्यात आदिवासीनां आर्थिक स्वयंपुर्णतेसाठी त्याचा वाटा खुप मौल्यवान ठरणार आहे.

**४.७.४ जंगल** - जंगलातून औषधी वनस्पती, मध, डिंक, फाटे, जंगली भाज्या, घरासाठी लाकूड, मातीपासून विटा, जनावरांना चारा इ. गोळा केला जातो. त्यानिमीत्ताने आदिवासींचे जंगलातील ज्ञान वाढतेच तसेच निसर्गाच्या सानिध्यात सतत भटकल्यामुळे एक प्रकारची संकटाशी लढण्याची त्यांची सहनशक्ती वाढते. जंगल त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे.

**४.७.५ मासेमारी**- डिंभे धरणातील पाणीसाठी २२०० हेक्टर क्षेत्रात पसरला असून मासेमारी मात्र १२७८ हेक्टर क्षेत्रातच चालते. डिंभे धरण परिसरात पुर्वीपासून राहत असलेले लोक प्रामुख्याने आदिवासी जमातीचे आहेत. ते पुर्वी खान्यापुरते मासे, खेकडे नदीकाठी फिरुन पकडत. त्यातला फार कमी हिस्सा विकत. परंतु या मासेमारिमुळे उपासमारीपासून त्यांचे बऱ्याचवेळा संरक्षण होत होते. थोडीशी कमी आणि निकृष्ठ शेती स्वत:कडे होती त्यातही ती महादेव कोळी, ठाकर यांच्याकडेच होती. कातकरी लोक मासेमारी, जंगल उत्पादने, फळे, मध दारू गाळणे हि कामे करत होता. १९९६ ते १९९८ पर्यंत लोक मासेमारी करण्यासाठी पारंपारीक पध्दती (गळाने, झोळीने, पितळी लावणे, जाळे फेकणे इ.) मार्गाने मासेमारी करत शिवाय मासेमारी हि कुठल्याही बंधनाशिवाय चालत असे. त्यात लहान मासे, मोठे मासे, बीज असा भेद न करता सर्वच मासे पकडले जात होते.

नंतरच्या काळात मासेमारीसाठी लोक ‘होडगं’ वापरु लागले. ‘होडगं’ म्हणजे लहान गोल आकाराची नाव. वेतापासून ती बनवली जाई. एक, दोन, माणसे बसुन त्यातून मासेमारी करत पुढे १९९८ ते २००० पर्यंत गाडीच्या चाकातील ट्युबमध्ये हवा भरुन त्यावर एक व्यक्ती बसून मासे पकडत असे परंतू ते धोकादायक ठरे कारण धरणाच्यामध्ये गेल्यानंतर ट्युबची हवा गेली, उलटली तर जीवाला धोका असतो. २००० नंतर धरण संपुर्ण भरले आणि मासेमारी मोठ्या प्रमाणात करता येऊ शकते ही सुवर्णसंधी दिसून आली. २००० नंतर लोकाना होड्या आणि ताब्या वाटण्यात आल्या आणि त्यामुळे मासेमारी अधिक सुरक्षित झाली. परंतू खोल पाण्यातील मासेमारी करणे विशिष्ठ वजनाचेच मासे पकडणे ह्या गोष्टी नविन असल्यामुळे तर काही लोकांना यात  मासे पकडण्याचे कसब सापडले आहे. असे दिसते तर बऱ्याच लोकांना खुप कमी मासे मिळत आहेत परिणामी ते उपजीविकासाठी अन्य साधनांवर अवलंबून राहात आहेत.

**४.७.६ हिरडा गोळा करणे**- स्थानिक भूभाग, वैशिष्ट्ये, हवामान, पर्जन्यमान आणि साधनसंपत्तीची उपलब्धता यांना अनुसरून विविध व्यावसाय विकसीत झालेले आढळतात. पुणे जिल्हा तसा औद्योगीक दृष्ट्या, शेतीच्या दृष्टीने विकसीत आहे. मात्र जिल्ह्याचा पश्चिम भाग हा डोंगर व दऱ्याखोऱ्यांनी व्यापला आहे. आंबेगाव तालुका पश्चिम भागात आहे. या तालुक्यात पावसाचे प्रमाण जास्त आहे. तापमान ३२ सेंग्रे. ते २७ सेंग्रे आहे. डोगरउतार तीव्र आहेत. ही स्थानिक परिस्थिती हिरडा उत्पादनास अनुकूल आहे. या कारणामुळे आंबेगाव तालुक्यात हिरडा उत्पादन जास्त होते. तालुक्यातील ३१,२०५.१ हेक्टर जंगल क्षेत्रात हिरडा वेचण्याचा व्यावसाय करतात.

डिंभे धरण  परिसरातील आदिवासी मच्छिमार कुटूंबीयाच्या उपजीविकेत हिरडा वेचणे या व्यावसायाचा सहभाग असतोच. या परिसरातील लोकांना हिरडा वेचणे आणि तो बाजारात नेणे या प्रक्रियासाठी फार कष्टाची तयारी ठेवावी लागते. हिरडा मालकीच्या

झाडावरुन तसेच जंगलाच्या हाद्दीतील सरकारी झाडावरुन वेचला जातो. हिरडा वेचणे म्हणजे तो झाडावरुन काढणे. हे काम कधी कधी जीवघेणे ठरु शकते. हातपायास झाडावरुन पडून इजा होते. शिवाय भावात चढ उतार असतात. ४०, ४५ दिवस हिरडा व्यावसाय रोजगार मिळवून देतो म्हणून कुटूंबाला आर्थिक हातभारासाठी विनाभांडवलाचा व्यावसाय म्हणून त्याकडे पाहावे लागते. हिरड्यास मुख्यत्वे रंग उत्पादने व औषधी कंपन्याकडून मागणी असते.

हिरडा वेचणे, उन्हात वाळवणे, उन्हाने तापवने, पायाने तुडवणे व शेवटी तो निवडणे अशी टप्पे या प्रक्रियात असतात. 'बाळहिरडा', 'मोठा हिरडा' असे दोन प्रकारचे हिरडा वेचला जातो. आंबेगाव परिसरात तिरपाड, अडीवरे, तळेघर, घोडेगाव, डिंभा या ठिकाणी हिरडा खरेदी-विक्री चालतो. भविष्यात हिरडा खरेदी विक्री बचतगटामार्फत करुन या व्यावसायाद्वारे स्त्रीसबलीकरणाचा आणि उपजीविका चालवण्याचा दुहेरी फायदा दिसतो आहे.

सध्या डिंभे धरण परिसरातील १९ गावांमध्ये 'शाश्वत' या संस्थेच्या मार्गदर्शनामुळे आणि ''डिंभे जलाशय श्रमिक आदिवासी मच्छिमार सह. सोसायटी मर्यादित दिगद'' या संस्थेच्या माध्यमातून शासनाकडे धरणाचा ठेका भरुन २००पेक्षा आधिक मासेमार कुटूंबे मासेमारी करत आहेत. २००३ पासून मासेमारी संस्थेमार्फत चालवली आहे. या संस्थेत ९९% आदिवासी जमातीचे सदस्य आहेत. आकडेवारिवरुन दिवसेदिवस मासेमारीचे दिवस आणि उत्पन्न वाढत आसल्याचे दिसत आहे. घरातील स्त्रीपुरूष, मुले मासेमारी करतात. थंडी, पाऊस, धुके कशाचीही पर्वा करत नसल्यामुळे ते मासेमारीच्या माध्यमाने आपल्या उपजीविकेला हातभार लावत आहेत.

मासेमारी करण्याकरिता रोज सकाळी संध्याकाळी होडी घेऊन जाळ लावावे लागते. त्यासाठी ४,५ तास जातात. रोज पकडलेली मासे रोजच्या रोज संस्थाच्या मार्फत परगावी पाठवले जातात. त्यातून लोकांना सरासरी आठवड्याला १२५ ते २०० रुपये इतके उत्पन्न

मिळते. धरणाच्या खोलीमुळे सुर्यप्रकाश खोलवर पोहचू शकत नाही. त्यामुळे माशांची पैदास कमी होते. दरवर्षी धरणाच्या पाणीसाठ्यात ९००००० बीज टाकावे लागते. ते बीज शासन आणि खाजगी उत्पादकाकडून खरेदी करावे लागते शिवाय ते वेळेवर मिळत नसल्यामुळे मासे फारशे उत्पादन होत नाही. हि अडचण येते. जाळ्याची कमतरता आहे. म्हणून लोकांना ह्या नविन संसाधनाचा वापर करून उपजीविका चालवणे कठिण जात आहे. केद्रिंय मत्स्य संस्था मुंबई, शाश्वत अशा संस्था मासेमारीचे अद्यवत, अधूनिक ज्ञान पुरवत आहेत. यांच्या मदतीने पिंजर संस्कृती तंत्र (Cage culture)✻ संरक्षित तलाव (pen culture)✻ यांचा वापर करून नियंत्रीत वातावरणात मत्स्य बीज वाढवून विशिष्ठ आकाराचे झाल्यानंतर धरणात सोडले जाते. कारण लहान असताना धरणात सोडले तर लाटा आणि इतर माशांचे खाद्य बनून त्याचे मृत बनन्याचे प्रमाण खूप जास्त होते.

धरणाच्या शेवटच्या गावांना मासेमारी लवकर बंद करावी लागते कारण पाणीसाठा कमी होत जातो. आनेक अडचणी असल्यातरी मासेमारी करण्यासाठी आणि याद्वारे अधिक उत्पन्न वाढवण्यासाठी अधिक वाव आहे. संपूर्ण क्षमता न वापरता मासेमारी चालू असल्यामुळे ती कमी फायद्याची दिसत आहे. तरीही मासेमारीचे साठे आणि अवलंबून असणारे कुटुंबे यामुळे पुढे हव्यासापोटी मासेमारीचा दर्जा कमी होण्याचा धोका आहे. त्यामुळे या शाश्वत उपजीविकासाठी आणि पर्यावरणाचा समतोल टिकवून ठेवत जीवन जगण्यासाठी अधिक चांगले नियोजन होणे आवश्यक आहे.

## ४.८ उपजीविकेचा नैसर्गिक संसाधनावर (Resources) होणारा परिणाम

भारतासारख्या विकसनशील देशांनी देशाचा विकास म्हणजे आर्थिक विकास मानला त्यामुळे आर्थिक विकास करण्यासाठी देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचे साठे, संसाधने यांची केवळ लूट केली त्याचे परिणाम सर्व जगाबरोबरच आपण ही भोगत आहोत. बाजारपेठी अर्थशास्त्रात बसणाऱ्या गोष्टीमुळे आपण अर्थिक विकास करत गेलो परंतू ‘ शाश्वत विकास’

करण्यात मागे पडलो. भविष्यात खुप ताण निर्माण करून ठेवले. देशाचा विकास हा विशिष्ठ ठिकाणी झाल्यामुळे (उद्योगांचे केंद्रीकरण) निसर्गावर त्याचे वाईट परिणाम झाले. पुढे विकेंद्रीकरणाच्या तत्वानुसार हेच परिणाम खेड्यांना भोगावे लागत आहेत.

डिंभे धरण हा पुणे जिल्हयातील आंबेगाव तालुक्यातील दुर्गम भाग असला तरी लोकांच्या उपजीविका आणि संसाधने यावरील परिणाम येथेही जाणवतो. येथील लोकांच्या उपजीविका मुखत्वे भातशेती, मासेमारी, गाळपेर जमीन, पडकई शेती आणि जंगलावर अवलंबून आहे. या सर्व उपजीविकाचे त्यांचे संसाधनाचे (Resources) एकमेकांशी संबंध आहेत. त्याचा परिणाम एकाचा दुसऱ्यावर होत असतो.

पूर्वी डिंभे धरण परिसरातील लोक मासेमारी फक्त खाण्यापुरती करत होती. त्यामुळे मासेमारी करण्यावर अपोआपच नियंत्रणहोते. थोडे मासे मिळवणे संपूर्ण जंगलातील नदीच्या विविध पात्रातील मासे मिळवणे त्यामुळे मस्त्यबीजांचे फार नुकसान होत नसावे शिवाय स्थानिक परिस्थिती, हवामान नैसर्गिक वनस्पती, आणि स्थानिक माशांच्या जाती यामुळे त्यांचे प्रजनन चक्र, वाढ ही चालू राहत असली पाहिजे, कारण लोकांच्या सांगण्यानुसार पुर्वी फार मासे मिळत असत असे सांगितले जाते. धरण बांधल्यानंतर मासेमारी करणारे कुंटुंबे वाढली, पाणीसाठा वाढला तर धरणात लाखो मत्स्यबीज सोडले जाते ( वार्षिक ९ लाख ) तरीही मासे मिळत नाहीत अशी दरवर्षी लोकांची ओरड असते. 'शाश्वत' संस्थेचे आनंद कपूर यांनी असे सांगितले की, '' धरणाच्या खोलीमुळे माशांची पैदास कमी होते.'' मासेमारीवर अवलंबून असणारे कुंटुंबे आणि मासे मिळवण्याचे नैसर्गिक साठे यामुळे मासेमारी हव्यासापोटी जास्त चालते आणि दर्जा खालवतो.

धरणाचा पाणीसाठा कमी झाला , अपुरा वाटू लागला तर धरणाची भिंत वाढवली जाईल त्याचा परिणाम पुढे सध्या धरणाच्या कडेकडेला बसलेल्या या १९ गावांना नक्कीच बसणार आणि सध्या वरील डोंगरावरच्या मातीचे सतत झीज होऊन खाली धरणातील पात्रात वाहून येणे चालू आहे, लवकरच धरण मातीने भरून जाईल. तेव्हा धरणातील

पाणीसाठा कमी खोलीमुळे कमी होण्याचा धोका आहे. परंतु माशांची पैदास कमी खोलीमुळे वाढेल परंतु त्यावेळेस मासेमारी करिता गावे शिल्लक राहाणार नाहीत तर याचा विचार करून शाश्वत मासेमारी धरणाचा पाणीसाठा वरील गाळाचे घसरण थांबवणे हे महत्त्वाचे आहे. त्यासाठी वरील डोंगरवरील शेतीत अधिक 'पडकई' कार्यक्रम राबविला तर मातीची घसरण कमी होईल आणि धरणात गाळ साचणार नाही.

डिंभे धरण परिसरातील लोक हे आदिवासी जमातीचे आहेत आणि जंगलावर पारंपारिक त्यांचे अवलंबीत्व आहे. त्याचे आनेक, फायदे आहेत. परंतु नैसर्गिकपणे मिळणारे अन्न, मासेमारी, जंगलसंपत्ती यामुळे ते अधिक प्रयत्न करत नाहीत कारण तशा प्रेरणाच त्यांना मिळत नाहीत कारण रोज खान्यासाठी अन्न अपुरे असले तरी ते मिळवून समाधानी राहातात. इतर लोकांच्या मानाने जंगलातील लोकांचा विकास तितक्या वेगाने झाला नाही. याचे कारण जंगलावरचे अधिक अवलंबीत्व असावे का? आणि जंगलासाठी ते नुकसानकारक ठरेल का? असा प्रश्न पडतो.

धरणाच्या शेवटच्या गावांना लवकर पाणीसाठा कमी झाल्यामुळे ३ महिने मासेमारीपासून लवकर वंचित व्हावे लागते परंतु ते अधिक लवकर 'गाळपेर' शेती करून ती कसर भरून काढू शकतात हा परिणाम साधता येऊ शकेल. कारण धरणाच्या मुखाजवळच्या गावांना पाणी कमी झाल्याशिवाय 'गाळपेर' करता येत नाही.

मासेमारीच्या सर्व क्षमता वापरून जर मासेमारी झाली तर अधिक उत्पन्न (वाढावा) 'पडकई शेती' 'गाळपेर शेती' यांत गुंतवणे शक्य आहे. त्यामुळे उपजीविकेवरील ताण कमी होईल. जंगलावरील ताण कमी होईल त्यामुळे त्यांचे संवर्धन होईल मेलरच्या कृषी विकासाच्या सिध्दांतानूसार ''पारंपारिक शेतीमध्ये अधिक उत्पन्न वाढविण्यासाठी पारंपारिक शेती अदानामध्ये(Tools) वाढ आवश्यक असते.'' डिंभे सारख्या ठिकाणी पारंपारिक आदाने भूमी, श्रम आहे. याचा विचार केला तर जमीन वाढविणे शक्य नाही परंतु आहे ती जमीन श्रमाच्या साह्याने अधिक चांगली करणे शक्य आहे. नविन पडकई कार्यक्रमाने लागवडी

खाली आणणे शक्य आहे. त्यामुळे उत्पन्न वाढू शकेल. स्थलांतर थांबेल शिक्षणाचा दर्जा सुधारेल. आणि अतिरिक्त श्रमाचा पुरवढा योग्य करण्यासाठी वापरता येईल.

## ४.९ डिंभे धरण परिसरातील लोकांची बाजार व्यवस्था आणि विनिमय पध्दती-

### आठवडा बाजार -

डिंभे धरण परिसरात राहाणाऱ्या आदिवासी कुंटुंबाना आठवड्याला लागणाऱ्या वस्तू,धान्याची खरेदीविक्री,सणांची खरेदी, इत्यादीसाठी पंचक्रोशीत आठवडे बाजार भरतात.त्यांना रोजच्या मिठमिरचीपासून दिवाळी, दसरा, होळी, पंचमी या पारंपारिक सणांची खरेदी हि आठवडे बाजारातुन केली जाते. डोंगरउतारावरील छोट्या छोट्या गाव, वाड्या यामधून आठवडे बाजार लागतो. प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या गावांचा बाजार ठरलेला असतो. आठवड्याच्या सात दिवसापैकी ४ दिवस धरण जलाशयाच्या परिसरातच बाजार भरतो.

| **वार** | **बाजार** |
|---|---|
| रविवार | डिंभा |
| सोमवार | तिरपाड |
| मंगळवार | शिनोली |
| बुधवार | अडिवरे |
| गुरूवार | तळेघर |
| शुक्रवार | घोडेगाव |
| शनीवार | बोरघर |

(संदर्भ- प्राथमिक सर्वेक्षण)

गावांमधून, बाजारामधून वस्तू, धान्य खरेदीविक्रीचे अधुनिक मापे वापरात आहेत. परंतु आजहु मोठ्या प्रमाणात जुन्या पारंपारिक मापानीच लोक वस्तू धान्य खरेदी-विक्री करतात. खंडी, मण, अधुली, पायली, शेर, आठवा- निठवा असे पारंपारिक मापे आजही वापरात आहेत.

**कोष्टक क्र. ४.५**

| | | | |
|---|---|---|---|
| ✻ | १ खंडी | = २० मण | = ९६० किलो |
| ✻ | २ मण | = १२ पायल्या | = ४८ किलो |
| ✻ | १पायली | = २ अधोल्या | = ४ किलो |
| ✻ | १ अधोली | = ४ आठवे | = २ किलो |
| ✻ | १ शेर | = २ आठवे | = १ किलो |
| ✻ | १ आठवा | = २ निठवे | = १/२ किलो |
| ✻ | १ निठवा | = २५० ग्रॅम | |
| ✻ | १ कट्टा | = ५० किलो (अंदाजे) | |
| ✻ | १ पोते | = १०० किलो (अंदाजे) | |

**( संदर्भ : आयआयटी मुंबईचे विद्यार्थी कल्याण टांकसाळे यांनी भीमा शंकर अभयारण्य परिसरात राहणाऱ्या लोकांचा केलेला सर्व्हे)**

कुसुम कर्णिक सांगतात, '' १९८१ च्या सुमारास तेव्हाही वस्तूविनिमियाच्या काही खुणा ठरलेल्या होत्या, हिरड्याच्या बदली गहू वा मीठ, मधाच्या बदल्यात गोडेतेले, मेणाच्या बदल्यात हळद, शिकेकाईच्या बदल्यात कडधान्ये अशा जोड्या होत्या, हळुहळु त्यांची जागा पैशाने घेतली. आज बाजाराचे प्रस्थ वाढलेले आहे.आतल्या भागातले आदिवासींचे आठवडा बाजार आज चकाकणाऱ्या गोष्टीने झळाळायला लागले आहेत आणि त्याबरोबर आदिवासींच्या जीवनातले हास्य संपत चालले आहे.''[३३]

---

३३. कर्णिक कुसूम : लेख : मिळून साऱ्याजणी, प्रकाशक गीताली वि.मं., पुणे, ऑगस्ट २०१०, पृ.१८

**४.१० हिरडा बाजार** - हिरडा आणि वनउपज खरेदी विक्री करण्यासाठी महामंडळाचे विविध कार्येकारी सेवा संस्थाची कार्यालये आंबेगाव तालुक्यात आहेत. गंगापूर, पिंपळगाव तर्फे घोडागाव,साल, शिणोली तळेघर, बोरघर, तिरपाड, आसाणे, जांबोरी, डिंभे खुर्द या ठिकाणी प्रादेशिक कार्यालये आहेत. तालुक्यात हिरडा खरेदी विक्री करणाऱ्या ८ सहकारी संस्था आहेत.

**४.११ अगोठीचा बाजार**- पावसाळा सुरू होण्यापुर्वी ३ महिने पुरेल इतका धान्यसाठा तेल, मिठ मिरची यांची तजबीज करून ठेवावी लागते. कारण उंच डोंगरावर राहाणाऱ्या लोकांना जोरदार पाऊस आणि वादळामुळे बाजार करणे शक्य होत नाही. म्हणून अगोदरच बाजार करून वस्तूंचा साठा करण्याच्या बाजाराला स्थानिक भाषेत 'अगोठीचा बाजार' असे म्हणतात. एकत्रित वस्तू खरेदी करून ठेवणाऱ्या कुंटुंबीयांचे प्रमाणही खुप मोठे आहे. डिंभे धरण परिसरातील लोक अगोठीचा बाजार साधारण जूनच्या पहिल्या आठवड्यात करतात. संकटाचा सामना करण्यासाठी आणि तगुन राहाण्यासाठी हे अनुभवाने शिकावे लागल्याचे लोक सांगतात.

**४.१२ डिंभे धरण परिसरातील आदिवासी मच्छिमार कुंटुंबाचे श्रध्दाकेंद्रे**

डिंभे धरण परिसरातील लोकांच्या उपजीविकेचा अभ्यास करताना संशोधकास आदिवासींच्या सामाजिक चालीरिती सामीजक जीवनाचा जवळून अनुभव घेता आला. मुख्य समाजातील लोकांची धार्मिक केंद्रे, देवदेवता यांच्या त्यांच्या जीवनात जसे महत्त्वाचे स्थान असते, तसेच आदिवासी लोकांची देवता श्रध्दास्थाने वेगळी निर्माण झालेली आहेत. आदिवासी निसर्गात राहाणारे, रमणारे निसर्गाच्या रौद्ररूपाशी परिचित असणारे आहेत. म्हणूनच त्यांचे देव हे निसर्गातीलच आहेत. आदिवासी हे निसर्ग पुजक आहेत त्यामागे त्यांच्या खास समजुती असतात. निसर्गापासून संरक्षण व्हावे, निसर्गाचे संगोपन व्हावे या भावनेतून खुप दूरदृष्टीने त्यांनी निसर्ग, प्राणी यांना अपल्या श्रध्दाची केंद्र मानले आहे.

डॉ. रा. चि. ढेरे यांनी आपल्या ग्रंथात माणसाचे मन, समाजाचे मन कसे असते याचे सुरेख वर्णन केले आहे. ते आदिवासींना खुप चपखल लागू पडते. ''समाजाचे मनही व्यक्तीच्या मनाप्रमाणे मोठे विचित्र असते, लहरी असते. त्याच्या आवडीनिवडींचा निश्चित कयास बांधणे कठिणच. त्याच्या श्रध्देला पात्र होणारी एखादी व्यक्ती अथवा एखाद्या कल्पनेचे प्रतिक पाहाता पाहाता देवत्वाच्या पवित्र आसनावर विराजमान होते आणि सारा समाज त्याच्यापुढे आपले वर्चस्व समर्पित करायला सिध्द होतो. परंतु त्याची ही श्रध्दाकेंद्रे सातत्याने स्थिर राहातातच असे नाही. काहिच्या विषयी समाजमनात अनावड निर्माण होते, तर काही सामाजिक उपेक्षामुळे विस्मृतीच्या अंधारात कायमची लुप्त होऊन जातात. या लुप्त श्रध्दाकेंद्राचा जर शोध लागला, तर आपण त्यांना बोलकी करु शकलो तर सामाजिक स्थिती गतीवर आपणांस पुष्कळच प्रकाश टाकता येईल.''[३४]

आदिवासीची  वाघोबा पुजा, वनदेव, 'देवराई' विशिष्ट झाडांना देव मानने यामागे खुप मोठा विचार आहे.

डिंभे धरण परिसरातील मच्छिमार आदिवासी कुटुंबातील अनेक लोकांनी शिद, उंबर, वड, पिंपळ, वरस अशा जंगलातील झाडांना देव मानतो असे सांगितले. त्या झाडांना हात ही लावत नसल्याचे सांगीतले. औदुंबरेश्वर देवाची यात्रा भरवतात. आपल्या गायी वासरांचे रक्षण व्हावे म्हणून वाघोबाला देव मानतात.

''..... महाराष्ट्रातील कोकणा आणि वारली जमातीत पिंपळ, पायर, पळस, वड, कविसा, सावर, उंबर, शीद (शमी), बेल इत्यादी देववृक्ष समजली जाणारी, झाडे राखून ठेवतात. या आणि इतर फळ झाडांवर त्यांची जीविका चालते. तसेच 'वानैषधी' झाडाझुडपावर त्यांचे दिर्घायुष्यच अवलंबून असल्याने ते अशा झाडांची तोड करित नाहीत, की त्याचे लाकूड सुध्दा चुलीत लावत नाहीत.''[३५]

अदिवासी निसर्गातील जीवसृष्टी प्राणी यांच्याकडून एकत्रित जगने, समन्वय समता या गोष्टी शिकला त्यातून त्याने निसर्गालाच देव मानले. उपजीविकासाठी काय काय लागते,

---

३४. डॉ. ढेरे रा.चि. : लोकदैवतांचे विश्व, पदमगंधा प्रकाशन, पुणे - ३८, जानेवारी १९९६, पृ.१४१

३५. हाकारा : मंथन विशेषांक, प्रकाशन महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, जुलै-सप्टे.२००९, पृ. ४७

काय काय जपले पाहिजे याचे ज्ञान अनुभवाने मिळवले. ते पुढील पिढीत नेण्यासाठी मौखिक साहित्याद्वारे ते रुजवले. त्यांच्या नृत्य गाण्यात निसर्गप्राणी यांची विनवनी भक्ती सहज दिसून येते.

## ४.१३ मच्छिमार समुदायातील लोकांच्या कार्यक्षमता -Capability

आदिवासी वास्तव्याच्या भागानुसार त्यांची तीन टप्प्यात विभागनी करता येते.

१) सपाट मैदानी भागात वास्तव्य करणारे आदिवासी

२) डोंगरपायथ्याच्या भागातील आदिवासी

३) दऱ्याखोऱ्यातील आदिवासी

वरील राहानीनुसार येथील लोकांच्या क्षमता विकसीत झाल्याचे आढळते.

डिंभा धरण परिसरातील मच्छिमार लोकांच्या काही कार्यक्षमता पुढील प्रमाणे दिसून येतात.

१) मासेमारीचं पारंपारीक ज्ञान, मासेमारीच्या अनेक पध्दतीचं ज्ञान ते वापरण्याचं कौशल्य.

२) काटक, कणखर शरिरामुळे अतिशय हालाखीच्या परिस्थितीत जगण्याची चिवट प्रतिकार करण्याची क्षमता.

३) पडकई-डोंगर उतारावर कष्टाने शेती करण्याची कार्यक्षमता, ज्ञान.

४) पारंपारिक भात लागवडीचं ज्ञान.

५) जंगलाची सखोल जाण, तसेच पर्यावरण संरक्षणासाठी संवर्धनांसाठी अंगभूत तळमळ.

६) ऊन, पाऊस, वारा, थंडी, धुके यांची तमा न बाळगता पाहाटे, रात्री मासेमारीसाठी कष्ट करण्याची शारीरीक क्षमता. मासेमारीचे जाळं योग्यरितीने लावण्याचं ज्ञान.

७) जंगलातील प्राणीजीवन वनस्पतीजीवन यांना धक्का न लावता उपजीवीका करण्याची क्षमता. [३६]

---

३६. आदिवासी क्षेत्रातील वास्तव्य, निरीक्षण, लोकांशी चर्चा यावर आधारीत.

## ४.१४ डिंभा धरणपरिसरातील जंगलवासियांचे 'SWOT ANALYSIS'

डिंभे जलाशय परिसरातील आदिवासी कुंटुंबाच्या उपजीविकेचा अभ्यास करताना संशोधक गावातील लोकांना प्रत्यक्ष भेटून माहिती घेताना मंचर येथील 'शाश्वत' या स्वयंसेवी संस्थेचे आनंद कपूर, कुसुम कर्णिक आणि आय. आय. टी. मुंबईचे कल्याण टांकसाळे यांनी डिंभे धरण परिसरातील लोकांना मंचर येथे बोलावून या सर्वांकडून त्यांच्या विषयी, जंगलाविषयी समजावे या हेतूने एक मिटींग बोलावली होती. त्या मिटींगला संशोधक स्वत: हजर होते त्या मिटींगमधील गोषवारा खालील स्वरूपाचा आहे.

आदिवासी बांधव जंगलात राहातात. जंगलातून गरज भागते ते जंगलावर अवलंबून असतात त्यांचे 'SWOT' Analysis करताना खालील माहिती मिळाली-

S - STRENGTH (ताकद)

W - WEAKNESS (कमजोरी)

O - OPPORTUNITY (संधी)

T - THREATS (धोके)

### अ) ताकद

१) डिंभे जलाशय परिसरात राहाणाऱ्या आदिवासीपैकी शक्यतो भूमिहिन कोणी नाहीत.

२) आदिवासीची संस्कृती, देवराई हि इतरांपेक्षा वेगळी आहे.

३) सर्वात स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी, स्वच्छ सुर्यप्रकाश, स्वच्छ चांदण या गोष्टी आदिवासी आपली ताकद समजतात.

४) या परिसरातील आदिवासी निसर्गाच्या रौद्ररुपापुढे नमते घेत नाही. पाऊस, धुके यामुळे जीवनात फरक पडत नाही.

५)	जंगलात जगण्यासाठी पुरेशी साधने उपलब्ध आहेत. ते वापरण्याचे कौशल्य त्यांचेजवळ आहे.

६)	जंगलाची चांगली माहीती असते. औषधी वनस्पती, कंद, प्राणी, पायावाट यांची माहिती असते.

७)	आदिवासीच्या कमीत कमी गरजा असतात त्यामुळे हाव्यास कमी आढळतो.

**ब) कमजोरी**

१)	आदिवासीनां औपचारिक शिक्षणाच्या संधी फार कमी उपलब्ध असतात.

२)	नागरी सुखसुविधा, आरोग्य सुविधा नाहीत.

३)	आपले शत्रू कोण? आपल्यावर अन्याय काय होत आहेत? याची जाणिव नाही.

४)	आपण ज्या परिस्थितीत राहात आहोत त्या परिस्थितीचा अभ्यास नाही.

५)	जातीजमातीमुळे बाहेर नातेसंबध नाहित.

६)	स्वत:च्या वनातील/शेतीतील उत्पन्नाचे भाव ठरवू शकत नाही.

**क) संधी**

१)	स्वत:चा विकास करण्यासाठी वनउपज हा आधार आहे.

२)	वनहक्क कायदा यामुळे विकासाच्या संधी आहेत.

३)	उपजीविकेच्या साधनांची उत्पादकता वाढवणाऱ्या सरकारी योजना, शिक्षण.

**ड) भिती / धोके**

१)	आदिवासी विस्थापनाची भिती.

२)	कमी-जास्त पाऊस-पावसाचा लहरीपणा.

३)	बाहेरच्या लोकांकडून जंगल नष्ट होण्याची भिती.

४)	सतत वाढणाऱ्या महागाईची भिती.

५)	जनावरं कमी होत आहेत.

६)	धर्माच्या आक्रमणाची भिती - आदिवासी धार्मिक आक्रमणामुळे मांसाहार कमी/बंद करु लागले आहेत. खेकडे, मासे खाणे बंद केल्यामुळे प्रोटीन, कमी अन्न या अभावी शरीर पोषण कसे होणार याची भिती.

(संदर्भ - सदरची माहिती 'शाश्वत' संस्थेत मंचर येथे २९ जून २०१० रोजी आंबेगाव तालुक्यातील ७ गावामधील आदिवासी ग्रामस्थ शाश्वत संस्थेच्या कुसुम कर्णिक, आनंद कपूर आणि मुंबई आय. आय. टी. चे विद्यार्थी कल्याण टांकसाळे यांच्या एकदिवशीय चर्चासत्रातून मिळाली. संशोधक स्वत: उपस्थित होते.)

***

### डिंभे परिसर शेती पद्धती -

## प्रस्तावना

डिंभे धरण परिसरातील लोकांच्या शेतीचा विचार करताना ‘गाळपेर शेती आणि पडकई शेती’ अशा दोन शेतीचा विचार करावा लागतो. गाळपेर शेती ही धरणातील पाणी खाली झाल्यावर उघडी पडणारी शेती आहे. सध्या यामध्ये गहु, हरभरा, बाजरी, वाटाणा इ. प्रमुख पिके घेतली जातात. १९८० च्या आधी डिंभे धरण परिसरातील गावांना प्रमुख पीके ही भाताची होती. लोकांना भरपूर पाऊस आणि भाताची योग्य जमीन यामुळे पुर्वी भात पिके सर्वत्र घेतली जात. सध्या वरई, सावा, नाचणी ही डोगरउतारावर थोड्याशा प्रमाणात केली जाणारी पिके हि सुध्दा प्रमुख पीके होती. प्रत्येकाला १०,२० पोती भात होत असे. आंबेमोहोर अशी सुवासीक भाताची जात याच भागात पिकत होती. धरणाला लागणाऱ्या काढून घेतल्या गेल्या आणि पुर्वीची समृध्दी जाऊन सध्या ४,५, पोते भात मोठ्या कष्टाने करून मिळवताना आदिवासी आपल्या आठ महिन्याचे धान्य सुध्दा जमा करू शकत नाहीत. याची खंत ते बोलून दाखवतात.‘‘स्थानिक कार्येकर्ते मोतीराम गेंगजे सांगत होते, ‘‘पुर्वी भाताची पिके एवढ्या प्रमाणात व्हायची की शेतात कामाला मजूर बोलवून आणावे लागायचे आज आम्हाला जगण्यासाठी दुसऱ्याच्या शेतात कामाला जावे लागत आहे.’’✻

धरण झाल्यानंतर भातशेती धरणात गेली आणि डोंगरउतारावर थोडी थोडी भातखाचरं तयार करून कसबसं उपजीविका चालवावी लागते. ती पुरेशी पडत नाही म्हणून धरणातील कडेकडेला असलेली जमीन पाणी कमी झाले तर उघडी पडणारी जमीन सरकारकडून काही रक्कम भरून वर्षीक भाड्याने कसायला मिळते तिला गाळपेर म्हणतात. सध्या गाळपेर धरणाच्या शेपटीकडील गावांना करायला मिळते कारण तिथले पाणी लवकर संपते. गाळपेर जमीनीत गहू, बाजरी, हरभरा, वाटाणा, कांदा असे पिके घेऊन वर्षभराचे अन्नधान्य गोळा करताना आदिवासी कुंटुंबाना कसरत करावी लागते.

---

✻ कुशिरे बु. । चे शेतकरी, मच्छिमार, सोसा. सदस्य, मोतिराम गेंगजे यांच्याकडून मिळालेली माहिती.

'पडकई' शेती म्हणजे आदिवासींच्या सांघीक शेतीचा प्रयोग आहे. डोंगकउतारावर असणाऱ्या जमीनीत भातखाचरं तयार करून तेथे भात शेती, सावा, वरई, खुरसणी, नाचणी इ. पीके काढली जातात. डोंगरउतारावर जेथे उभा राहाणे शक्य नाही अशा उतारावर शेती करणे हे किती कठीण असते हे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय लक्षात येत नाही.

आदिवासी एकमेकांना शेतीकामात, नांगरणी, बांधबंदिस्ती, सपाटीकरण या कामात एकत्र येऊन विनामुल्य मदत करतात. प्रत्येक शेत अशा मदतीमुळे लवकर लागवडीयोग्य करताना आदिवासीना या सांघीक 'पडकई' कार्यक्रमाचा फायदा होतो. सध्या रोजगार हमी योजनामुळे कृषी विभागाकडून पडकई कार्यक्रमाला मदत मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

डिंभे धरण परिसरातील गावे हि अंशत: विस्थापित आहेत. काही गावे पुनर्वसन झालेली आहेत. परंतु स्थानिक शेते गेल्यामुळे उपजीविका चालविताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

"…..१९९० च्या सुमाराला धरण बरेचसे बांधून झाले. मूळचा रस्ता पाण्याखाली गेला. अतिशय धडपड करुन, अभ्यास, मोर्चे, घेराल करुन धरणाकडेचा रस्ता मिळवला. शेवटच्या अहुपे गावापर्यंत बस जायाला लागली. डोंबरावरच्या गावातून संस्थेची काम सुरू होती. जाता-येताना खालची गावे नजरेस पडायची. चांगली माशाळ पिकणारी भातशेती पाण्याखाली गेली. मरमर मरुन तयार केलेली खाचरे ५०० रुपये एकर या मोबदल्यात सरकारने घेतली आणि पुर्वेकडच्या सिंचित क्षेत्रात आदिवासी लोकांना मात्र माळावर न पिकणाऱ्या जमिनीच्या अधाराला भिरकावून दिले. त्याला पुवर्नसन असे नाव असते."[३७]

सदर प्रकरणात भातशेती, पडकई शेती, गाळपेर शेती यांच्या आर्थिक स्थितीचा, समस्यांचा उपजीविकेतील एकूण हिस्यांच्या विचार केला आहे.

---

३७. कुधाजी डामसे : शाश्वतचे कार्यकर्ते, लेख : मिळून साऱ्याजणी, प्रकाशक गीताली वि.मं. पुणे, ऑगस्ट २०१०, पृ.२१.

## ४.१५ धरण परिसरातील शेती

आंबेगाव तालुक्यातील एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी वनाखालील क्षेत्र १९८४१ हेक्टर आहे. आणि पिकाखालील क्षेत्र ७४९०० हेक्टर आहे. या जमीनीत खरीप, रब्बी, उन्हाळी, पिके घेतली जातात. आंबेगाव तालुक्यातील पिक निहाय पाहाणी केली असता भात, ज्वारी, बाजारी, रागी, मका, तुर, मुग, उडीद, तीळ, कारळे, भुईमूग अशी विविधता लक्षात येते.

आंबेगाव तालुक्यातील पश्चिम भागात पाऊसाचे प्रमाण जास्त आहे. सरासरी वार्षिक पर्जन १२०० ते २५०० मि. मि. पडणाऱ्या भागात डिंभे धरण असून त्याच्या कडेकडेने वसलेले १९ गावामधून संशोधन क्षेत्र म्हणून १४ गावांची निवड केलेली आहे. या १४ गावामधील शेतीची पध्दत काय कोणती पिके घेतली जातात याचा विचार केला असता प्रामुख्याने या भागात भातशेती, गाळपेर शेती, पडकई शेती असे ढोबळमानाने शेतीचे विभाजन होते.

**४.१५.१ भातशेती–** डोंगरउताराची जमीन, भरपूर पाऊस यामुळे डिंभे परिसरात राहाणाऱ्या आदिवासी कुटुंबाचा प्रमुख आहार भात असून प्रत्येकाकडे थोडी थोडी भात खाचरं आहेत. धरण बांधण्यापुर्वी प्रत्येकाकडे भरपूर भात खाचरं होती. सुपीक जमीन भरपूर पाऊस यामुळे लोकांना १०,१५ पोती तांदूळ पिकत होता. इंद्रायणी, आंबेमोहर या जातीचा सुवासीक तांदुळ भरपूर पिकत असलेली गावे पश्चिम भागात होती. डोंगरावरुन पाण्याच्या ओहळाचे पाट काढून तांदुळाच्या पिकांची लागवड केली जात होती. परंतु १५ वर्षापुर्वी धरण बांधण्यासाठी सरकारने ५०० रूपये एकर प्रमाणे पैसे देऊन जमीनी खरेदी केल्या. आज लोकांकडे मोठ्या कष्टाने दगड धोंड्यातून तयार केलेल्या २,३ खाचरामधून २,३ पोते तांदूळ होतो. तो आठ महिने पुरत नाही. भाताची लागवड करण्यापुर्वी एप्रिल मे महिन्यात भात शेती करण्याची जमीन भाजून काढावी लागते याला ‘राब’ भाजणे असे म्हणतात. राब भाजण्यामुळे जमिनीचा कस वाढतो आणि अनावश्यक तण जळून जाते असे

स्थानिक लोक सांगतात. जून महिन्यात भाताचे पिक लावून ठेवतात १ महिन्यात मोठे झाल्यावर ते पावसाच्या चांगल्या सुरूवातीनंतर दुसऱ्या खाचरात लावतात त्याला 'लावणी' म्हणतात. ती साधारण जुलै महिन्यात करतात. ऑगस्ट महिन्यात तण काढतात त्याला 'बेणनी' म्हणतात. साधारण ४ महिन्यात भाताचे पिक तयार होते. ऑक्टोंबर महिन्यात त्याची कापनी करावी लागते.

साधारण जून ते ऑक्टोंबर महिन्यात भाताच्या पिकाची लागवड आणि कापणी असल्याने आदिवासी कुटुंबात कामाची धावपळ असते. डिंभे धरण परिसरातील १४ गावातील ८० परिवारांच्या सर्वेमधून साधारण ५१.२५% कुटूंबाकडे स्वत:ची भात खाचरं आसून वार्षिक ३ ते ५ पोते भात होतो असे दिसते.

खरिप हंगाम पेरणी व पीक परिस्थिती अंतीम हवाल २०१० अखेर पाहणी केली तर भाताचे सरासरी क्षेत्र ४७०० हेक्टर आहे आणि १००% पेरणीझाली असे निदर्शनास येते.

प्राथमिक सर्वेवरुन आंबेगाव, बोरघर या दोन गावामधून कातकरी आणि ठाकर मच्छिमार परिवार राहातात. मिळालेल्या माहितीवरुन कोणाकडेही भात खाचरं नसल्याचे समजते. तसेच फुलवडे, वचपे याठिकाणी भात लागवड कमी होते. बाकीचे तळपेवाडी, पाटण, म्हाळुंगे, दिगद, पंचाळे खु।।, पंचाळे बु।।., मेघोली, सावरली, कुशिरे खु।।, कुशिरे बु।। याठिकाणी भात लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. प्रत्येक कुटुंबाकडे ४,५ भात खाचरं आहेत. सरासरी ४,५ पोते भात वार्षिक उत्पन्न म्हणून मिळते. भाताची शेती प्रामुख्याने महादेव कोळी जमात करत आहे. त्यामुळे उपजीविका चालवताना ठाकार व कातकरी जमाती पेक्षा महादेव कोळी अडचणींचा सहज सामना करताना दिसतात.

**कोष्टक क्र. ४.६**

| गावाचे नांव | सर्वे केलेल्या कुटुंबाची संख्या | भात खाचरं असलेल्या कुटुंबाची संख्या | भाताचे वार्षिक उत्पादन (प्रति कुटुंब)(१पोते-१०० केजी) |
|---|---|---|---|
| फुलवडे | १२ | ४ | २ ते ६ पोते |
| तळपेवाडी | २ | १ | २ पोते |
| पाटण | १ | १ | ५ पोते |
| म्हाळुंगे | ५ | २ | ४, ५ पोते |
| दिगद | ७ | ५ | २, ३ पोते |
| पांचाळे बु ।। | ३ | २ | ३ पोते |
| पंचाळे खु ।। | ३ | ३ | २, ३ पोते |
| मेघोली | ६ | ६ | २, ४ पोते |
| सावरली | ८ | ७ | ४ ते ८ पोते |
| आंबेगाव | ८ | ० | - |
| कुशिरे खु ।। | ३ | ३ | ५० ते ७० किलो |
| कुशिरे बु ।। | ८ | ६ | ३ ते ८ पोते |
| बोरघर | ८ | ० | - |
| वचपे | ६ | १ | १ पोते |

**(संदर्भ - प्राथमिक सर्वेक्षण)**

**४.१५.२ गाळपेर** - आंबेगाव तालुक्यातील पश्चिम विभागात धरण बांधण्यापुर्वी साधारण १५ वर्षापुर्वी भातशेतीबरोबरच बरई, सावा, नाचणी, खुरसणी, बाजरी, हुलगा, कारळे अशी पिके घेतली जात होती. धरणासाठी सरकारचे जागा जमिनी घेतल्यामुळे या पिंकाच्या

जमीनी गेल्या. २००० मध्ये  धरण पुर्ण भरले. परंतू धरणाचे पाणी खालच्या गावांना सिंचनासाठी दरवर्षी सोडावे लागते त्यामुळे उन्हाळ्यात धरणातील पाणीसाठा खुप कमी होतो. तेव्हा धरणाच्या शेपटीकडील तसेच मधल्या काही गावांना धरणाची काही जमीनी उघडी पडते. धरणाच्या तोंडाजवळच्या आंबेगाव, फुलवडे या गावांना सोडले तर बाकी उर्वरीत १७ गावांना धरणाच्या उघड्या पडलेल्या जमीनीत ४/५ महिने शेती करता येते. धरणाच्या जमिनीत केल्या जाणाऱ्या या शेतीलाच ‘गाळपेर शेती ’ म्हणतात.

गाळपेर जमिनीत बाजरी, गहु, हरभरा, तुर, वाटाणा थोड्याफार प्रमाणात भाजीपाला पिकवता येतो. त्यामुळे डिंभे धरण परिसरातील लोकांचा महत्वाचा उपजीविकाचा स्त्रोत म्हणून गाळपेर शेती कडे पाहता येते. शासनाने धरणाच्या बांधकामापुर्वी जमिनी घेऊन लोकांच्या उपजीविकेच्या साधनांची कमतरता निर्माण केली परंतू सध्या शासनाकडूनच पाणीपट्टी भरुन धरणातील काही गुंठे एकर जमिन कसायला देत आहे. परंतु कागदपत्राच्या आनेक अडचणीमुळे लोक फारशी जमिन कसायला घेत नाहित. संशोधनाच्या प्राथमिक सर्वेवरुन १४ गावामधील ८० मच्छिमार आदिवासी परिवारांपैकी ४४ कुटुंबे गाळपेर जमिनीत शेती करून दोन पोते ते दहा पोते वार्षिक उत्पन्न घेत असल्याचे दिसते. ते गाळपेरमध्ये बाजरी हे प्रमुख पीक घेताना दिसतात. त्याखालोखाल गहु, हरभरा, नाचणी, वरई, हुलगा, वाटाणा इ. पिके घेत आहेत. बोरघर, आंबेगाव या ठिकाणी कोणीही गाळपेर शेती करत नाही कारण धरणाचे पाणी कमी होत नाही. म्हणून जमिनी उघड्या पडत नाहीत. शिवाय या भागात कातकरी, ठाकर आदिवासी जमातीचे मच्छिमार अधिक संख्याने आहेत. यांच्याकडे शेती कमी असल्याने ते अधिक उत्पन्न घेवू शकत नाहीत. गाळपेर शेती करण्याकडे महादेव कोळी या जमातीचा कल अधिक आसल्याने ते सुधारण्याच्या वरच्या टप्प्यावर आहेत. गाळपेर जमिनी या धरणातील पुर्वीच्या या लोकांच्या जमिनी आहेत. परंतु त्या कसण्यासाठी सुध्दा शासनाकडे विनंती, कागदपत्रे, पाणीपट्टी यामार्गाने मिळवाव्या लागतात. यामुळे आदिवासींना उपजीविकेला चालविण्यासाठी मोठ्या कष्टाने तोंड द्यावे लागते.

पाणीपट्टीचा विचार करुन महाराष्ट्र-कृष्णा खोरे सिंचन विखास महामंडळाने या जलाशयातील गाळपेर शेतीसाठीची लागणारी पाणीपट्टी कमी केल्याचे समजते. स्थानिक आदिवासी शेतकऱ्यांनी सिंचित गाळपेर शेती करिता प्रत्येकी५-७ शेतकऱ्यांचे गट करुन कमी वजनाचे डीझेल पंप युनिट, इंजिन असे संच 'शाश्वत' मार्फत उपलब्ध करुन गाळपेर शेतीला अधिक लागवडीखाली आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत. परंतु धरणाचा पाणीसाठा कमी झाल्यामुळे ५० फुटावर धरणाचे पाणी आणि ५० फुटाच्या अलिकडे पिके पाण्याअभावी जळून जात. तेंव्हा शेतकऱ्यांना या दुर्दैवाकडे पाहाण्यापलीकडे काहीच शक्य नसे. आजही बरेच गावात पाण्याअभाली गाळपेर शेती करता येत नाही. तेव्हा पंपसेट डिझेल इंजिन आणि वीज यांची मदत शासनाकडून व्हावी अशी लोकांची मागणी आहे.

## कोष्टक क्र. ४.७

| गावाचे नांव | सर्वे केलेले कुटुंब संख्या | गाळपेर करणारी कुटुंब संख्या | वार्षिक उत्पन्न प्रति कुटुंब |
|---|---|---|---|
| फुलवडे | १२ | ६ | ५/७ पोते |
| तळपेवाडी | २ | २ | १० पोते |
| पाटण | १ | ० | - |
| म्हाळुंगे | ५ | २ | ४ पोते |
| दिगद | ७ | ७ | २/३ पोते |
| पांचाळे बु ।। | ३ | ३ | ४ पोते |
| पंचाळे खु ।। | ३ | ३ | ८, १० पोते |
| मेघोली | ६ | १ | - |
| सावरली | ८ | ८ | ८ ते १० पोते |

| | | | |
|---|---|---|---|
| आंबेगाव | ८ | ० | - |
| कुशिरे खु।। | ३ | ३ | ३ ते ४ पोते |
| कुशिरे बु।। | ८ | ७ | ४ ते ४ पोते |
| बोरघर | ८ | ० | - |
| वचपे | ६ | २ | ३ पोते |
| **एकूण** | ८० | ४४ | |

(संदर्भ-प्राथमिक सर्वेक्षण)

**४.१५.३ पडकई शेती** - 'पडकई' शेती आंबेगाव मधील डिंभे धरण परिसरातील लोकांचा महत्वाचा उपजीविका स्त्रोत असून भविष्यात अधिक उत्पन्न घेऊन आदिवासींना वर्षभर पुरेल ऐवढे अन्न निर्माण करण्यासाठी महत्वाचा आधार आहे. शाश्वत संस्थेचा एक अतिशय महत्वाचा आणि यशस्वी उपक्रम म्हणजे 'पडकई'. पडकई म्हणजे आदिवासींचा सांघिक शेतीचा प्रयोग. आदिवासी हे मूळातच खुप गरीब आणि दारिद्रयात दिवस कंठत असतो तो इतरांकडे शेतमजूर म्हणून जात असतो तेव्हा आपल्या थोड्याशा शेतीमध्ये दुसऱ्या मजुरांना कामाला नेमणे आणि त्याला मजुरी देणे तसे परवडणारे नसते. शेतीची बांधबदिस्ती करणे, सपाटीकरण करणे, डोंगरउतारावर 'खाचरं' तयार करणे यासाठी लोक एकमेकांना मदत म्हणून शेतात विनामुल्य मदतीसाठी जातात यालाच पडकाई म्हणतात. यामुळे प्रत्येकाचे कठिण बांधबंदिस्तीचे काम लवकर होते. पुर्वी भातखाचरांमधून चार महिने पुरेल एवढा भात उत्पन्न मिळत असे. परंतु पडकई कार्यक्रम राबवून नविन खाचरं तयार केल्यामुळे सध्या आठ महिने पुरेल एवढा भात उत्पन्न होते. पडकई कार्यक्रम जर योग्य प्रकारे राबविला तर वर्षभर पुरेल ऐवढे उत्पन्न आदिवासी सहज घेऊ शकतो.

२००६ या वर्षी शाश्वत संस्थेतर्फे रोजगार हमी योजनेअंतर्गत डिंभे धरण पाणलोट क्षेत्रातील ३८ आदिवासी गावांतील सुमारे ६००० खातेदार लाभार्थींच्या खाजगी जमिनीवर सुमारे १२०० हेक्टर जमिनीमध्ये दगडी बांध लावून भात खाचरे तयार करणे. आणि २४०० हेक्टर जमिनीवर फिरती शेतीच्या जमिनीवर दगडी बांध घालणे असा प्रायोगिक तत्वावरील पडकई कार्यक्रम ७०% पुर्ण आहे. ८० कुटुंबाच्या सर्वेक्षणामध्ये २६ कुटुंबानी 'पडकई' कार्यक्रमासाठी मदत करतो असे सांगीतले. चर्चासाठी मंचर येथे बोलवलेल्या ४,५ गावांतील आदिवासी शेतकऱ्यांनी सांगितले ''७/१२ वरील जमीनीवर किती उताराची जमिन आहे त्यावर पडकई कार्यक्रम ठरविला जातो आणि बांध बंदिस्तिसाठी शासनाकडून अनुदान मिळते. १ वर्षात ८ ते १२% उतार असणाऱ्या जमिनीत स्वकष्टाने ५ ते ६ गुंठे आणि यंत्राने १ एकर असे खाचरं निर्माण करता येतात.''

५ गुंठे ते ८० गुंठे (साधारण २ एकर) एवढ्याच जमिनीवर पडकई कार्यक्रम राबविण्यासाठी १ व्यक्तिस शासनाकडून मदत मिळते. हि मर्यादा अडचणीची ठरते. चालु वर्षी रोजगार हमी योजनाचे कामाचे नियोजन करण्यासाठी शाश्वत संस्थेची शासनाने निवड केली आहे. त्यामुळे काही अडचणी सोडवण्याची संधी आहे.

उपजीविका चालविण्यासाठी लोक पुर्वपार शेतीचा आधार घेत आले आहेत. नव्हे शेती हाच मुख्य अधार ठरला आहे. आदिवासी लोकांकडे क्षमता आहेत. शेतीचे ज्ञान आहे. फक्त साधने उपलब्ध झाली की त्यांना आपली उपजीविकासाठी सर्व आयुष्य कष्ट करण्यात न घालवता इतर विकासाकडे लक्ष देता येईल. आदिवासीच्या आर्थिक स्थिती विषयी डॉ. गोविंद गारे लिहतात ''उत्पादनाच्या साधनांकरिता लागणारा पैसा व कुशलता यांचा अभाव हे आदिवासींच्या गरिबीचे प्रमुख कारण आहे. आदिवसी सरळ स्वभावाचे असल्यामुळे इतर पुढारलेल्या समाजातील लोकांशी ते स्पर्धा करु शकत नाहीत. सावकार व काही व्यापारी यांनी आदिवासींची पिळवणूक केल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची झाली आहे. त्यांच्या जमिनीसंबधीचा मुख्य प्रश्न म्हणजे जमिनीचा प्रकार आणि सुपीकता.

आदिवासींच्या चांगल्या सुपिक जमिनी काढून घेऊन त्यांना डोंगर कपारित लोटण्याचे काम शतकानुशतके होत आले आहे. त्यामुळे त्यांची वस्ती डोंगराळ व जंगल भागात आणि त्यांच्या जमिनी डोंगरमाथ्यावर किंवा डोंगरउतारावर आढळतात. या जमिनी वरकस, उंचसखल आणि बऱ्याचशा नापिक असतात. अधिक अंग मेहनत करुनही वर्षभर लागणारे धान्य ते पिकवू शकत नाहीत.''[३८]

अशा परिस्थितीत जगणाऱ्या आदिवासीनां पडकई सारखे उपक्रम निश्चितच फायदेशीर ठरणारे आहेत. शासनाचे नियम आणि नविन जमिनी उपलब्धी मधील अडचणी दूर झाल्यातर आदिवासींना निश्चितच दारिद्रयातून वर येण्यासाठी मदतीचे ठरु शकते.

****

३८. डॉ. गारे गोविंद : आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन, अमृत प्रकाशन, औरंगाबाद, मे १९९४, पृ. ४४

## हिरडा उद्योग -

डिंभे धरण परिसरातील मच्छिमार परिवारांच्या उपजिविकेचा अभ्यास करताना संशोधकास मुख्यत्वे 'गाळपेर' शेती, 'पडकई' शेती, मासेमारी आणि जंगल उत्पादने यांचा विचार करावा लागला, कारण उपजिविकांचा विचार करताना आंबेगाव तालुक्यातील पश्चिम भागातील डिंभे धरण परिसरात राहाणाऱ्या आदिवासी कुटूंबाकडे उपजिविका चालवण्यासाठी या गोष्टीशिवाय वा साधनांशिवाय दुसरे पर्याय नाहित.

आंबेगाव तालुका नैसर्गिकरित्या तीन विभागात विभागला गेला आहे. पैकी पश्चिम विभाग हा इतर उर्वरीत दोन विभाग म्हणजे मध्य विभाग व पुर्व विभागापेक्षा जास्त पर्जन्याचा आणि जंगलव्याप्त आहे. आंबेगाव तालुक्यातील एकूण वनाखालील क्षेत्र १९८४१ हेक्टर इतके आहे. या वनातून आदिवासी लोकांना काय काय वस्तू, अन्नधान्य, औषधी वनस्पती , फळे मिळतात त्यांच्यापासून उपजिविकेला किती हातभार लागतो, आर्थिक स्थितीला काही चालना मिळते का याचा विचार करताना वनउपजामधून काय काय मिळते याचा विचार केला. हिरडा व्यावसायासाठी भांडवली गुंतवणूक करावी लागत नसल्याने हा व्यावसाय येथील लोकांच्या उपजीविकाचा एक प्रमुख स्त्रोत बनला आहे.

आंबेगाव तालुक्यातील ज्या भागात पावसाचे प्रमाण ८०० मिली मिटर पेक्षा जास्त आहे. अशाच भागात तेथील नैसर्गिक परिस्थितीमुळे हिरडा उत्पादन होते. गेल्या काही वर्षाचा इतिहास पाहिला असता हिरडा वेचणाऱ्या कुटूंबात फारशी घट झाली नाही, यावरुन हा व्यावसाय फायदेशीर ठरत असल्याचे दिसते. ९० टक्के हिरडा मालकीच्या झाडावरुन वेचला जातो तर १० टक्के हा फॉरेस्ट खात्याच्या मालकीच्या झाडावरुन वेचला जातो. हिरड्याला मिळणाऱ्या भावात सातत्याने चढउतार होत असतात. तरिही हा व्यवसाय लोकांना अडचणीच्या वेळी आर्थिक मदत करणारा आहे. २००६ यावर्षी ६० रुपये किलो असा असणारा भाव २०१० वर्षी ३५ रुपये असा होता. शिवाय तो भाव हिवाळ्यात मिळतो आणि लोक हिरडा विक्री उन्हाळ्याच्या शेवटी कमी भावात करतात. यामुळे लोकांना कष्टाने

वेचलेला हिरडा भाव चांगला असतानाही केवळ आर्थिक अडचणीमुळे कमी भावात विकून ३ महिन्यात पावसाळी उपजीविकासाठी तरतुद करावी लागते.

हिरड्या व्यतिरिक्त लोकांना जंगल उत्पादने म्हणून येथे मिळणाऱ्या मध, आंबा, करवंदे, जांभूळ, आवळा, रानभाज्या-चावा, कोळू, घायपात, कुर्टुले, चिचुर्डी, पाथी, कुरडू इ. भाज्या यामधूनही उपजीविका चालवावी लागते. जंगलातील कंदमुळे आणि रान भाज्या तर कातकरी लोकांच्या पावसाळ्यातील प्रमुख जीवन जगवणाऱ्या घटक ठरतात.

जंगलावर आधारीत दुसरा प्रमुख व्यावसाय म्हणजे विटभट्टी कातकरी लोकांना आर्थिक पाठबळ देणारा काही प्रमाणात स्थलांतर थांबवणारा व्यावसाय म्हणजे विटभट्टी. या भागात विटभट्टी व्यावसाय करणारे बरेच कुटूंबे आढळतात. मालकाकडून ७, ८ महिने काम करण्यासाठी १५, २० हजार उचल घेतात आणि फिटेपर्यंत काम करतात. या व्यावसायाला लागणारा कच्चा माल म्हणजे जंगलातील धरणाच्या कडेकडेचा वाहून आलेला गाळ, भाताचा कोंडा, गवत, कोळसा यांची उपलब्धता जंगलातूनच होते.

शिवाय रोजच्या जळणातील इंधन म्हणून जो लाकूड फाटा मिळतो तो संपूर्ण जंगलातूनच आणला जातो. घरानां लागणारी लाकडे, दरवाजे होड्याची लाकडे, छपरे यासर्वांना जंगलातूनच लाकडे पालापाचोळा मिळतो. सर्व गोष्टींचा विचार केला तर जंगल आदिवासी कुटुंबाचे प्रमुख उपजिविका स्त्रोत असल्याचे दिसते तरीही येथील लोक जंगलाचा विध्वंस करताना दिसत नाहीत. पर्यावरणाचा समतोल टिकवून ठेवताना दिसतात. आपल्या जीवनात संस्कृतीत जंगलातील अनेक गोष्टींना देव मानले आहे. वड, उंबर, पिंपळ, शीद अशा झाडांना हातही लावत नाहीत. आदिवासींना पर्यावरणीय जाणीव असून वनसंरक्षण व संवर्धन त्यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. निसर्गपूजा, निसर्गप्रेम यातून त्यांची पर्यावरणीय जाणिव स्पष्ट होते. मुख्य समाजाने निसर्ग आपली जहागीर मानल्याने त्यांना आनेक समस्यांना सामोरे जावे लागले आहे. आदिवासी समाजामध्ये निसर्ग आणि स्वत:च्या क्षमता यांचा योग्य समतोल साधून आदिवासी जीवन कमी गरजात आनंदाने जगताना दिसतो हे खुप मार्गदर्शक आहे.

''कोणत्याही समाजाचा विकास व्हावयाचा असेल तर त्याला स्वत:मध्ये असलेल्या क्षमतेची जाणीव होणे आवश्यक आहे व स्वत:च्या विकासासाठी प्रत्यक्ष साधने त्याच्याजवळ असणेही जरुरी आहे. त्याचबरोबर क्षमतेचा आणि साधनांचा योग्य उपयोग करता यावा यासाठी माहिती व शिक्षण मिळणे ही प्राथमिक गरज आहे.''[३९]

संशोधकाने प्रस्तुत प्रकरणात हिरडा, जंगल उत्पादने, विटभट्टी यांचा अभ्यास करताना अडचणी, वाहतूक, पिळवणूक पध्दती यांच्याबरोबर पर्यावरणाला फायदा, तोटा यांचाही अभ्यास केला आहे. तसा संपूर्ण हिरडा हा अभ्यास विषय होईल याची जाणीव संशोधकास असल्यामुळे मर्यादित वेळेत वास्तव मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

## ४.१६ आंबेगाव तालुक्यातील हिरडा उद्योगाचा भौगोलिक अभ्यास

सह्याद्रितील घाटमाथ्यावरील आंबेगाव तालुक्यात हिरडा उत्पन्न होते. हिरडा उत्पन्न प्रामुख्याने वर्षात दोन वेळा निघत असते. हिरडा हंगामाचे स्वरुप हे तेथील स्थानिक भौगोलिक परिस्थितीवर अवलंबुन आसल्याने त्याला भांडवल गुंतवावे लागत नाही. पुर्वीपासुन खात्रीशीर बाजारपेठ उपलब्ध नसली तरी आज विविध आदिवासी संस्था, व्यापाऱ्यामार्फत हिरडा घेतला जातो.

संज्ञा - हिरडा

लॅटीन नाव - Terminalia Chebula Retz

कूळ - अर्जुन कूळ

उपयोगी भाग - फळे

पुणे जिल्हा हा औद्योगिक आर्थिक व शेती विकसित असलेला जिल्हा आहे. मात्र या जिल्ह्यांचा पश्चिम भाग हा डोंगर व दऱ्याखोऱ्यानी व्यापला आहे.

---

३९. ॲड. मोरे माधव बंडू, आदिवासी बोलू लागला, सुगावा प्रकाशन, पृ. २५

स्थानिक नैसर्गिक परिस्थिती व साधन संपत्तीला अनुसरून विविध व्यावसाय विकसीत होत गेले आहेत.

पश्चिम तालुक्यात हिरडा उत्पन्न हे पुर्णत: जंगली भागात होते. आंबेगाव तालुक्यातील घाटमाथ्यावर बऱ्याच मोठ्या प्रमाणावर हिरडा उत्पन्न घेतले जातो.

* **भौगोलिक पार्श्वभूमी** - पुणे जिल्ह्यातील उत्तरेला आंबेगाव तालुका आहे. तालुक्याच्या पश्चिम भागात हिरड्याचे उत्पन्न घेतले जाते. तालुक्यातील ३१,२०५.१ हेक्टर जंगल क्षेत्रामध्ये हिरडा उत्पादन होते. या तालुक्यात पश्चिम भागात उतार जास्त असून पर्जन्यमान १२० ते २४० मि. मी. इतके आहे. या तालुक्यातील हे वातावरण हिरड्यास पोषक आहे.

तालुक्याच्या अक्षवृत्तीय विस्तार १८°१३'' ४५' ते १८° ५१'' १०' उत्तर असुन रेखावृत्तीय विस्तार ७३° ३०'' ४०' ते ७४° १०'' ५' पूर्व दरम्यान पसरेला आहे. तालुक्याची लोकसंख्या २००१ च्या शिरगणतीनुसार २१,३८४२ आहे. हिरडा उत्पादन आढळून येणाऱ्या गावांची एकूण लोकसंख्या २१८३७ आहे.

भौगोलिक पार्श्वभूमीचा विचार केला तर ह्या भागातील सरासरी उंची १००० ते १२०० मीटरच्या दरम्यान आहे.

घोड प्रमुख नदी असून तीला ब्रुबा व नंदा ह्या दोन उपनद्या मिळतात. मान्सून प्रकारचे हवामान असून अधिक पाऊस जून ते ऑक्टोंबर या काळात होतो. हिरडा उत्पादनाचा भागात ८०० मिली पेक्षा जास्त पाऊस पडतो. तालुक्याचे सरासरी तापमान ३२° से.ग्रे. व किमान तापमान २७° सें.ग्रे. आहे.

पाऊस जरी जास्त पडत असला तरी त्या पाण्याचा निचरा होतो कारण उतारही जास्त आहे.

स्थानिक परिस्थितीचा विचार केला तर भौगोलिक परिस्थितीमुळे येथे हिरडा उत्पादन होते.

* **हिरडा वृक्ष** - हिरड्याचे झाड उंच पानझट प्रकारचे आहे. खोड खडबडीत काळपट असून फांद्या पसरट असतात. पाने साधी टोकदार व देठयुक्त असतात. देठांच्या टोकाजवळ दोन ग्रंथी असतात. फुले हिरवट पिवळी, पांढरी व लांब तुऱ्यात येतात. फळे खारीकेच्या बियांच्या आकारची आसतात. हिरडा हा हिवाळा हंगामात गोळा केला जातो.

* **हिरडा गोळा करणे** - उन्हाळ्यात फळ लागण्यास सुरूवात झाल्यावर कोवळी फळे जातात. त्यापासून बाळ हिरडा तयार केला जतो. हिरड्याचा उपयोग औषधी वनस्पती केला जातो. तो हंगामाच्या काढणीनुसार वेगवेगळा असतो.

उन्हाळ्यात काढलेल्या कोवळ्या फळांचा उपयोग आयुर्वेदिक औषध उद्योगात तर दिवाळीत काढलेल्या फळांचा उपयोग रंग बनविण्यासाठी केला जातो. हिरडा उत्पादन घेण्यासाठी स्थानिक मालकीची झाडे असतात. शेतीला पुरक आसल्याने या उद्योगाचा समावेश कुटीर उद्योगात केला जातो. हिरडा गोळा करणे मे महिन्यापासून चालू होतो. त्यामुळे शेतीची फारशी कामे नसल्याने हा कुटीर उद्योग बेरोजगारांना देतो. येथील शेती पध्दतीपाहता मे ते जून या काळात राबणी, नांगरणी, बांध दुरूस्ती इ. कामे चालू असली तरी त्यासाठी कुटूंबातील सर्वांना आर्थिक प्राप्ती होणारी कामे मिळत नाहीत. याच काळात हिरडा गोळा करण्यामुळे लहान थोरांना पैसे मिळण्याचे एक साधन मिळते.[४०]

### ४.१६.१ हिरड्याची उपलब्धता -

हिरडा निर्मितीसाठी आवश्यक कच्चा माल म्हणजे ओला हिरडा होय. हिरडा सुकण्यासाठी भरपूर सुर्यप्रकाश व कोरडी हवा आवश्यक असते. एप्रिल व मे महिन्यात हिरडा सुकविला जातो.

### ४.१६.२ हिरडा तयार करण्याची पध्दत -

१) झाडावरून फळे काढणे.

२) उन्हात वाळविणे.

---

४०. प्रा. उगले विलास, डॉ. सप्तर्षी प्रविण, लेख : आदिवासी संशोधन पत्रिका, मार्च २००६, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र शासन, पुणे, पृ.४१,४२

३)	काढलेली फळे उन्हाने तापल्याने पायाने काळी होईपर्यंत तुडविने.

४)	सर्वात शेवटी निवड करणे.

हिरडा निर्मितीसाठी या चारही पध्दती महत्वाच्या असून त्या क्रमाने कराव्या लागतात. ९ ते १० दिवसात हिरडा सुकून तयार होतो.

तालुक्यात हिरडा खरेदी करणाऱ्या आठ सहकारी संस्था आहेत. ह्या सलग १९८० पासून हिरडा खरेदी करतात. २००४ या वर्षीचा भाव ८० रुपये प्रति किलो. असा होता तर २००५ या वर्षीचा भाव ३९.४० रूपये असा होता. [४१]

तिरपाड, अडीवरे, तळेघर, घोडेगाव, डिंभा याठिकाणी हिरडा खरेदी-विक्री चालते.

**<u>कोष्टक क्र. ४.८</u>**

**२००१ या वर्षी आंबेगाव तालुक्यातील सर्वेक्षण (हिरडा उद्योग)**

| अ.क्र. | गावाचे नांव | उत्पादकांची संख्या | कामगार संख्या | किलो ग्रॅम |
|---|---|---|---|---|
| १) | पांचाळे खु।। | १० | ४३ | १७०० |
| २) | माळीण | १० | ४३ | ९८५ |
| ३) | डोण | १० | ४२ | २०२० |
| ४) | नान्वडे | १० | ३० | २१६० |
| ५) | अहुपे (अर्हीशि) | १० | ३२ | २१०० |
| ६) | कोंढवळ | १० | ३२ | २१०० |
| ७) | राजेवाडी | ८ | ३२ | १७०० |
| ८) | फुलोदे | १० | ३२ | १४५० |
| ९) | चिखली | १० | २९ | १२०० |

४१. आदिवासी संशोधन पत्रिका, प्रकाशन, आदिवासी संशोधन आणि प्रकाशन संस्था, पुणे, मार्च २००६, पृ.४४-४५

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०) | राजपूर | १० | ३४ | १७०० |
| | **एकूण** | **९८** | **३४९** | **१७,११५** |

(सर्वेक्षण २००१) स्त्रोत-आदिवासी संशोधन पत्रिका मार्च २००८.

तालुक्यात हिरडा खरेदी करणाऱ्या आठ सहकारी संस्था आहेत. १९८० पासून हिरडा खरेदी करतात. २००४ या वर्षी प्रतिकिलो ८० रुपये हिरड्याला भाव होता तो २००५ मध्ये ३९.४० रुपये असा होता.

एकूण उत्पन्न १७११५ × ३९.४० रुपये = ६७४३११ ÷ ३४९ मजूर = १९३२.१८ रुपये प्रतिव्यक्ती

**एकूण उत्पन्न १७११५ × १० = १७११५०**

१) हिरडा जमा करणाऱ्या प्रत्येक व्यक्तिस रुपये १९३२ रुपये मजुरी मिळते.

२) हिरडा झाडावरुन काढण्यापासून ते हिरडा तयार करण्यापर्यंत २० ते ४० दिवस लागतात.

३) ४८.३० रुपये रोजाने ४० दिवस मजुरी मिळते.

४) हिवाळ्यात भाव कमी असतो त्यामुळे मजुरी कमी मिळते.

* महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांची २००८-२०१० या हंगामात गौणवनोपज खरेदी.

## <u>कोष्टक क्र. ४.९</u>

(वजन क्विंटलमध्ये किंमत लाखात)

| अ.क्र. | प्रमुख वस्तुचे नांव | २००७-२००८मध्ये झालेली खरेदी वजन (क्विंटल) | किंमत (लाख) | २००८-२०१०मध्ये झालेली खरेदी | |
|---|---|---|---|---|---|
| १) | हिरडा | १३६१७.०० | ८३.९० | २८०७४.९० | २९३.०६ |
| २) | डिंक | १३.०० | ०.६३ | ३२.१३ | १.७७ |
| ३) | मोहफुले | १२९१०.०० | ९३.०७ | २४९.०४ | २.४३ |
| ४) | टोळंबी | १७.०० | ०.१४ | ०.०० | ०.०० |
| ५) | आंबाटोळी | ०.०० | ०.०० | २६.७८ | ०.०९ |
| ६) | काजु बी | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७) | कुचलाकारा | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ८) | आवळा | ९.०० | ०.०८ | ०.०० | ०.०० |
| ९) | चिंच बी विरहीत | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १०) | चारोळी | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ११) | बेहडा | ०.०० | ०.०० | २०.०१ | ०.०२ |
| १२) | चिंच बी | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १३) | इतर वस्तू | ७.४५ | ०.०१ | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **२६५७३.४५** | **१७७.८३** | **२८४०२.८६** | **२८७.३७** |

(**संदर्भ** - ३७ वा वार्षिक अहलाल २००८-२०१० महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या. नाशिक पान क्र. ५ - कार्यालय आदिवासी विकास विभाग-एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव, ता. आंबेगाव पुणे)

## कोष्टक क्र. ४.१०

## ❋ गौण वनोपज विक्री

(वजन क्विंटलमध्ये किंमत लक्षात)

| अ.क्र. | प्रमुख वस्तुचे नांव | २००७-२००८मध्ये झालेली विक्री | | २००८-२०१०मध्ये झालेली विक्री | |
|---|---|---|---|---|---|
| | | वजन | किंमत | वजन | किंमत |
| १) | हिरडा | १३५९५.०० | १४४.६२ | ३२०५४.४६ | ४५३.९२ |
| २) | डिंक | ५.०० | ०.१५ | ४०.७९ | २.३३ |
| ३) | मोहफुले | ३१४०.०० | २१.८३ | ३८७९२.५७ | १८४.५० |
| ४) | टोळंबी | ०.०० | ०.०० | १५.९१ | ०.१६ |
| ५) | बेहडा | २७५.०० | ०.६१ | १५४.६७ | ०.३० |
| ६) | आवळा | ९०७.०० | २०.६६ | ८.७५ | ०.१० |
| ७) | काजु बी | १३१.०० | ४.९७२ | २.९५ | ०.२५ |
| ८) | कुचलाकारा | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ९) | चारोळी | ७०.०० | १०.४५ | ०.०० | ०.०० |
| १०) | चिंच बी विरहीत | ०.०० | ०.०० | २२.३५ | ०.०७ |
| ११) | बिबा | ०.०० | ०.०० | २१.६८ | ०.०८ |
| १२) | इतर वस्तू | ३२.१७ | ०.१७ | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **१८१५५.१७** | **२०३.४१** | **७१११४.१३** | **६४१.७१** |

(**संदर्भ** - ३७ वा वार्षिक अहलाल २००८-२०१० महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या. नाशिक पान क्र. ६ - कार्यालय आदिवासी विकास विभाग-एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव, ता. आंबेगाव पुणे)

**✻ महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचे गौण वनउपज खरेदी प्रादेशिक संस्था-**

महामंडळाचे भागधारक आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थाची संख्या संपूर्ण महाराष्ट्रात ९२६ आहे. [४२]

**कोष्टक क्र. ४.११**

**पुणे जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची यादी**

**(प्रादेशिक कार्यालय जुन्नर)**

| अ.नं. | संस्थेचे नांव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|
| १) | गंगापूर | आंबेगांव | पुणे |
| २) | पिंपळगाव तर्फे घोडेगाव | आंबेगांव | पुणे |
| ३) | साल | आंबेगांव | पुणे |
| ४) | शिनोली | आंबेगांव | पुणे |
| ५) | तळेघर | आंबेगांव | पुणे |
| ६) | बोरघर | आंबेगांव | पुणे |
| ७) | तिरपाड | आंबेगांव | पुणे |
| ८) | आसाणे | आंबेगांव | पुणे |
| ९) | जांबोरी | आंबेगांव | पुणे |
| १०) | डिंभे खुर्द।। | आंबेगांव | पुणे |
| | | | |
| १) | तांबे | जुन्नर | पुणे |
| २) | खानगाव | जुन्नर | पुणे |
| ३) | उच्छिल | जुन्नर | पुणे |

४२. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, मर्या. नाशिक, ३७ वा वार्षिक अहवाल, २००८-२०१०, पृ.४७,४८

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | इगळून | जुन्नर | पुणे |
| ५) | पारगाव तर्फ मढ | जुन्नर | पुणे |
| ६) | निमगीरी | जुन्नर | पुणे |
| ७) | खांळगाव | जुन्नर | पुणे |
| ८) | मढ | जुन्नर | पुणे |
| ९) | पिंपळगाव जोग | जुन्नर | पुणे |
| १०) | खडकुंबे | जुन्नर | पुणे |

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मोरोशी | खेड | पुणे |
| २) | डेहाणे | खेड | पुणे |
| ३) | कुडे बु।। | खेड | पुणे |
| ४) | सेंदुर्ली | खेड | पुणे |
| ५) | शिरगांव | खेड | पुणे |
| ६) | टोकावडे | खेड | पुणे |

*** डिंभे धरण परिसरातील १४ गावांमधील मच्छिमार कुटुंबाच्या हिरड्याच्या व्यावसायाची स्थिती.**

(१४ गावामधील ८० कुटंबाची माहिती)

(संशोधन क्षेत्रातील प्रश्नावलीच्या माहितीच्या, चर्चेच्या आधारे)

## कोष्टक क्र. ४.१२

| क्र. | गावाचे नांव | संशोधनासाठी निवडलेली कुटूंबे | पैकी हिरडा वेचणारी कुटुंबे | कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न (किलो)(हिरडा) |
|---|---|---|---|---|
| १) | फुलवडे | १२ | नाही | - |
| २) | तळपेवाडि | २ | नाही | - |
| ३) | पाटण | १ | १ | २०० किलो |
| ४) | म्हाळुंगे | ५ | नाही | - |
| ५) | दिगद | ७ | ३ | ५० किलो |
| ६) | पांचोळे बु।। | ३ | १ | २०० किलो |
| ७) | पांचोळे खु।। | ३ | ३ | २५ ते १०० किलो |
| ८) | मेघोली | ६ | ५ | २० ते १० किलो |
| ९) | सावरली | ८ | ६ | ७५ ते ५०० किलो |
| १०) | आंबेगाव | ८ | नाही | - |
| ११) | कुशिरे खु।। | ३ | ३ | ४० ते २०० किलो |
| १२) | कुशिरे बु।। | ८ | ८ | ४० ते १५० किलो |
| १३) | बोरघर | ८ | नाही | - |
| १४) | वचणे | ६ | नाही | |
| | **एकूण** | **८०** | **३०** | |

८० पैकी हिरडा वेचणारी कुटुंबे ३० आहेत. म्हणजे ३७.०५% लोक हिरडा व्यावसायावर अवलंबून आहेत. सर्वाधिक वेचणारी कुटुंबे कुशिरे बु।।, कुशिरे खु।।, मेघोली, सावरली, पांचाळे खुर्द या गावांची आहेत.

मे महिन्यात जो हिरडा वेचला जातो तो बाळ हिरडा म्हणून ओळखला जातो. जानेवारी महिन्यात हिवाळ्यात जो हिरडा वेचला जातो तो मोठा हिरडा समजला जातो. बाळ हिरडा हा औषधी कंपन्याना लागतो त्याचा भाव चांगला मिळतो. मोठा हिरडा हा कमी भावात विकला जातो. मागील वर्षी बाळ हिरड्याचा भाव ४० रुपये कलो होता. सध्या या वर्षी तो ४५ रुपये आहे. तर मोठा हिरडा ५ ते ४ रुपये प्रमाणे विकला जातो.

१ पोते साधारण (९६० किलो) हिरडा वेचला तर त्यामधून सुकवून तयार केलेला बाळ हिरडा हा २५% च मिळतो. चार पोत्यामधून एक पोते 'बाळ हिरडा' तयार होतो म्हणून हा व्यवसाय खूप कष्टाचा आहे.

हिरड्याचा भाव चांगला मिळण्याचा काळ जानेवारीनंतर हिवाळ्यात असतो. परंतु लोकांना हिरडा विकावा लागतो उन्हाळ्यात मे मध्ये कारण मे महिन्याच्या शेवटी लोक 'अगोठीचा बाजार' करतात. अगोठ म्हणजे स्थानिक बोलीभाषेत पावसाळा. मे महिन्यात शेतात काही नसते. शिल्लक धान्यसाठा संपत आलो असतो. मासेमारी पाणी गेल्यामुळे बंद असते. म्हणून पावसाच्या ३ महिन्यात उत्पन्नाचे साधन हाताशी नसते म्हणून हिरडा एकमेव अधार असलेले कुटुंबे तो उन्हाळ्यात विकून ३ महिन्याचे एकत्रीत मिठ, मिरची, धान्य, कडधान्य भरून ठेवतात याला 'अगोठीचा बाजार' करणे म्हणतात. परंतु हिवाळ्यात हिरड्याचा भाव जवळजवळ दुप्पट होतो. परंतू आधीच हिरडा विकून टाकल्यामुळे त्याचा फायदा वेचणाऱ्या कुटुंबाना होत नाही तर तो व्यापाऱ्यांना होतो.

उदा. १ कुटुंबाकडे १०० किलो हिरडा जमा होतो

मे मधील भाव २० रुपये किलो २० × १०० = २००० रुपये

जानेवारीतला भाव ४० रुपये किलो ४० × १०० = ४००० रुपये

मे मध्ये हिरडा विकावा लागल्यामुळे जवळजवळ निम्मे नुकसान सहन करावे लागते.

****

## डिंभे परिसर मच्छमारी व्यवसाय -

महाराष्ट्र राज्याला सुमारे ७२० किमी लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे आणि राज्यातील नद्यांची लांबी सुमारे ३.२ हजार कि.मी.असून कालव्यांची लांबी १२.८ हजार कि.मी. आहे. राज्यात १.१२ लाख चौ. कि.मी. क्षेत्र सागरी मच्छिमारीसाठी. ३२० हजार चौ. कि.मी. (३.२० लाख हेक्टर) क्षेत्र गोड्या पाण्यातील मच्छिमारासाठी योग्य आहे. भारतात सागरी मासेमारीवर खुप संशोधन झाले आहे. कारण सागरी मासेमारीमार्फत निर्यात वाढून चांगले परकिय चलन मिळते. परंतु गोड्यापाण्यातील मासेमारीवर संशोधन फारसे होत नाही. हे भाग म्हणजे देशांतर्गत धरणे, तलाव, तळे, नद्या या होत. यांचे योग्य नियोजन केले तर यावर आधारित जीवन जगणाऱ्या करोडो लोकांच्या रोजगाराचा प्रश्न सुटू शकतो.

डिंभेधरण परिसरातील आदिवासी मच्छिमार परिवारांच्या उपजीविकेचा अभ्यास करताना संशोधकास मासेमारीच्या समस्याही लक्षात येत होत्या. सदर संशोधनात एकूण उपजीविकेपैकी मासेमारीचा हिस्सा किती आहे. एकूण सामर्थ्य काय आहे. मासेमारीच्या अडचणी कोणत्या. शासकिय मदत नियम यांचा आढावा घेतला आहे. ‘‘आंबेगाव तालुक्यात नदीची लांबी ८० कि.मी. असुन मत्यव्यावसायासाठी अनुकुल क्षेत्र १५४८ हेक्टर आहे.’’ [४१] डिंभा येथे घोड या नदीवर १२८० हेक्टर सरासरी क्षेत्राचे धरण आहे. आणि या जलाशयाच्या कडेकडेला १९ अंशत: विस्थापित गावे असून सर्व गावात ९९% आदिवासी समाजाचे लोक वास्तव्य करुन आहेत.

भारतात ब्रिटीश रावट असताना मासेमारीवर शास्त्रीय संशोधनास सुरूवात झाली सर फ्रान्सिस डे या वैद्यकिय क्षेत्रातील शास्त्रज्ञाने भारताच्या किनाऱ्यावर सापडणाऱ्या माशाचा वर्गवार सचित्र कोश तयार केला. आजही हा ग्रंथ याबाबतीत प्रमाणभूत संदर्भग्रंथ मानला जातो.

१८९८ मध्ये सर फ्रेडरिक निकल्सन या निवृत्त सनदी अधिकाऱ्याने मद्रास इलाख्यातील मत्सव्यावसायावर एक विस्तृत टिप्पणी मद्रास सरकारला सादर केल. यातून देशातील पहिल्या मत्सव्यावसाय विभागाची स्थापना १९०६ मध्ये झाली. बडोदा संस्थानात श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांनी सर जेम्स हॉर्नेल या शास्त्रज्ञाला पाचारण केले व त्यांनी केलेल्या पाहाणीच्या परिणाम म्हणून त्या संस्थानातही मत्सव्यावसाय विभागाचा आरंभ झाला.

सर के.जी. गुप्ता यांच्या अहवालानंतर बंगाल प्रांतात १९१० मध्ये मत्सव्यावसाय विभाग स्थापन झाला. त्याच वर्षी श्री. डब्ल्यु. एच. ल्यूकस या सनदी अधिकाऱ्याने सिंध व्यतिरिक्तच्या मुंबई इलाख्यातील सागरी मत्स्यव्यावसायासंबंधी अभ्यास करुन सरकारला अहवाल सादर केला. महाराष्ट्रातील मत्स्यव्यावसायाची सरकार दरबारी घेतलेली ही पहिली दखल म्हणता येईल.''[४३]

संशोधकाला मत्स्यव्यावसाय करणाऱ्या, आदिवासी जमातीत ठाकर, कातकरी, महादेव कोळी या जमातीचे मासेमारीकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टीकोन दिसले. याच परिसरात ३० वर्षापेक्षा जास्त दिवस आदवासीसोबत काम करणारे आनंद कपूर, कुसुम कर्णिक यांनी अभ्याला खूप मौकिक सुचना केल्या. उपजीविकेच्या प्रश्नांवर काम करणारे शाश्वत आणि कार्यकर्ते यांच्या कार्यात सदर संशोधनाची मदत व्हावी म्हणून शोध कार्य केले आहे.

डिंभे जलायश परिसरात मच्छिमार सदस्यांनी मासेमारी करिता सहकारी सोसायटी स्थापन केले आहे. त्या सोसायटीची कार्यपध्दती, धरणाचा मासेमारिरिता ताबा, मत्स्यबीज संचयन, मत्स्यबीज वेगळ्याप्रकारे वाढवून धरणात सोडण्याची प्रक्रिया (केज कल्चर), मासेमारीचा व्यावसाय पध्दती यांचा आढावा सदर प्रकरणात घेतला आहे.

---

४३. डॉ. देशमुख नंदिनी, डॉ. बाळ दत्तात्रय, महाराष्ट्राची सागरी मत्स्य संपत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळे, मुंबई, १९९१, पृ.१

## ४.१७ भारतातील मासेमारी

डिंभे धरण परिसरातील मच्छिमार परिवारांच्या उपजीविकेत मासेमारीचा मोठा वाटा आहे. कारण मासेमारीतून त्वरीत मिळणारे पैसे, त्यांच्या रोजच्या गरजा भागवण्यासाठी उपयोगी पडतात. भारत आणि जगभर मासेमारीवरती अवलंबून असणारे कुटुंबे वाढत आहेत परंतु मासेमारीवर अवलंबून असणारे लोक आणि मर्यादित साठे यामुळे मासेमारीचा दर्जा कमी होत आहे. शाश्वत विकासाच्या दृष्टीने आणि भविष्यातील मासेमारीच्या संधी व क्षमता यादृष्टीने हानिकारक आहे.

''१९९० च्या एका अंदाजानुसार २८.५ दक्षलक्ष लोकांचे जीवन मत्स्य उत्पादने आणि मासेमारीची क्रिया यावर अवलंबून आहे. खुप मोठ्या संख्येने (जवळजवळ २४ दशलक्ष) आशियातील लोक कुटीरउद्योग आणि पारंपारि मासेमारी यांच्या माध्यमातून या व्यावसायात गुंतले होते. १२० दशलक्षपेक्षा जास्त लोक मासे पकडणे, प्रक्रिया करणे आणि विक्री या क्रियांत गुंतले आहेत. यातील ९५% लोक हे विकसनशील राष्ट्रातील आहेत.'' [४४]

''मत्स्यउत्पादनात भारताचा क्रमांक ३ रा आाहे आणि गोड्यापाण्यातील मत्स्य उत्पादनात जगात २ रा आहे.''[४५] यावरुन भारतातील मासेमारीच्या अर्थशास्त्राची कल्पना येते.

देशातील मत्स्यउत्पादनात १९५०-५५ मध्ये असलेले उत्पादन ०.७५ लाख टनावरुन ते २००५-०६ मध्ये ६.५० लाख टनापर्यंत वाढले आहे. मासेमारी इतर संबंधीत व्यावसाय, शोभिवंत मत्स्यपालन हे १४ दशलक्ष लोकांच्या उपजीविकेचा मुख्य स्रोत आहे. शिवाय परदेशी चलन मिळवून देण्यातही मत्स्य निर्यातीचा मोठा सहभाग आहे. २००५-२००६ च्या आकडेवारीनुसार एकूण देशांतर्गत उत्पादनात (G.D.P.) १ टक्का आणि शेतीमधून मिळणाऱ्या एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या ५.३ टक्के उत्पन्न मासेमारीपासून मिळते. भारताला

---

४४. Edward H. Allison , Frank Ells. : The livehoods approach and management of small scale fisheries 2001, marine policy, 25, pg. 377

४५. Annual Report 2006-07, Department of Animal Husbandary Dairying and fisheries ministry of Agricultural Govt. of India, New Delhi, Pg. 50

मासेमारीसाठी ८११८ किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे.

सागरी मत्स्यउत्पादन आणि गोड्या पाण्यातील मत्स्यउत्पादन दोन्ही देशातील लोकांच्या उपजीविका चालवण्यासाठी महत्वाचा सहभाग करतात. १९५० ते २००६ पर्यंतच्या उत्पादनावर लक्ष टाकले तर याचे महत्व लक्षात येते.

## कोष्टक क्र. ४.१३

## मत्स्यउत्पादन (भारत)

(लक्ष टन)

| वर्षे | सागरी मत्स्यपाल (लक्ष-टन) | गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादन(लक्ष-टन) | एकूण (लक्ष-टन) |
|---|---|---|---|
| १९५०-५१ | ०.५ | ०.२ | ०.७ |
| १९६०-६१ | ०.९ | ०.३ | १.२ |
| १९७०-७१ | १.१ | ०.७ | १.८ |
| १९८०-८१ | १.५ | ०.९ | २.४ |
| १९९०-९१ | २.३ | १.५ | ३.८ |
| २००१-०२ | २.८ | २.८ | ५.६ |
| २००२-०३ | ३.० | ३.२ | ६.२ |
| २००३-०४ | ३.० | ३.४ | ६.४ |
| २००४-०५ | ३.५२ | २.७८ | ६.३० |
| २००५-०६ | ३.७६ | २.८१ | ६.७५ |

(संदर्भ -Economic Surver - 2006 - 2007, Govt. of India )

''महाराष्ट्र राज्याला सुमारे ७२० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. राज्यातील नद्यांची लांबी सुमारे ३.२ हजार कि.मी. असून कालव्यांची लांबी १२.८ हजार किलोमीटर आहे. राज्यात १.१२ लाख चौ.किमी क्षेत्र सागरी मच्छिमारीसाठी, ३२० हजार चौ. किमी (३.२० लाख हेक्टर) क्षेत्र गोड्या पाण्यातील मच्छिमारीसाठी आणि १८.६ हजार

हेक्टर क्षेत्र निमखाऱ्या पाण्यातील (१० हजार हेक्टर शासकीय खाजण जमीन व ८.६ हजार हेक्टर खाजगी खाजण जमीन) मच्छिमारीसाठी योग्य आहे. महाराष्ट्र राज्याचे सागरी प्रादेशिक जलक्षेत्र जरी १.३२ लाख चौ.किमी असले तरी त्यातील १८० मी खोलीपर्यंतचा केवळ १.१२ लाख चौ.किमी क्षेत्रफळाचा पट्टा खंडातर उताराचे क्षेत्र (कॉन्टिनेन्टल शेल्फ) आहे. यापैकी केवळ ७२ मीटर म्हणजेच ३० ते ४० वाव (फॅदम) खोलीपर्यंत मच्छिमारी होते. सागरी क्षेत्राची वार्षिक मत्स्योत्पादन क्षमता ६.३ लाख टन इतकी अंदाजे करण्यात आली आहे.'' [४६]

२००१-०२ मधील गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादन अंदाजे १.२३ लाख टन होते ते २०००-२००१ मधील उत्पादनापेक्षा ०.४ टक्क्यानी कमी होते. गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादनात शक्य तितक्या प्रमाणात वाढ करण्यात येत आहे. २००१-०२ मधील चालू किंमतीनूसार राज्यातील सागरी व गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादनाचे एकत्रित स्थूल मुल्य १२६६ कोटी रूपये होते.

**(संदर्भ-महाराष्ट्राची आर्थिक पाहाणी २००२-०३ अर्थ व सांखिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई)**

इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रातील मत्स्य उपभोगाचा वापर कमी आहे. ''महाराष्ट्र ात ग्रामीण भागात ०.११ कि.ग्रॅ. तर शहरी भागात ०.१६ कि.ग्रॅ. उपभोग आहे. केरळमध्ये ग्रामीणभागात १.३५ कि.ग्रॅ. तर शहरी भागात १.६५ कि.ग्रॅ. मत्स्यउपभोग आहे. तोच गोव्यात ग्रामिण भागात १.३६ कि.ग्रॅ. तर शहरी भागात १.९१ कि.ग्रॅ. इतका आहे.''[४७]

---

४६. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी : २००२-०३, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ.६४

४७. Handbook on Fishries statistics, 2000, Dept. of Animal Husbandry Dairying and Fishries ministry of Agricultural Govt. of India, New Delhi, Pg. 129

**मत्स्यउत्पादन (लाख टन)**

| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ |
|---|---|---|---|
| सागरी मत्स्यउत्पादन (लाख टन) | ४.६ | ४.१ | ३.६ |
| गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादन(लाख टन) | १.३ | १.३१.० | |
| **एकूण** | **५.९** | **५.४** | **४.६** |

**<u>कोष्टक क्र. ४.१४</u>**

**मत्स्यउत्पादनाचे मूल्य (करोड रुपये)**

| | **२००६-०७** | **२००७-०८** |
|---|---|---|
| सागरी उत्पादन मुल्य | १४२३ | १५०६ |
| गोड्या पाण्यातील उत्पादन मुल्य | ६२२ | ७५५ |
| **एकूण** | **२०४५ (करोड)** | **२२६१ करोड** |

(संदर्भ -Economic Servery of Maharashtra 2008-09 )

**<u>कोष्टक क्र. ४.१५</u>**

**जिल्हा निहाय सागरी मत्स्य उत्पादन (वार्षिक)**
**महाराष्ट्र राज्य**

(उत्पादन टनात)

आर्थिक वर्ष एप्रिल ते मार्च

| क्र. | जिल्हा | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | ठाणे | ५९६९३ | ५३२१५ | १२३५९१ | १०७७४७ | १००४७९ |
| | | (१४.२) | (१२.७४) | (२७.७५) | (२३.२) | (२४.०) |
| २) | मुंबई | १६५२८२ | १६९८७१ | १६०५९४ | १८१८८८ | १८४६७९ |
| | | (३९.४) | (४०.६५) | (३६.०६) | (३९.२) | (४३.९) |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३) | रायगड | ३८६७९ | ४०२५५ | ४००४४ | ३९५०५ | ३२४८८ |
| | | (९.२) | (९.६३) | (८.९९) | (८.५) | (७.७) |
| ४) | रत्नागिरी | १३७१५० | १३३५९७ | १०५०६९ | १०९०५५ | ८५०९९ |
| | | (३२.६) | (३१.९७) | (२३.५९) | (२३.५) | (२०.३) |
| ५) | सिंधुदुर्ग | १९२७३ | २०९१६ | १६०४५ | २५८९५ | १७०७० |
| | | (४.६) | (५.०१) | (३.६१) | (५.६) | (४.१) |
| | एकूण | ४२००७७ | ४१७८५४ | ४४५३४३ | ४६४०९० | ४१९८१५ |
| | | (१००.००) | (१००.००) | (१००.००) | (१००.००) | (१००.००) |

(टीप - कंसातील आकडे राज्याच्या तुलनेत जिल्ह्याची टक्केवारी दर्शवितात)

संदर्भ - मत्स विभाग महाराष्ट्र शासन मुंबई.

## डिंभे जलाशय मासेमारी

### ४.१८ पार्श्वभूमी

डिंभे जलाशय हे १२८० हेक्टर सरासरी क्षेत्राचे धरण आहे. जलाशयाच्या कडेकडेला १९ अंशत: विस्तापित गावे असून, सर्व गावात ९९% आदिवासी समाजाचे लोक वास्तव्य करत आहेत.

यात प्रामुख्याने महादेव कोळी या जमातीची लोक असून १०० भूमिहीन कातकरी व ११ ठाकर मच्छिमार परिवार आहेत. महादेव कोळी थोडीफार डोंगर उताराची शेती, गाळपेर शेती व मासेमारी करीत आहेत. तर कातकरी व ठाकर फक्त मासेमारी व्यावसायावर अवलंबून आहेत. या भागात शाश्वत संस्थेने (NGO) २००२ पासून या मच्छिमारांत संघटन बनविणे व मच्छिमारी व्यावसायास चालना देण्याच्या दृष्टीने काम सुरू आहे. संशोधक स्वत: त्यांच्या सोबत काम करत आहे.

### ४.१८.१ विभागीय आयुक्त व विभागांचा सहभाग-

मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांनी या भागातील मच्छिमारांकरिता विशेष लक्ष देऊन ''डिंभे जलाशय परिसर दारिद्रय निर्मलून कार्यक्रम'' तयार केला आहे. त्यात आदिवासी विभाग, पंचायत समिती, शाश्वत संस्था, नाबार्ड, केंद्रीय मात्सिकी शिक्षा संस्थान (CIFE)मुंबई व इतर विभागांना जोडून घेऊन सामुदायिक प्रयत्न सुरू केले आहेत.

### ४.१८.२ अर्थपुरवठा-

मच्छिमारी व्यावसायासाठी जाळी, होड्या, मत्स्यबीज इ. डिंभे धरणात स्थानिक आदिवासी थोड्या प्रमाणात मच्छिमार करत होते. धरण सुरूवातीला लोकांच्या ताब्यात नव्हते व पुरेशा प्रमाणात धरणात मासे नव्हते. तसेच मच्छी व्यावसायास लागणाऱ्या होड्या एकाही मच्छिमाराकडे नव्हत्या. व जाळी जवळपास नव्हतीच.

मच्छिमारांना होड्या व जाळीकरिता आदिवासी विकास विभागाची विशेष मदत झाली आहे. तसेच शाश्वत संस्थेमार्फत मदत करण्यात आली.

### ४.१८.३ सोसायटी नोंदणी

डिंभे धरणाच्या कडेला बसलेल्या १९ गावांतील मच्छिमारांची डिंभे जलाशय श्रमिक आदिवासी मच्छिमार सह. सोसायटी दि. २९-५-०६ रोजी नोंदणीकृत झाली.

सोसायटीमध्ये मच्छिमार सदस्य २०० असून त्यात १०० भूमिहिन कातकरी, ११ ठाकर व ८६ महादेव या जमातीचे आहेत. तसेच २ दलित व १ मुस्लिम असे सदस्य आहेत.

### ४.१८.४ धरणाचा मासेमारी करिता ताबा-

सोसायटी नोंदणीकृत झाल्यानंतर सन २००६-२००७ मध्ये सोसायटीला डिंभे धरणाचा ठेका मिळाला. पुर्वी ठेका रक्कम रु. ५४००० होता. परंतु अचानक शासन निर्णय होऊन रक्कम दरवर्षीकरिता १,२१,०००/- एवढा झाला आहे. मुळात भुमिहीन व अंशत: विस्तापित आदिवासीच्या सोसायटीने ठेका रक्कमेकरिता कसेतरी ९०,०००/- जमा केले

होते. परंतु पहिल्या वर्षी १,५६,३६० रुपये मच्छिमार विभागाकडे जमा करणे गरजेचे होते. शाश्वत संस्थेने ५०,००० ची मदत केल्याने ठेका घेणे शक्य झाले. आता धरणाचा ठेका सोसायटीकडे असण्याचे तिसरे वर्ष आहे.

### ४.१८.५ धरणात मत्स्यबीज संचय

डिंभे धरण भरल्यानंतर दोन वेळा पाटबंधारे विभागाने रहिलेले काम करण्याकरिता धरण पुर्ण रिकामे केले होते. त्यामुळे धरणातील स्थानिय मासे व सोडलेले मत्स्यबीज नष्ट झाले. यानंतर ज्या ठेकेदाराकडे धरण होते, त्यांनी मत्स्यबीज पुरेशा प्रमाणात सोडले नाही. त्यामुळे धरणात माशांचे प्रमाण कमी असून धरणाची खोली जास्त असल्याने व धरणाच्या पाण्यामध्ये माशांसाठी इतर पोषक घटकांचा अभाव असल्यामुळे या धरणात माशांची वाढ झपाट्याने होत नाही.

शासन नियमाप्रमाणे दरवर्षी धरणात ९ लाख मत्स्यबीज सोडणे बंधनकारक आहे. त्यास रु. ३,८०,००० ची आवश्यकता असते. पहिल्या वर्षी सोसायटीकडे आर्थिक परिस्थिती बरी नव्हती. त्यामुळे आदिवासी विकास विभागाने याकरिता मदत करावी अशी मागणी केली. आदिवासी विभागाने ३,८०,००० मंजूर केले व त्या योजनेकरिता लोकांची सहभाग रक्कम रु. ४१,०००/- शाश्वत संस्थेने भरले त्यामुळे धरणात ९ लाख मत्स्यबीज सोडणे शक्य झाले.

आदिवासी विकास विभागाने वेळेत मदत केल्याने बीज खरेदी करणे शक्य झाले. परंतु दरवर्षी ९ लाख मत्स्यबीज सोडणे बंधनकारक आहे. व सोडलेले बीज मोठे होण्यास दीड ते दोन वर्षाचा कालावधी लागतो. त्यामुळे सोडलेल्या बीजातून त्याच वर्षी मासेमारी करता येत नाही. शासन नियमाप्रमाणे २ किलोच्या पुढे माशाचे वजन अपेक्षीत आहे व त्यास दीड ते दोन वर्षाचा कालावधी लागतो. त्यामुळे सर्व मच्छिमार सभासदांनी स्वत:वर बंधने घालून घेतली असल्यामुळे लहान जाळी वापरली जात नाही.

### ४.१८.६ मत्स्यबीज वाढविणे व धरणात सोडणे

मत्स्यबीज साधारणत: ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये उपलब्ध होते. लहान (२५-३५ मिमी) आकाराचे मत्स्यबीज सरळ धरणात सोडल्यास ते जीवंत राहाण्याचे प्रमाण खुप कमी होते. म्हणजे जेमतेम १०,२०% व बाकीचे मत्स्यबीज पाण्याच्या लाटांच्या माऱ्याने तसेच गढूळ पाण्यामुळे मरुन जातात. त्यामुळे दरवर्षी मत्स्यबीज सरळ धरणात न सोडता ते फुलवडे (उघडेवाडी) येथील छोट्या तलावामध्ये, केजेसमध्ये व धरणालगतच्या जुन्या खाणीमध्ये सोडून त्यांना भूईमूग पेंड व भाताच्या कोंड्याचे खाद्य देऊन तीन चार महिने सांभाळ करुन मोठ्या आकाराचे मत्स्यबीज धरणात सोडले जातात. त्यामुळे माशांचे जिवंत राहाण्याचे प्रमाण ९०% होते.

### ४.१८.७ केज कल्चरचा वापर करुन मासे मोठे करणे-

डिंभे जलाशयातील मच्छिमारी व्यावसायात उखक्रए(केंद्रीय मत्स्यिकी शिक्षा संस्थान) मुंबई यांचे विशेष सहकार्य लागले आहे. जलाशयाचा शास्त्रीय अभ्यास चालू आहे. नविन केज कल्चर पध्दतीचा वापर करुन त्यात मत्स्यबीज मोठे करुन ते धरणात सोडल्याने व्यावसायाचे खात्रीशीर नियोजन करणे शक्य होत आहे. ''महाराष्ट्रात मच्छि/मासेमारी व्यावसायात केज कल्चरचा वापर हा पहिला प्रयोग डिंभे येथे चालू असून ते पाहाण्याकरिता विविध राज्यातून लोक व शास्त्रज्ञ येत आहेत.

१ केजमध्ये सुमारे ३ हजारपर्यंत लहान मत्स्यबीज सोडून त्यांना भाताचा कोंडा व शेंगदाणे पेंड हे खाद्य देऊन त्यांना मोठे केले जाते. मोठे झाल्यानंतर त्यांना धरणात सोडले जाते. डिंभे धरणात उखक्रए मुंबई यांनी चार जुने व १६ नविन केज उपलब्ध करुन दिले आहेत.

### ४.१८.८ मासेमारी व्यावसाय -

डिंभे धरण सोसायटीच्या ताब्यात सन २००६-२००७ मध्ये आले. पहिल्या वर्षी ९२ दिवस मासेमारी केली. सन २००८ पासून मासेमारी दिवसात वाढ झाली आहे. मासे ११ कलेक्शन केंद्रावर गोळा केले जातात. शाश्वत संस्थेने मच्छि कलेक्शन एक मोटार बोट उपलब्ध करुन दिली आहे. [४८]

---

४८. डिंभे जलाशय, मासेमारी प्रगती अहवाल, २००८, डिंभे जलाशय श्रमिक आदिवासी, मच्छिमार सहकारी सोसायटी मर्या. दिगद, आंबेगाव. पृ.१ते७

## कोष्टक क्र. ४.१६

## २०१०-२०११ या वर्षीचे डिंभे धरण जलाशयात सोडण्याचे मत्स्यबीज साठा स्थिती [४९]

| संचयन दिनांक | मत्स्यबीज घेण्याचे ठिकाण | मत्स्यबीज सोडण्याचे ठिकाण | एकूण मत्स्यबीज |
|---|---|---|---|
| १५-९-२०१० | मुंबई CIFE | फुलवडे केज | ४०,००० |
| १६-९-२०१० | धोम डॅम | उघडेवाडी तलाव | ५०,००० |
| २०-९-२०१० | कन्हेर डॅम(खाजगी) | कुशिरे तलाव | २,००,००० |
| २२-९-२०१० | कराड, सातारा (NFDB प्रोजेक्ट) | बेंठारवाडी तलाव (पेन) | ८०,००० |
| २२-९-२०१० | कराड, सातारा (NFDB प्रोजेक्ट) | दिगद (पेन) | ७०,००० |
| २३-९-२०१० | कराड, सातारा (NFDB प्रोजेक्ट) | सावरली पेन -१ | १,५०,००० |
| २३-९-२०१० | कराड, सातारा (NFDB प्रोजेक्ट) | सावरली पेन-२ | ७०,००० |
| | | **एकूण** | **६,६०,०००** |

## कोष्टक क्र. ४.१७

## डिंभे धरणातील मागील ४ वर्षातील मासेमारीची स्थिती [५०]

| मासेमारी वर्ष | मासेमारीचे दिवस | (कटला)माशाचा प्रकार किलो | (हंबळी) माशाचा प्रकार किलो | एकूण मासे विक्री किलो |
|---|---|---|---|---|
| २००६ ते ०७ | ७२ | ३६७० | १६८६० | २०५३० |
| २००७ ते ०८ | १३५ | १०२४० | २३७२० | ३४०२० |
| २००८ ते ०९ | १७५ | ११५६८ | १६२६० | २७८२८ |
| एप्रिल ०९ ते फेब्रु. २०१० | १३४ | १०१९७ | ४१९१ | १४३८८ |

४९. सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय, मत्स्य उत्पादन केंद्र हडपसर, पुणे

५०. सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय, मत्स्य उत्पादन केंद्र हडपसर, पुणे

* होडी / जाळी सद्यस्थिती

| वर्ष | होडी संख्या | जाळी किलो |
| --- | --- | --- |
| २००३ | ० | ५० |
| २००४-०५ | ६३ | ४६७ |
| २००५-०६ | १०५ | ७०३ |
| २००६-०७ | १३७ | २००० |

'' आदिवासी क्षेत्रात मानव आणि निसर्ग आज हजारो वर्षे एकमेकांच्या सानिध्यात राहात आले आहेत. आदिवासी व्यक्तिमत्वाच्या जडण-घडणीमध्ये निसर्गाचा फार मोठा वाटा आहे. आपल्या पारंपारीक पध्दतीने जीवन जगण्यास निसर्गाने आदिमानवास पाऊलखुणा दाखविल्या. निसर्गाने आदिवासी जीवनाच्या अंगा-अंगावर आपला ठसा उमटवला आहे. आदिवासी दऱ्या-डोंगरातील निसर्गाच्या कुशीत स्वत:ला सुरक्षित मानू लागला. अधुनिक सुधारणांच्या विनाशकारी दुष्परिणामांपासून, त्यामुळेच आदिवासीनां आपली संस्कृती वेगळी ठेवता आली. इथला मानव निसर्गाच्या सगळ्या रुपांना आपलेपणाने स्वीकारता आला. निसर्गानेही त्याला आपल्या सहाय्यकारी रुपाने सतत हात दिला आहे. आदिवासीइतकी निसर्गाची, त्याच्या लहरींची ओळख व जाण इतरांना क्वचितच असेल'' [५१]

मासेमारी करण्याकरिता निसर्गाच्या लहरीचा, पूर पाण्याची खोली, नदी धरण, तळे अशा विविध गोष्टींचा अभ्यास करुन त्यांनी मासेमारीच्या विविध पध्दती विकसीत केल्याचे आढळते.

५१. डॉ. गारे गोविंद, श्री. उत्तमराव सोनवणे, आदिवासी कलाविश्व, आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र शासन, १९८६, पृ.३

## ४.१९ पुर्वीच्या काही मासेमारी करण्याच्या पध्दती

१) पितळ्या घालणे पध्दत

२) पाय झोकणे पध्दत

३) मडके टाकणे पध्दत

४) पाणी उपसणे पध्दत

५) मासे माजवणे पध्दत-(गेळफळ, रामेण, भोगडा, टी.सी.एल.पावडर इ. चा वापर करून मासे पकडणे)

६) हंडी लावणे पध्दत

७) भोकशी लावणे पध्दत

८) गळ टाकणे पध्दत

९) ट्युबवरची मासेमारी

१०) जाळी लावून मासेमारी

११) जाळी फेकून मासेमारी इ. [५२]

### कोष्टक क्र. ४.१९

### पुणे जिल्ह्यातील आंबेगाव आणि पश्चिम उत्तर तालुक्यातील धरणे/बंधारे माहिती

| अ.क्र. | तलावाचे नांव | क्षेत्र (हे) | ठेका रक्कम (प्रतिवर्षी) | बीज संचयन (प्रतिवर्षी) |
|---|---|---|---|---|
| * | आंबेगांव | | | |
| १) | गोहे | २५ | ९,१२५ | १,१०,००० |
| २) | डिंभे | १२८० | १,२१,००० | ९,००,००० |

५२. सदरची माहिती शाश्वत संस्थेचे कार्यकर्ते संजय गवारी यांचेकडून मिळाली.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| * | जुन्नर | | | |
| १) | येणेरे | १३ | ५,००० | ६५,००० |
| २) | रामजेवाडी(भिवाडे) | ३५ | ९,००० | १,३०,००० |
| ३) | ओतूर पाघदरा | १३ | ५,५०० | ६५,००० |
| ४) | आस्मे | २० | ६,००० | १,००,००० |
| ५) | बकाळवाडी | ४० | ९,००० | १,४०,००० |
| ६) | पारुंडे | ४० | ११,००० | १,४०,००० |
| ७) | पेमदरा | २५ | ८,९०० | १,१०,००० |
| ८) | उच्छिल | ३३ | ७,५६० | १,२६,००० |
| ९) | माणिकडोह | १०८८ | ९१,००० | ८,१४,००० |
| १०) | येडगांव | १२२५ | १,६२,००० | ८,८२,००० |
| ११) | पिंपळगाव | २,००० | १,५१,७८६ | १२,७०,००० |
| १२) | वडज | ३५२ | २६,७६० | ४,४६,००० |
| * | खेड | | | |
| १) | वापगाव | ३३ | २२,७०० | १,२६,००० |
| २) | कडूस | ३३ | १४,८५० | १,२६,००० |
| ३) | चासकमान | १८२१ | ६५,६५० | ११,८०,००० |
| ४) | भामा असखेड | ८८४ | ४५,९०० | ७,१२,००० |

(संदर्भ-डिंभे जलाशय श्रमिक आदिवासी मच्छिमार सह. सोसा. कार्यालय-डिंभे)

## कोष्टक क्र. ४.२०

## पुणे जिल्ह्यातील भूजल मत्स्यव्यावसाय स्थिती

## सन २००९-२०१०

| अ.क्र. | तालुका | नदीची लांबी (किमी) | मत्स्य व्यावसाया साठी अनुकूल क्षेत्र (हेक्टर) | मत्स्य व्यावसाया खाली आणलेले क्षेत्र (हेक्टर) | पकडलेल्या माशांची उत्पादकास मिळालेली किंमत(लाखात) | मत्स्य व्यावसाय क्षेत्रासाठी वापरलेले मत्स्यबीज लाखात | मत्स्य व्यावसाय सहकारी संस्था संख्या | सभासद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जुन्नर | १४४ | ४९६६ | २७५० | २३४.०० | २४.०० | १३ | ५३० |
| २ | आंबेगाव | ८० | १५४८ | १४०० | ११२.२० | १२.५० | ३ | २०० |
| ३ | शिरूर | १०१ | ८१५ | ३९५ | १३२.९० | १९.०० | २ | ११७ |
| ४ | खेड | ११५ | २१२२ | १८६७ | १०८.०० | १३.०० | ४ | १३८ |
| ५ | मावळ | ३८ | २३२७ | २३२७ | १४८.५० | ११.०० | ५ | १९० |
| ६ | मुळशी | २६ | ५८९० | ५८९० | ११३.४० | ३०.५० | ४ | ११७ |
| ७ | हावेली | ११२ | १३३१ | १३३१ | ६०.०० | १४.०० | ४ | १४६ |
| ८ | पुणे शहर | २६ | ० | ० | १६.५० | ५.५० | ३ | २७८ |
| ९ | दौंड | १३४ | ४९८ | ३५० | १०७.१० | १५.५० | ३ | १२२ |
| १० | पुरंदर | ५८ | २३७२ | १९८३ | ९५.४० | १४.५० | ७ | २५७ |
| ११ | वेल्हे | २९ | १९६२ | ११७८ | ७८.६० | ११.५० | २ | १३८ |
| १२ | भोर | ८६ | १७४२ | १७४२ | ७८.०० | १२.०० | ४ | २०७ |
| १३ | बारामती | १०८ | १४५३ | ५०० | ७५.०० | १२.५० | ४ | २४८ |
| १४ | इंदापूर | १९५ | ८४० | ७०० | २९०.४० | २४.०० | २६ | ९५५ |
| | **एकूण** | **१२५२** | **२७८५६** | **२२४१३** | **१६५०** | **२२०** | **८४** | **३६४३** |

**(संदर्भ - महाराष्ट्र शासन मत्स्यबीज उत्पादन केंद्र, हडपसर-पुणे)**

## भिमाशंकर परिसरात सापडणारे माशांचे प्रकार

## कोष्टक क्र. ४.२१

| अ.क्र. | स्थानिक नांव | |
|---|---|---|
| १) | वाळ मासा | WAL MASA |
| २) | गेंढा मासा | GINDHA |
| ३) | मुऱ्ही | MURHI |
| ४) | पितोळी | PITOLI |
| ५) | वाळंज | WALANJ |
| ६) | म्हसेल | MHASEL |
| ७) | काँग | KANG |
| ८) | डखडया | DAKHDYA |
| ९) | मळ्या मासा | MALYA MASA |
| १०) | मुऱ्हा मासा | MURHA |
| ११) | चुचनी | CHUCHNI |
| १२) | शिंगट्या | SHINGTYA |
| १३) | खऊल | KHAUL |
| १४) | शिवडा | SHIWDA |
| १५) | कोळंबी | KOLAMBI |
| १६) | लोळी | LOLI |

**अ.क्र. खेकडा प्रकार**

१) गेळंद खेकड

२) तेल्या किरवा

३) नाऱ्या किरवा

४) बेल्ही खेकड

५) चिंभोरी खेकड

६) खुपटा खेकड

७) भोऱ्या किरवा

८) डोंगरी खेकड

९) दुधी खेकड

(संदर्भ – Study of the people - Forest Relationship and local resource management systems in the Bhima Shankar area Final report 2004)

## ४.२० डिंभे जलाशयातील मच्छिमारीची आर्थिक स्थिती

डिंभे जलाशय परिसरातील फुलवडे, वचपे, पांचाळे, कुशिरे खुर्द, कुशिरे बु।।, म्हाळुंगे, पाटण, सावरली, मेघोली, बेंढारवाडी, कळंबई, दिगद, तळपेवाडी, काळवाडी, बोरघर, कोलतावडे, आंबेगाव, फळोदे, पिंपरी या १९ गावामधून २०१ मासेमारी कुटुंबे मासेमारीचा व्यावसाय करतात. मासेमारीचा व्यावसाय आदिवासी सदस्य यांनीच स्थापन केलेल्या ''डिंभे जलाशय श्रमिक आदिवासी मच्छिमार सह. सोसायटी मर्यादित दिगद'' या सहकारी सोसायटीच्या मार्फत चालवला जातो. डिंभे जलाशय १२८० हेक्टर क्षेत्राचे धरण आहे. या जलाशयाच्या कडेकडेने असलेल्या १९ गावामधून ९९% आदिवासी राहतात.

महादेव कोळी, कातरी, ठाकर, दलित, मुस्लिम असे जातीचे सभासद मासेमारी करुन आपल्या उपजिविका चालवतात. महादेव कोळी हे शेती करणारे आहेत ते स्थानिक असल्याने शेती, जंगल उत्पादने यावर उपजीविका चालवतात. परंतु २००० साली धरण पुर्ण भरल्यामुळे आणि आनंद कपूर यांनी मध्यप्रदेशात मेधा पाटकर यांच्या नेतृत्वाखाली उभे राहिलेल्या नर्मदेवरील बर्गी धरणावरील आंदोलनात सल्लागार म्हणून काम केले असल्याने मच्छिमार महासंघाचे काम जवळून पाहिले होते त्याचा फायदा डिंभे धरण मच्छिमारांना झाला. त्यामुळे मासेमारीची नविन संधी लोकांना दिसून आली आणि लोक २००३ पासून ते आतापर्यंत मासेमारी करु लागले. कातकरी, ठाकर हे पारंपारिक मासेमारी करुन, खाण्यापुरते मासे मिळवण्यासाठी नदी काठी भटकत फिरत परंतु धरण झाल्यानंतर एका ठिकाणी स्थायिक झाले आणि मासेमारी करु लागले.

सुरूवातीला धरणाचा ठेका खाजगी व्यापाऱ्याकडे होता. त्यासाठी भांडून संस्थेने तो मिळवला आहे.सुरूवातीला लोक फिरुन पाटी घेऊन मासे विक्री करत. पहिले २ वर्षे लोक मासे मिळत नव्हते म्हणून फार मासेमारी करत नसत. परंतू सध्या दर वर्षी माशाचे बीज टाकावे लागते, संस्थेचे नियम, दंड जाळीचे वाटप, चोरी याविषयी सभा बैठकीतून लोक निर्णय घेतात. मासे भरपूर मिळू लागल्याने लोक अधिक वेळ मासेमारीसाठी देत आहेत. आज प्रत्येक मासेमाराला महिना ५०० ते २५०० रुपये उत्पन्न मिळवून देणारा व्यावसाय म्हणून मासेमारीचा आधार वाटत आहे.

डिंभे जलाशयात हांबळे, कटला, मिरगल, रोहू, पोपट या स्थानिक नावाने ओळखला जाणारी मासे सापडतात. २ किलोपासून ७ किलोपर्यंत वजनाचे मासे धरणात आहेत. मासेमारी करण्याकरिता आवश्यक असणारे साधने म्हणजे जाळी, होडी आणि मुनष्यबळ. डिंभे जलाशयात मासेमारी करण्याच्या साधारण २ पध्दती दिसून येतात. एक म्हणजे होडीवरुन जाळे पाण्यात सोडणे आणि सकाळी ते जाळे गोळा करुन मासे पकडणे. दुसरी पध्दत म्हणजे मोटारीच्या ट्युबवरुन जाळं लावणे आणि मासेमारी करणे.

ट्युबवरची मासेमारी कातकरी लोक करत आहेत. कारण त्यांना सध्या होडी नाहीत आणि ट्युबवर मासेमारीचे पारंपारिक ज्ञान आहे. लोक मासे सोसायटीला विकत देतात. सोसायटीचे लोक रोज मोटार बोटीने धरणाच्या मुखापासून शेपटीपर्यंतच्या गावातील मासे गोळा करून व्यापाऱ्यांना विकतात आणि सदस्यांना १५ दिवसाला, महिन्याला पगार करतात. १ होडि बांधण्याचा खर्च ७००० रुपये येतो. त्यामुळे नविन होडी खरेदी करणे आदिवासीनां शक्य होत नाही. त्यासाठी सरकारी अनुदानावर अवलंबून राहावे लागते आणि गळणाऱ्या होडीतूनच जीवाचा धोका स्विकारुन मासेमारी करावी लागते.

सध्या संस्थेकडून आदिवासींना २२ रुपये किलो माशांचा भाव मिळतो. (२०१०-२०११)

*****

## ४.२१ डिंभे धरण परिसरातील मच्छिमार कुंटुंबाच्या उपजीविकेतील समस्या-

### ४.२१.१ हिरडा व्यावसायातील समस्या

१) आंबेगाव परिसरातील डिंभे धरणाच्या कडेकडेने वसलेल्या एकूण १४ गावापैकी ७ गावांना हिरडा मिळतो. हिरडा हा महत्वाचा व्यवहाय आहे. परंतु सर्वच गावांना त्याचा लाभ होत नाही.

२) हिरड्याचा भाव नेहमी खालीवर होत असतो. व्यापारी त्याचा फायदा घेतात आणि आदिवासींना आर्थिक चणचणी अभावी हिरडा किरकोळ भावाने विकावा लागतो.

३)हिरडा वेचणे हे मोठे धोकादायक काम आहे. झाडावरून चढून हिरडा काठीने झोडून काढावा लागतो. पुन्हा तो वेचावा लागतो. झाडावरून पडण्याचा धोका असतो.

४) हिरडा वाहून नेणे काही गावांना वाहतुकीच्या साधनाअभावी शक्य होत नाही, तेव्हा ३,४ तासांचे अंतर डोक्यावरून हिरडा घेऊन कापावे लागते.

### ४.२१.२ भातशेती समस्या-

१) डिंभे धरण परिसरातील आनेक लोकांकडे स्वत:ची भात शेती साठीची जमीन उपलब्ध नाही. जी आहे ती निकृष्ठ आहे.

२) भातशेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणारी शेती आहे. डिंभे धरण परिसर हा अति पावसाचा परिसर असल्याने कधी पावसाच्या लांबणीने तर कधी पावसाच्या अवेळी तडाख्याने पिकाचे नुकसान होते.

३) भातशेतीची चांगली जमिन धरणात गेल्यामुळे निकृष्ठ जमिनीत कष्टाने भातशेती करावी लागते. परिणामी ८ महिने पुरेल एवढे उत्पन्न मिळत नाही.

४) डिंभे धरण परिसरात १४ गावातील ८० कुटुंबापैकी ५१.२१% लोकांकडेच स्वत:ची भात खाचरं आहेत.

५) नवीन भातखाचरं तयार करण्यासाठी आर्थिक अडचण आहे.

### ४.२१.३ गाळपेर शेती समस्या-

१) डिंभे धरण परिसरात धरणातील पाणी खालील गावांना सिंचनासाठी सोडल्यानंतर डिसेंबर महिन्यात धरणातील जमीनी उघड्या पडतात त्यावर गाळपेर शेती करावी लागते त्यासाठी पाणीपरवाना आणि ११ महिन्याच्या कराराने काही एकर शेती शासनाकडून पैसे भरून मिळते. परंतु कागदपत्र आणि हेलपाटे मारण्यातच बरेच पैसै खर्च होतात.

२) शेतीला पाणी देण्यासाठी डिझेल इंजिन अनुदानाच्या दराने शासन देते परंतु त्याला पुर्व अट अशी की पाणी परवानगी आणि २.५ एकर जमिन नावावर पाहिजे. शासनानेच धरणासाठी आदिवासींच्या जमिनी काढून घेतल्या आणि जिथे ५,६ गुंठे नाहीत तिथे २.५ एकर जमिनी कोठून आणणार?

३) धरणाच्या शेपटीकडे पाणी लवकर कमी होते म्हणून त्यांना गाळपेर शेती करता येते. परंतु धरणाच्या तोंडाजवळ नेहमी पाणी भरपूर असल्यामुळे या गावांना ना भात खाचरं ना गाळपेर अशा स्थितात फक्त मासेमारी आणि मजुरीवर अवलंबून राहावे लागते.

४) गाळपेर जमिनीत उत्पन्न फारसे होत नाही आणि शासनाकडून जमिनी मिळण्यावर (कराराने) काही मर्यादा आहेत.

५) विजेच्या समस्यामुळे आणि डिझेल इंजिन अभावी आनेकांची पिके धरणापासून फक्त ५० फूटावर वाळून जाताना दिसतात.

### ४.२१.४ मासेमारी व्यवसाय समस्या-

१) डिंभे धरण परिसरातील ८० कुंटुंबाचा शेतीबरोबरच चालणारा मुख्य व्यवसाय आहे.

२) मासेमारी हा व्यवसायात खुप कष्टाचा आणि जुगार किंवा शिकारीसारखा आहे. रोजच मासे मिळत नाहीत. जाळे लावूनही आनेक मच्छिमारांना (२७.५%) मासे मिळत नाहीत.

३) मासेमारी करताना आवश्यक आसणारे जाळे कमी असल्याने ५१ कुंटुंबे म्हणजे ६३.७५% कुंटुंबाने सांगितले.

४) २३ कातकरी कुंटुंबाना तर फक्त मासेमारी आणि विटभट्टी यावरच उपजीविका करावी लागते. आणि मासे मिळत नसल्याने प्रसंगी जंगलातील रान भाज्या कडू कंद खावून झोपावे लागते.

५) आनेक मच्छिमारांकडे स्वत:च्या होड्या नाहीत. होड्यांची दुरूस्तीसाठी पैसे नाहीत. १ होडी बांधण्यासाठी ७००० रूपये खर्च येतो. तो परवडणे केवळ अशक्य असते.

६) मच्छिमार विभागाकडून अनुदानाने जाळी मिळते परंतु विशिष्ठ दुकानातुनच ती खरेदी करावी असे बंधन घातल्यामुळे निकृष्ठ दर्जाचे जाळे खरेदी करावे लागते. या ठिकाणी भ्रष्टाचाराची मोठी संधी दिसून येते.

७) मासेमारीचे प्रशिक्षण केवळ ११.२५% लोकांनाच मिळाले आहे. ही एक समस्या आहे.

८) धरणात मत्स्यबीज साठा प्रत्येक वर्षी करावा लागतो. ते मत्स्यबीज सरकारी आणि खाजगी संस्थेकडून खरेदी करावे लागते. तो खर्च लोकांना आणि संस्थेला परवडत नाही.

९) मत्स्यबीज आणताना प्रवासात मरण्याचे प्रमाण अधिक आहे.

१०) होडी पलटी होण्याचा धोका एकूण ६० म्हणजे ७५% कुंटुंबानी व्यक्त केला आहे. आणि कोणाकडेही जीवरक्षक जॅकेट नाहीत

## प्रस्तावना :

सदर संशोधनामध्ये प्राथमिक आणि द्वितीय संकलनानुसार गोळा केलेली माहितीचे तक्त्यानुसार वर्गीकरण करुन सामाजिक संशोधनाच्या नियमानुसार घेतलेल्या ८० कुटुंबाच्या प्रश्नावलीचे सुत्रबद्धरीत्या विश्लेषण केले आहे.

उपजीविकेच्या विश्लेषणात डिंभे धरण परिसरातील मच्छिमार कुटुंबाचे मासेमारीचे उत्पन्न, कालावधी आणि जाळ्याची सद्यस्थिती कशी आहे. याचे तक्त्यांच्या माध्यमाने विश्लेषण केले आहे. एकूण १४ गावाचे मासेमारी करणारी कुटुंबे सरासरी महिना उत्पन्न मासेमारीचा काळ याचे विश्लेषण केले आहे. भात शेती करणारी कुटुंबे, गाळपेर शेती करणारे कुटुंबे, हिरडा वेचणारी कुटूंबे यांचे विश्लेषण तक्ते आकृत्या यांचा वापर करुन केले आहे.

इयान स्कून (Ian scoones) यांनी उपजिविका स्त्रोतांचे विश्लेषण करण्यासाठी वापरलेल्या पंच भांडवल (Five capital) या संकल्पनेचा वापर करुन डिंभे धरण परिसरातील १४ गावांची पंच भांडवल स्थिती कशी आहे, कोणत्या भांडवलात वाढ करणे गरजेचे आहे. सामाजिक, आर्थिक, मानवी, नैसर्गिक, भौतिक स्थिती कशी आहे विकासात कशा कशाचा अडसर ठरत आहे आणि कुठल्या गोष्टी ताकद आहेत याचे चित्र या विश्लेषण चौकटीमुळे स्पष्ट होते.

मासेमारीचे सामर्थ्य किती आहे? सध्या काय अडचणी आहेत? यासाठी प्रश्नावलीमध्ये अधिक प्रश्न विचारुन माहिती गोळा करुन, निरीक्षण करुन चर्चा करुन विश्लेषण केले आहेत. मासेमारीच्या अडचणी, प्रशिक्षणाची स्थिती, मासेमारीच्या पद्धती, मासेमारीतले धोके यांचा विश्लेषणात समावेश केला आहे.

****

# आकृती ५.१

## उपजिविका चालवताना धरणपरिसरातील आदिवासींना विविध घटकापासून मिळणारी मदत

### पर्यावरण

१) स्वच्छ हवामान

२) निरोगी वातावरण

३) कमीत कमी गरजात समाधानी ठेवणारा निसर्ग

### जंगल

**वन उत्पादने**

१) वनऔषधे

२) भाज्या

३) कंदमुळे

४) फळे

५) मध

६) इंधन

७) चारा

**नदी धरण**

१) मासेमारी

२) पाणी (शेती)

३) जलवाहतूक

४)(गाळ) विटभट्टीसाठी

### समाज

१) मित्र नातेवाईकाकडून कर्ज

२) शोषणाविरुध्द लढण्यासाठी संघटन

३) संकटात टिकून राहण्या नैतिक आधार

### शासन

१) स्वस्त धान्य योजना

२) खावरी कर्ज

३) रोजगार हमी योजना

४) आदिवासी विकास महामंडळाच्या विविध योजना

### शेती

१) शेती (भात)

२) पडकई शेती

३) गाळपेर शेती

## कोष्टक क्र. ५.१

### डिंभे धरण परिसरातील मच्छिमार कुटुंबाचे मासेमारिचं उत्पन्न कालावधी आणि जाळं यांची स्थिती

| गावाचे नांव | सर्वे केलेले कुटुंबे (संख्या) | मासेमारी करत असलेले कुटुंब (संख्या) | माशांचे सरासरी उत्पन्न (महिना प्रति) किलो | मासेमारीचा सरासरी काळ (महिने) | मासेमारांजवळ असलेले जाळं (सरासरी किलो) |
|---|---|---|---|---|---|
| फुलवडे | १२ | १२ | ४६.२५ | ५.५८ | ७.४१ किलो |
| तळपेवाडी | २ | २ | ३७.५ | ४.५ | १० किलो |
| पाटण | १ | १ | २० | ३ | ५ किलो |
| म्हाळुंगे | ५ | ३ | ३० | २.६६ | ५ किलो |
| दिगद | ७ | ६ | २३.३३ | २.५ | २.८३ किलो |
| पांचाळे बु।। | ३ | ३ | ४० | ६ | ३.५ किलो |
| पांचाळे खु।। | ३ | ३ | ४.६६ | ३ | २.६६ किलो |
| मेघोली | ६ | ७ | १८.१६ | ४.८३ | ३.८ किलो |
| सावरली | ८ | ८ | १४.८ | ४.१४ | ३.५७ किलो |
| आंबेगाव | ८ | ८ | ४२.१२ | ६ | ५.४२ किलो |
| कुशिरे खु।। | ३ | ३ | २८.३५ | ८ | ६ किलो |
| कुशिरे बु।। | ८ | ८ | ४२.८५ | ४.३७ | ११.४ किलो |
| बोरघर | ८ | ८ | ४० | ६.३७ | १० किलो |
| वचपे | ६ | ६ | २४ | ४.१२ | ८.४ किलो |
| **एकूण** | **८०** | **७७** | | | |

**(संदर्भ - प्राथमिक सर्वेक्षण)**

डिंभे धरण परिसरातील मच्छिमार कुटुंबांचे मासेमारीचं उत्पन्न जाळी, कालावधी, डिंभे धरण परिसरातील १४ गावची मासेमारीची स्थिती पाहिली असता, फुलवडे, आंबेगाव, बोरघर ही गावे धरणाच्या तोंडाजवळ असल्याने त्यांना मासेमारीचा कालावधी अधिक मिळतो. ज्या गावातील मासेमारांजवळ जाळे अधिक आहे त्या गावातील मासेमारांना अधिक मासे मिळतात असे कोष्टकावरुन दिसते. मासेमारीचा सरासरी कालावधी एकूण १४ गावांना ३ महिन्यापासून ८ महिन्यापर्यंत असल्याचे दिसते. एकूण ८० कुटुंबापैकी ७७ मासेमार म्हणजे ९६.२५% कुटुंब मासेमारी करतात म्हणजे मासेमारी ही एक प्रमुख उपजीविका साधन असल्याचे दिसून येते.

**भातशेती** – एकूण १४ गावांच्या भात शेतीची परिस्थिती कशी आहे ? हे कोष्टक क्र. ५.३ वरुन दिसून येते. ८० कुटुंबांपैकी ४१ म्हणजे ५१.२५% कुटुंबाकडे भातखाचरं नाहीत. १ पोते पासून ६ पोते इतके उत्पन्न वर्षाला भाताचे होते असे दिसते म्हणजे भातखाचरांतून होणारा भात कुटुंबाला वर्षभर पुरवणारा नाही हे स्पष्ट दिसते.

इयान स्कुन (Ian Scoones) यांनी उपजीविका स्त्रोतांचे विश्लेषण करण्यासाठी वापरलेल्या पंचभांडवल (Five Capital) यावर आधारीत


**कोष्टक क्र. ५.२**

## ✻ डिंभे धरण परिसरातील पंच भाडंवलाची स्थिती (८० कुटुंबांच्या माहितीवर आधारित)

| क्र. | वित्तीय /आर्थिक भांडवल | (कुटूंबाची %) | क्र. | सामाजिक भांडवल | (कुंटुंबे%) |
|---|---|---|---|---|---|
| १) | बँक खाते | ५६.२५% | १) | बचत गट | ७१.२५% |
| २) | बचत करण्याची सवय | ७१.२५% | २) | शेतकऱ्यांच्या संघटना | ०% |
| ३) | रेशनकार्डाची उपलब्धता | ९०% | ३) | कामगारांच्या संघटना | ०% |
| ४) | मालकीची जमीन | ५१.२५% | ४) | संस्था/संघटनाचे मार्गदर्शन | ७१.२५% |
| ५) | जनावरं | ७२.५% | ५) | स्थानिक मंडळे, संघटना (जमातीच्या) | २८.७५% |
| ६) | गाळपेर शेती | ५७.५% | ६) | जमातीचे सण उत्सव यात्रा | ७१.२५% |
| | **सरासरी** | **६६.३०%** | | **सरासरी** | **४०.४१%** |

| क्र. | भौतिक भांडवल | (कुटूंबाची %) | क्र. | मानवी भांडवल | (कुंटुंबे%) |
|---|---|---|---|---|---|
| १) | रस्ता आणि वाहतूक व्यावस्था | ७२.५% | १) | मानवाचे निसर्गाचे संबंध | ७३.७५% |
| २) | पाणीपुरवठा व्यवस्था | २०% | २) | सरकारी कामाची, योजनाची माहिती | ३७.५% |
| ३) | घरे (पक्की) | ५७.५% | ३) | चांगले आरोग्य | ९६.२५% |
| ४) | शौचालय स्थिती | ५०% | ४) | शिक्षण (साक्षरता) | ५८.७५% |
| ५) | वीज | ६०% | ५) | प्रशिक्षण (मासेमारीचे) | ११.२५% |
| ६) | स्वत:ची होडी | ८०% | ६) | कौशल्य (विटभट्टी) | १०% |
| | **भौतिक भांडवलाची सरासरी** | **५६.५५%** | | **मानवी भांडवलाची सरासरी** | **४७.९१%** |

| **क्र.** | **नैसर्गिक भांडवल** | **(कुंटुंबे%)** |
| --- | --- | --- |
| १) | पाणीसाठा (धरणाची उपलब्धता) | १००% |
| २) | मालकीची जमीन | ५१.२५% |
| ३) | हिरडा उपलब्धता | ३७.५% |
| ४) | इतर जंगल संपत्ती | ४८.७५% |
| ५) | इंधन लाकूड | ९८.७५% |
| | **नैसर्गिक भांडवाची सरासरी** | **६७.१६%** |




**<u>आकृती क्र. ५.२</u>**

**पंच भांडवल आधारीत शाश्वत जीविका विश्लेषण**

वरील आकृतीवरुन डिंभेधरण परिसरातील शाश्वत उपजीविकेतील अडचणी, सदस्थिती आणि विकासाची संधी कितपत आहे याची कल्पना येते.

प्रामुख्याने सामाजिक भांडवल आणि मानवी भांडवल यांची स्थिती साधारण दिसुन येते, स्थानिक पातळीवर शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या संघटना नसल्यामुळे त्यांची सौदाशक्ती, शेतमालाचे भाव या गोष्टीवर नियंत्रण नसल्याचे दिसते. हिरड्याचे कमीजास्त भाव होणे, पुरेसा रोजगार न मिळणे हे स्थानिक पातळीवर दिसून येते. मानवी भांडवलात सरकारी योजनाची माहिती फक्त ३७.५% कुटुंबाना होती. तसेच मासेमारीचे प्रशिक्षण ११.२५% कुटुंबाना मिळाल्याचे दिसते. धरणातील मासेमारी कुटूंबानां प्रशिक्षण मिळाले तर त्यांच्या अधिक क्षमता वापरता येतील.

## कोष्टक क्र. ५.३

## भात शेती करणारे मच्छिमार कुटुंबे

(एक पोते-अंदाजे १०० ते ११० किलो)

| गावाचे नांव | सर्वे केलेले कुटुंबे | भात खाचरं असलेली कुटुंबे | वार्षिक उत्पन्न (सरासरी) (पोते) (प्रति कुटुंब) |
|---|---|---|---|
| फुलवडे | १२ | ४ | ३.२५ (पोते) |
| तळपेवाडी | २ | १ | २ (पोते) |
| पाटण | १ | १ | ५ (पोते) |
| म्हाळुंगे | ५ | २ | ५ (पोते) |
| दिगद | ७ | ५ | १.५ (पोते) |
| पांचाळे बु ।। | ३ | २ | २.५ (पोते) |
| पांचाळे खु ।। | ३ | ३ | २ (पोते) |
| मेघोली | ६ | ६ | २.२८ (पोते) |
| सावरली | ८ | ७ | ३ (पोते) |
| आंबेगाव | ८ | ० | ० (पोते) |
| कुशिरे खु ।। | ३ | ३ | ६ (पोते) |
| कुशिरे बु ।। | ३ | ३ | ६० (किलो) |
| बोरघर | ८ | ६ | ३.६६ (पोते) |
| वचपे | ६ | १ | १ (पोते) |
| **एकूण** | **८०** | **४१** | |

## कोष्टक क्र. ५.४

## गाळपेर शेती करणारे मच्छिमार कुटुंबे

(एक पोते-अंदाजे १०० ते ११० किलो)

| गावाचे नांव | सर्वे केलेले कुटुंबे | गाळपेर करत असलेली कुटुंबे | वार्षिक उत्पन्न (सरासरी) (प्रति कुटुंब) |
|---|---|---|---|
| फुलवडे | १२ | ६ | ६ (पोते) |
| तळपेवाडी | २ | २ | १० (पोते) |
| पाटण | १ | ० | ० (पोते) |
| म्हाळुंगे | ५ | २ | ३ (पोते) |
| दिगद | ७ | ७ | २.१४ (पोते) |

| | | | |
|---|---|---|---|
| पांचाळे बु ।। | ३ | ३ | २.३३ (पोते) |
| पांचाळे खु ।। | ३ | ३ | १.३३ (पोते) |
| मेघोली | ६ | १ | ३ (पोते) |
| सावरली | ८ | ८ | ६.८७ (पोते) |
| आंबेगाव | ८ | ० | ० (पोते) |
| कुशिरे खु ।। | ३ | ३ | ३.३३ (पोते) |
| कुशिरे बु ।। | ८ | ७ | ३ (पोते) |
| बोरघर | ८ | ० | ० (पोते) |
| वचने | ६ | २ | ३ (पोते) |
| **एकूण** | **८०** | **४४** | |


<u>**कोष्टक क्र. ५.५**</u>


**हिरडा वेचणारी मच्छिमार कुटुंबे**


| **गावाचे नांव** | **सर्वे केलेले कुटुंबे** | **हिरडा वेचणारी कुटुंबे** | **वार्षिक उत्पन्न (सरासरी) किलो (प्रति कुटुंब)** |
|---|---|---|---|
| फुलवडे | १२ | ० | ० |
| तळपेवाडी | २ | ० | ० |
| पाटण | १ | १ | २ किलो (कमाल २०० किलो) |
| म्हाळुंगे | ५ | ० | |
| दिगद | ७ | ३ | ४१.६६ किलो (किमान २५, कमाल ५० किलो) |
| पांचाळे बु ।। | ३ | १ | २०० किलो(किमान २०० किलो) |
| पांचाळे खु ।। | ३ | ३ | ६८.३३ किलो (किमान २५, कमाल १०० किलो) |
| मेघोली | ६ | ५ | ४५ किलो (किमान २०, कमाल १०० किलो) |
| सावरली | ८ | ६ | २१२.५ किलो (किमान ७५, कमाल ५०० किलो) |
| आंबेगाव | ८ | ० | ० |
| कुशिरे खु ।। | ३ | ३ | १०६.६६ किलो (किमान ४० ते २०० किलो) |
| कुशिरे बु ।। | ८ | ८ | ७३.७५ किलो (किमान ४० ते १५० किलो) |
| बोरघर | ८ | ० | ० |
| वचपे | ६ | ० | ० |
| **एकूण** | **८०** | **३०** | |


**गाळपेर** – डिंभे धरण परिसरातील १४ गावांमध्ये धरणातील जमिनीत 'गाळपेर' शेती करण्याचे प्रमाण बरेच आहे. आंबेगाव, बोरघर या गावांना गाळपेर करता येत नाही. कारण त्या भागातील धरणाचे पाणी कमी होत नाही कारण ही गावे मुखाजवळील आहेत. कोष्टक क्र. ५.४ वरुन गाळपेर जमिनीतून १ पोते धान्यापासून ६,७ पोते धान्य उत्पादन मिळते हे दिसते यावरुन गाळपेर जमीन उत्पन्नाचा महत्त्वाचा आधार दिसतो एकूण ५५% लोक गाळपेर करतात हे दिसते.

कोष्टक क्र. ५.५ वरुन हिरडा वेचणारी कुटुंबाची स्थिती स्पष्ट होते. डिंभे परिसरातील एकूण १४ गावामधून ८० कुटूंबापैकी ३० कुटुंबे हिरडा वेचताना फुलवडे, तळपेवाडी, बोरघर, वचणे, आंबेगाव, म्हाळुंगे या सहा गावांना हिरडा होत नाही. कुशिरे, सावरली, मेघोली या गावांना अधिक हिरडा होतो. २५ किलो ते ५०० किलो हिरडा प्रति कुटुंब वेचला जातो.


A
प्रमाण = १ सेमी = १० कुटुंबे
मासेमारीतील अडचणी
मासेमार कुटुंबे
९०
८०
७०
६०
५०
४०
३०
२०
१०
जाळ कमी (५१)
स्वत:ची होडी नाही (१६)
होडी दुरूस्ती (१०)
मासे मिळत नाहीत (२२)


B
प्रमाण = १ सेमी = १० कुटुंबे
मासेमारीचे प्रशिक्षण
मासेमार कुटुंबे
९०
८०
७०
६०
५०
४०
३०
२०
१०
प्रशिक्षीत मासेमार (९)
अप्रशिक्षीत मासेमार (४८)
पारंपारीक मासेमार (२३)


C
प्रमाण = १ सेमी = १० कुटुंबे
मासेमार कुटुंब
९०
८०
७०
६०
५०
४०
३०
२०
१०
ट्युबवरुन मासेमारी (११)
होडीवरुन जाळे टाकून (६९)
(मासेमारीची पध्दती)


D
प्रमाण = १ सेमी = १० कुटुंबे
मासेमार कुटुंब
९०
८०
७०
६०
५०
४०
३०
२०
१०
थंडीचा त्रास (१३)
होडी फुटणे (३)
होडी पलटी होणे (६०)
शाररिक कष्ट (२)
धोका नाही (२)
मासेमारीतले धोके (कंसात कुटुंबे)
संदर्भ – प्राथमिक सर्वेक्षण

आकृती क्र. (A) वरुन मासेमारीतल्या प्रमुख चार अडचणी दिसून येतात. जाळ कमी असण्याची अडचण ६३.७५% कुटुंबानी व्यक्त केली आहे. स्वत:ची होडी, नसल्याची अडचण २०% कुटुंबाना आहे. होडी दुरूस्तीची समस्या १२.५% कुटूंबांना जाणवते आणि मासे मिळत नसल्याचे २७.५% लोकांनी सांगीतले आहे. शिवाय आर्थिक अडचण, थंडीचा त्रास इ. अडचणी आहेतच.

---

आकृती क्र. (B) मध्ये मासेमारीचे प्रशिक्षण किती लोकांना मिळाले याचा विचार केला आहे. प्रश्नावली भरताना साधारणत: ९ लोकांनी म्हणजे ११.२५ लोकांनी मासेमारीचे प्रशिक्षण मिळाले असल्याचे नमुद केले. अप्रशिक्षीत मासेमार कुटुंबे ६०% आहेत. ज्यांनी साधरणत: गेल्या ६ ते ७ वर्षापासून मासेमारी सुरू केली आहे.

या ८० कुटुंबात एकूण २३ कातकरी कुटुंबे म्हणजे २८.७५% कुटुंबे मासेमारीचा व्यावसाय पारंपारीक करत आहेत. परंतु अधिक प्रशिक्षणाची आवश्यकता त्यांनाही जाणवते.

---


आकृती क्र. (C) मध्ये मासेमारीच्या पध्दतीचे विश्लेषण दिसून येते. फक्त ट्युबवरून मासेमारी करणारे ११ कुटुंबे आहेत. त्यांची टक्केवारी १३.७५% इतकी आहे. होडीवरुन जाळ लावून मासेमारी करणारे कुटुंबे ८६.२५% आहेत. मासेमारी कुटुंबानी याव्यतिरीक्त अनेक पध्दतीची माहिती दिले परंतु त्या डिंभे धरणात वापरत नाहीत.

---

आकृती क्र. (D) मध्ये मासेमारीच्या धोक्यांचे चित्र स्पष्ट होते.

थंडीच्या दिवसात मासेमारी करणे फार कष्टाचे असते. त्याचा त्रास १६.२५% कुटुंबानी सांगीतला. खराब होडी पाण्यात फुटण्याचा धोका ३.७५% कुटुंबाना वाटतो. तर वारा, वादळे, लाटा यामुळे होडी पलटी होऊन जीवाचा धोका सर्वाधिक ७५% कुटुंबानी व्यक्त केला. शारीरिक कष्ट २.५% तर धोका नाही २.५% कुटुंबानी सांगीतला.

आंबेगाव तालुक्यात डिंभे धरणपरिसरातील १४ गावामधून हिरडा या वनउपजाची माहिती घेतली असता खालील आकडेवारी उपलब्ध झाली. ८० कुटूंबाच्या सर्वेक्षणातून मोठा हिरडा, बाळ हिरडा कीती वेचला जातो? कधी वेचला जातो? या प्रश्नांची उत्तरे दिली त्यापैकी ३० कुंटूंबे हिरडा वेचतात असे समजले.




धरण परिसरातील)


(गाव / वाड्या)

(कंसातील आकडे सर्वेक्षण केलेल्या कुटुंबापैकी हिरडा वेचणारी कुटुंबे दर्शवितात)

**डिंभे धरणातील**

**२००७-२००८ मधील मासेउत्पादन**

| | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोंबर | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हंबळी | ३२०३ | ४१५५ | ४२५७ | ५१११ | ३८९१ | ४८८ | ३३६९ | १२२४ |
| कटला | ७२१ | १११२ | १२२२ | १३० | १२१२ | ४७१ | - | ८२५ |




(महिने-हांबळी, कटला उत्पादन)

हंबळी (स्थानिक मासा)

कटला (स्थानिक मासा)

(मत्स्य सोसायटी कार्यालयातील आकडेवार अधारीत)

डिंभे धरणातील मासेमारीचे विश्लेषण करताना मागील ३ ते ४ वर्षाची आकडेवारी पाहिली असता धरणात सापडणाऱ्या दोन प्रमुख जातीच्या माशांचे उत्पादन महिन्याला किती मिळतो हे लक्षात येते. हंबळी आणि कटला या स्थानिक नावाने प्रसिध्द असलेल्या जातीचे उत्पन्न


**<u>डिंभे धरणातील २००६ ते २००७ मधील मत्स्य उत्पादन</u>**

✻ डिसेंबर हंबळी – २६५ किलो
कटला – २ किलो

✻ जानेवारी हंबळी – ९८१० किलो
कटला – ३७ किलो

✻ फेब्रुवारी हंबळी – ३६१० किलो
कटला – १४२४ किलो

✻ मार्च हंबळी – ७८८ किलो
कटला – १८७३ किलो




(डिंभे मत्स्य सोसायटी कार्यालयातील आकडेवार अधारीत)

## कोष्टक क्र. ५.६

### ✻ डिंभे धरण परिसरातील वनउपजांचे महिन्यानुसार वितरण✻

| अ.क्र. | | | हिवाळा | उन्हाळा | | | | पावसाळा | | | | हिवाळा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जाने. | फेब्रु. | मार्च | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑग. | सप्टें. | ऑक्टो | नोव्हें. | डिसे. |
| १) | फळे | १) आंबा | | | | | | | | | | | | |
| | | २) करवंदे | | | | | | | | | | | | |
| | | ३) आवळा | | | | | | | | | | | | |
| २) | औषधी | १) मोठा हिरडा | | | | | | | | | | | | |
| | वनस्पती | २) बाळ हिरडा | | | | | | | | | | | | |
| ३) | मध | मध | | | | | | | | | | | | |
| ४) | कंद | १) हाळंदा | | | | | | | | | | | | |
| | | २) खरपुडी | | | | | | | | | | | | |
| ५) | रानभाज्या | १) चावा | | | | | | | | | | | | |
| | | २) करडू | | | | | | | | | | | | |
| | | ३) चिचुर्डी | | | | | | | | | | | | |
| | | ४) भारंगी | | | | | | | | | | | | |
| | | ५) करटूली | | | | | | | | | | | | |
| | | ६) चित्रक | | | | | | | | | | | | |
| ६) | | खेकडे | | | | | | | | | | | | |

(गडद रंग वनउपजाच्या अधिक उत्पादनाचा काळ दर्शवतो)

(संदर्भ – स्थानिक लोक सहभागातून घेतलेल्या माहितीच्या आधारे)

## कोष्टक क्र. ५.७

### ❋ कातकरी कुटुंबाची उपजीविका साधने ❋

(२३ कातकरी कुटुंबाच्या सर्वेक्षणावर अधारीत)

| कुटुंब क्र. | मासेमारी | विटभट्टी | गाळपेर शेती | पडकई | भातशेती | हिरडा | रेशनकार्ड |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ✓ | ✓ | × | × | × | × | × |
| २ | ✓ | × | × | × | × | × | ✓ |
| ३ | ✓ | × | × | × | × | × | ✓ |
| ४ | ✓ | × | × | × | × | × | ✓ |
| ५ | ✓ | × | × | × | × | × | ✓ |
| ६ | ✓ | × | × | × | × | × | ✓ |
| ७ | ✓ | ✓ | × | × | × | × | ✓ |
| ८ | ✓ | ✓ | × | × | × | × | ✓ |
| ९ | ✓ | × | × | × | × | × | ✓ |
| १० | ✓ | ✓ | × | × | × | × | ✓ |
| ११ | ✓ | × | × | × | × | × | ✓ |
| १२ | ✓ | ✓ | × | × | × | × | × |
| १३ | ✓ | ✓ | × | × | × | × | × |
| १४ | ✓ | ✓ | × | × | × | × | ✓ |
| १५ | ✓ | ✓ | × | × | × | × | ✓ |
| १६ | ✓ | ✓ | × | × | × | × | ✓ |
| १७ | ✓ | ✓ | × | × | × | × | ✓ |
| १८ | ✓ | ✓ | × | × | × | × | ✓ |
| १९ | ✓ | ✓ | × | × | × | × | ✓ |
| २० | ✓ | ✓ | × | × | × | × | ✓ |
| २१ | ✓ | × | × | × | × | × | ✓ |
| २२ | ✓ | × | × | × | × | × | ✓ |
| २३ | ✓ | × | × | × | × | × | ✓ |
| **एकूण** | २३ | १३ | ० | ० | ० | ० | २० |

# कातकरी

कोष्टक क्र. ५.७ वरुन कातकरी कुटुंबाच्या उपजीविकेची स्थिती कळते. एकूण २३ कुटुंबापैकी मासेमारी संपूर्ण २३ कुटुंबे करतात तो त्यांचा पारंपारिक व्यवसाय आहे. परंतु फारसे मासे मिळत नाहीत, जाळ कमी, होडीचा अभाव यामुळे बरेच कुटुंबे वीटभट्टीवर काम करतात. त्यांची टक्केवारी ८० कुटुंबापैकी १३ कुटुंबे म्हणजे १६.२५% आहे. गाळपेर शेती, भातशेती, पडकई, हिरडा या प्रमुख उपजीविका साधनांचा कातकरी कुटुंबाला संपूर्ण अभाव आहे. २० कुटुंबाकडे रेशनकार्ड आहेत. त्यावर ३ महिन्यातून ५० किलो गहू ५० किलो तांदूळ ही धान्य मिळते. हा एक महत्त्वाचा आधार असल्याचे कातकरी सांगतात. त्यामुळे मासेमारी, वीटभट्टी, रेशनकार्डावरील धान्य यावर उपजीविका चालत नसल्यामुळे छोटीमोठी शिकार करुन, रानभाज्या, खेकडे अशा अन्नावर अवलंबून रहावे लागते.

कोष्टक क्र. ५.६ वरुन डिंभे धरण परिसरातील वनउपजांचे महिन्यानुसार वितरण दिसून येते. कुठल्या महिन्यात कुठली फळे, भाज्या, हिरडा होतो हे या भागातील लोकांच्या उपजीविकेसाठी महत्त्वाचे असते. पावसाळ्यात अनेक भाज्या येतात. या काळात लोकांना या रानभाज्या अन्न म्हणून खूप उपयोगी पडतात. ऑगस्ट, डिसेंबर मध्ये मोठा हिरडा होतो, तर एप्रिल, मे मध्ये बाळ हिरड्याचे उत्पन्न होते. एप्रिल, मे मध्ये आंबा, करवंद, आवळा या भागात अधिक असतो.

**प्रस्तावना :**

डिंभे धरण परिसरातील मच्छिमार परिवारातील ९९% लोक आदिवासी जमातीचे आहेत. आदिवासींना मूळातच त्यांच्या सांस्कृतिक जीवनमान, डोंगरकपारीतील राहणे, अशिक्षितपणा आणि आर्थिक कमकूवतपणा यामुळे मुख्य समाजापासून दूर लोटल्याचे चित्र सर्वत्र दिसून येते. आजही अनेक अडचणींना सामाना करत आदिवासी जीवन जगत आहेत.

सदर संशोधनात डिंभे धरण परिसरातील एकूण १४ गावांतील ८० कुटुंबाचा अभ्यास केला आहे. डिंभे धरण परिसरातील लोकांना उपजीविकेची साधने अपुरी आहेत. शासकीय नियम, आर्थिकस्थिती, सामाजिक परंपरा यामुळे विकासात अडचणी येतात, तसेच प्रशिक्षणाचा अभाव आहे. संशोधनातील गृहितकांच्या आधारे त्यांच्या आर्थिक सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे, सद्यस्थितीचा उपजीविकेचा अभ्यास करणे, मासेमारीचे एकूण सामर्थ्य किती आहे? अडचणी कोणत्या आहेत? या उद्देशानुसार  प्रश्नावली तयार करुन प्रश्नावली आणि अनुसूचीच्या आधारे ८० कुटुंबाचा अभ्यास केलेला.

वरील संशोधन अभ्यासाच्या विषयानुसार उद्देश व गृहितकानुसार माहिती संकलित करुन त्याचे सुत्रबद्धरित्या विश्लेषण केले आहे आणि त्यावरुन निष्कर्ष काढलेले आहेत.

निष्कर्षातून स्थानिक ठिकाणी बेरोजगारीची समस्या आहे, कामानिमित्त स्थलांतर आहे. ठाकर, कातकरी, महादेव कोळी या तीन आदिवासी जमातीची वेगवेगळी उपजीविका निती दिसून येते आहे. शिक्षणाच्या परिस्थितीचा प्रश्न गंभीर दिसून येतो आहे. अशा स्थितीत अनेक लोकांना जंगलातील विविध वनउत्पन्नामुळे जीवनमान टिकवण्यास मोठा हातभार लागत असल्याचे चित्र स्पष्ट होते आहे.

सदरच्या माहिती आकडेवारी यावरुन डिंभे धरण परिसरातील आदिवासी मच्छिमारांची उपजीविका कशी चालते ? याचे पुरेसे स्पष्ट चित्र दिसल्यास नक्कीच मदत होणार आहे. त्यापैकी महत्त्वाचे निष्कर्ष पुढील भागात दिलेले आहेत.

## ६.१ निष्कर्ष :

१. डिंभे धरण परिसरातील आदिवासी मच्छिमार कुटुंबाचे व्यवसाय प्रामुख्याने प्राथमिक क्षेत्रातील व्यवसाय आहेत. हिरडा वेचणे, जंगलातील वनभाज्यांवर उपजीविकेसाठी अवलंबून रहाणे, इंधनासाठी जंगलातील लाकडे गोळा करणे, मासेमारी, डोंगरउतावरची शेती ह्या सर्व उपजीविकांमुळे आदिवासींना काटकसरीने जगणे, निसर्गावर अवलंबून असल्यामुळे निसर्गाचे संवर्धन करणे अशा गोष्टींची जाणीव असल्याचे दिसते. त्यामुळे 'शाश्वत उपजिविका' टिकवण्यामध्ये त्यांचे खूप मोठे योगदान दिसून येते. कारण जसजसे उत्पादन साधनांमध्ये प्रगती झाली. तसतशी निसर्ग आणि पर्यावरणाची हानी अधिक झाल्याचे दिसून येते. डिंभे धरण परिसरातील लोकांजवळ उत्पादनाची साधने पारंपारिक आहेत. त्यामुळे उत्पादनाचा वेग कमी, उत्पन्न कमी, कमी गरजा, साधी रहाणी असा क्रम दिसून येतो.

२. चेंबर्स व इयान स्कूल यांनी मांडलेल्या शाश्वत उपजीविकाच्या चौकटीनुसार डिंभे धरण परिसरातील आदिवासी समाजातील मच्छिमारांच्या उपजीविकेचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, डिंभे धरण परिसरातील लोकांच्या आर्थिक परिस्थितीची, सामाजिक परिस्थिती साधारण आहे. अनेक लोकांना विस्थापनामुळे स्वत:च्या मालकीच्या जमिनी नाहीत. ज्यांना आहेत ते अल्पभूधारक आहेत. कित्येकांना ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीकरीता परगावी कामाला जावे लागते. आर्थिकस्थिती कमकुवत असणे व यामुळे स्थानिक ठिकाणची बेरोजगारी उघड होते.

३. डिंभे धरण परिसरात प्रामुख्याने ठाकर, कातकरी, महादेव कोळी या जमातीचे प्रबल्य दिसून येते आणि त्यामुळेच त्यांच्या उपजीविकेतील छोटे मोठे भेद दिसून येतात. महादेव कोळी हे सुधारण्याच्या वरच्या टप्प्यावर असणारे आहेत. त्यांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण बरेच चांगले आहे. ते प्रामुख्याने शेती करणारे स्थानिक आहेत. ठाकर हे मासेमारी चांगली करु शकतात, त्यांचा शिक्षणस्तर लिहिण्या वाचण्यापुरता मर्यादित दिसून येतो. परंतु कातकारी या अदिम जमातीमध्ये शिक्षणाची प्रचंड नावड दिसून येते. संशोधनातून

मिळालेल्या माहितीवरून तर बहुसंख्य कातकरी निरक्षर दिसतात तसेच त्यांच्यात अज्ञानामुळे मुले जन्माचे प्रमाण जास्त आहे. कातकारी मुख्य व्यवसाय मासेमारी करतात, कंदमुळे गोळा करणे, रानभाज्यावर दिवस काढणे. मिळेल तर खावे अन्यथा बसून रहावे अशा वृत्तीमुळे विकासाच्या प्रक्रियेत खूप मागे आहेत. तर संकुचित असल्याने माणसांशी संपर्क लवकर करत नाहीत. त्यामुळे ते इतर दोन्ही जमातीपासून वेगळे पडल्याचे दिसते.

४. डिंभे धरण परिसरातील आदिवासी जमातीमध्ये अडीअडचणीचे व्यवस्थापन कसे करावे याचे शास्त्र अनुभवाने विकसित झाल्याचे दिसते. कातकारी अपली उपजीविका चालवताना अन्नधान्याचा साठा संपल्यावर पावसाळ्यात कुठल्या रानभाज्या, कंद, खेकडे येतात त्यावर गुजरण करतात. अनेक वादळे, धुके, थंडी यातही ते स्वत:ला कसे वाचवून ठेवत असतील? याची जाणीव त्यांच्या घरांकडे पाहिल्यावर येते. महादेव कोळी, ठाकर या जमाती पावसाळ्यात बाजार बंद असतात, उंच डोंगरावरचे वास्तव्य, पैशाचा अभाव, काम बंद यासारख्या समस्यावर उपाय म्हणून अधिच पावसाळ्याच्या सुरुवातीला तीन-चार महिने पुरेल एवढे अन्नधान्य, मीठ-मिरची, रॉकेल अशा वस्तूंचा साठा करून ठेवतात. त्याला स्थानिक भाषेत ‘अगोठीचा बाजार’ असे म्हणतात.

५. डिंभे धरण परिसरात लोकांना पुरेसे काम नसतं, आठ महिने पुरेल एवढे धान्य उत्पादन होत नाही त्यातून परगावी काम शोधणे, नवीन कामाच्या संधी शोधणे यातच वर्षभर लोकांचा वेळ जातो. त्यामुळे लहान मुलांपासून प्रौढापर्यंत सर्वच लोकांना घर चालवताना हातभार लावावा लागतो. त्यामुळे शिक्षणाकडे तरूण मुलांचे दुर्लक्ष झाल्याचे दिसते. शिक्षणाअभावी त्यांच्या स्थानिक संघटना, कामगार संघटना यांचा अभाव दिसून येतो आणि भाववाढ, व्यापार बाजारपेठांचे ज्ञान यांची समज नसल्यामुळे विकासाची गती कमी दिसून येते.

६. संशोधन क्षेत्रातील आदिवासी समाजाला स्थानिक पातळीवर राजकीय पक्ष कोणता आहे? आपल्याला असणाऱ्या सरकारी योजना कोणत्या आहेत? याची फार कमी माहिती आहे. ‘श्वाश्वत’ सारख्या संस्थांनी येथे बरेच परिश्रम करून लोकांना यासाठी जागृत करण्याचे

काम चालवले आहे. स्वत:चे सबलीकरण करुन घेण्यासाठी आदिवासींना मोठी संधी या संस्थेकडून दिसून येते. स्थानिक लोक नियमित बैठकी, चर्चा सभा निमित्ताने एकत्र भेटतात. ग्रामपंचायतीचे कामे समजून निर्णय घेताना दिसतात.

७. शेतीशिवाय वनउपज म्हणून हिरडा उद्योग या भागात चांगलाच आर्थिक पाठबळ देणारा ठरला आहे. परंतु सर्वच गावांना याचा लाभ मिळत नसल्यामुळे हिरडा उद्योगावर स्थानिक लोकांपेक्षा व्यापाऱ्यांचेच नियंत्रण अधिक असल्याचे दिसून येते.

८. मासेमारी ही एक मोठी संधी धरण पूर्ण भरल्यानंतर निर्माण झाल्याचे चित्र सध्या सर्वत्र धरण परिसरातील गावांत आहे. २००० नंतर मासेमारीचे उत्पन्न वाढत असून नवीन पिंजरा संस्कृती, पेन कल्चर यासारख्या आधुनिक मत्स्यसंगोपनाच्या पद्धतीमुळे भविष्यात भरघोस उत्पन्नाची संधी दिसून येते. त्यामुळे सध्या उपजिविकेतील अडचणी भविष्यात कमी होऊन आदिवासींना नवीन विकासाच्या संधी, शिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

९. अनेक मासेमार कुटुंबाकडे मासेमारीकरीता जाळी कमी आहेत. स्वत:ची होडी नाही, होडी दुरुस्तीच्या समस्या आहेत. आतील भागात प्रवासाची साधने कमी असल्याने होड्यांनी प्रवास करावा लागतो तेव्हा साधनांच्या कमतरतेमुळे लोकांना मासेमारीचे संपूर्ण सामर्थ्याचा वापर करण्यात आर्थिक अडचणी अधिक असल्याचे दिसून येते.

१०. डिंभे घरण परिसरातील लोकांना अंशत: विस्थापित जीवन जगावे लागते. धरण बांधण्यापूर्वी स्थानिक लोकांकडून ५०० रुपये एकर प्रमाणे सरकारने जमिनी घेतल्या. आणि माळरानावर न पिकणाऱ्या निष्कृष्ट जमिनीच्या अधारावर जीवन कंठण्यासाठी सोडून दिल्या. सध्या आदिवासी विकास विभागाकडून मच्छिमार समाजाला जाळी, होडी अनुदानाच्या रकमेवर दिली जाते. परंतु जाळे विशिष्ट व्यापाऱ्याकडूनच घ्यावे असे बंधन असते. धरणातील गाळपेर शेती करताना पाणी परवाने, गाळपेर जमिनी कसण्याचा११ महिन्याचा करार यासाठी हेलपाटे मारावे लागणे, डिझेल इंजिन अनुदानाने मिळण्यासाठी २.५ एकर जमीन नावावर असण्याची अट यासारख्या अडथळ्यामुळे आदिवासींना उपजिवीका चालवताना कसरत करावी लागत असल्याचे दिसते.

## ६.२ सूचना / शिफारशी -

१. हिरडा उद्योग हा आंबेगाव तालुक्यातील आदिवासी बांधवांचा महत्त्वाचा आधार आहे. परंतु हिरड्याचा भाव हिवाळ्यात अधिक असतो आणि त्यावेळी हिरडा लोकांच्या हातात नसतो. कारण अडचणीमुळे तो अधिच विकावा लागतो. प्रत्येक गावात २/३ महिला बचतगट आहेत. हिरडा खरेदी विक्री महिला बचतगटामार्फत करावी. ज्यामुळे लोकांना वाहतुक व्यवस्थेवर होणारा खर्च आणि व्यापारीवर्गाची मध्यस्थी या अडचणी होणार नाहीत.

२. हिरड्याची लागवड जंगल विभागाने करावी, लोकांना हिरडा लागवडीस प्रोत्साहन द्यावे.

३. शासनाने गाळपेर जमिनीचे परवाने देताना ११ महिने कराराने देण्यापेक्षा ३,४ वर्षाच्या कराराने द्यावेत.

४. शासनाने डिझेल इंजिन अनुदानाच्या दराने गटा-गटाला वेळेवर द्यावेत.

५. स्थानिक जंगलातील करवंदे, आवळा, औषधी वनस्पती यावर अधारीत उद्योग उभारण्यासाठी बचतगटाला अर्थपुरवठा आणि मार्गदर्शन मिळाले पाहिजे.

६. रोजगार हमी योजनेमार्फत शेतीविभागामार्फत लोकांना नविन ‘पडकई’ करणे भातखाचरं तयार करणे, बांध-बंदिस्ती, विहीरी यासाठी सहकार्य मिळाले पाहिजे.

७. अनेक लोकांना /मच्छिमारांना जाळ कमी आहे ही समस्या जाणवते. तेव्हा अनुदानाच्या दराने नवीन जाळे आणि हावे त्या आकाराचे जाळे मिळाले पाहिजे.

८. होडी दुरुस्ती आणि होडी बांधणीसाठी स्थानिक मुलांना प्रशिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

९. ७५% लोकांना होडी पलटी होऊन बुडण्याचा धोका जाणवतो तेव्हा जीवरक्षक जॅकेटची सोय सर्व सभासद मच्छिमारांना होणे आवश्यक आहे.

१०. डिंभे धरण परिसरातील ८० कुटुंबपैकी फक्त ११.२५% कुटुंबातील लोकांना मासेमारीचे प्रशिक्षण मिळाले आहे. तेव्हा शासनाच्या मत्स्यविभागामार्फत प्रशिक्षण मिळाले तर अधिक कार्यक्षमपणे मासेमारी करता येईल.

११. अनेक कातकरी कुटुंबे पारंपारिक मासेमारी करतात. ते ट्युबवरुन मासेमारी करतात. ट्युबवरुन मासेमारी करणे जीवाला खूप धोकादायक असते. तेव्हा त्यांना होडी उपलब्ध झाली तर फक्त मासेमारी व विटभट्टीवर उपजिविका करणाऱ्या कातकरी कुटुंबाला खूप आधार होईल.

१२. सरकारी योजनांही मिळाली तर लोक आपली गरज ओळखून मदत मिळवू शकतील त्यासाठी जाहिराती, प्रबोधन, सभा, बैठकीतून सरकारी योजनांची स्थानिक भाषेत, लोककलेतून माहिती द्यावी.

१३. धरणाची ठेका रक्कम कमी करावी, धरणाच्या कडेकडेच्या गावात पुरेशी वीज शेतीच्या वेळी आवश्यक तेवढी उपलब्ध झाली पाहिजे.

१४. आदिवासीमधील पारंपारिक कलाकुसर, हस्तउद्योग पुर्नजीवित करण्यासाठी शासनाने मदत करावी.

१५. प्रमुख पीक भात असल्याने भात पिकाचे अधिक उत्पन्न होण्याकडे सर्व लोकांचा कल आहे. परंतु कधी अतिपावसामुळे तर कधी पावसाच्या अभावामुळे भात पिकाचे शेत नष्ट होते. तेव्हा अशा संकटाच्या समयी उपयोगी येण्यासाठी नवीन अन्नधान्याचे पिक लागवडीचे प्रयोग करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

****

## ६.३ अभ्यासात आलेल्या अडचणी-

१. संशोधन क्षेत्र हे आंबेगाव तालुक्यातील आदिवासी क्षेत्र असल्यामुळे बऱ्याच कुंटुंबातील आदिवासी आशिक्षित आहेत त्यामुळे प्रश्नावली आणि अनुसुचीद्वारे तथ्य संकलन करताना अडथळे निर्माण झाले. मार्गदर्शनासाठी बराच वेळ द्यावा लागला.

२. अनेक आदिवासी हे अबोल आणि संकोची वृत्तीचे असल्यामुळे माहिती मिळवताना खुप विश्वासात घ्यावे लागते. ही अडचण जाणवली.

३. धरण परिसरातील १४ गावे संशोधनासाठी निवडली असल्याने काही गावांना जाण्यासाठी होड्याचा प्रवास हा एकमेव मार्ग उपलब्ध आहे. त्यामुळे कधीकधी होडी उपलब्ध होऊ पर्यंत अलिकडीलच्या गावातच वास्तव्य करावे लागे. संशोधनात याची अडचण झाली.

४. संशोधन क्षेत्रातील मच्छिमार आदिवासी प्रामुख्याने तीन जमातीचे आहेत. महादेव कोळी, ठाकर, कातकरी. महादेव कोळी यांच्यात शिक्षणाचे प्रमाण थोडे चांगले असल्यामुळे त्यांचे संशोधन कामी सहकार्य मिळाले. परंतु कातकरी हे अशिक्षित आणि भूमिहीन असल्याने उपजीविकेसाठी सतत वणवण करणारे आहेत त्यामुळे ते सतत त्रस्त दिसतात आणि संशोधन कामी सतत अविश्वास दाखवतात. माहितीची टाळाटाळ करतात. त्यामुळे संशोधनात अडथळे आले. तेव्हा स्थानिक कार्यकर्ते यांना घेऊन माहिती मिळवावी लागली.

५. स्थानिक जंगल उत्पादन हिरडा हे पीक खुप महत्वाचे साधन आहे. परंतु व्यापारी आदिवासींच्या अडचणीचा फायदा घेऊन त्यांना टाकतात. त्यामुळे या भागात हिरडा उत्पादकांचे अंदोलने अधूनमधून चालुच असतात. हिरडा खरेदी विक्री करणारे सहकारी संस्था, शासन यांचेकडून हिरडा आकडेवारी, भाव याविषयी माहिती मिळण्यास अडचणी आल्या. माहिती पुरेशी मिळाली नाही.

६. संशोधकाने स्वत: वर्षभर महिन्यातून ३,४ वेळा संशोधन क्षेत्रात वास्तव्य केलेले आहे. प्रत्येक गावात २,३ वेळा वास्तव्य झाले होते आणि स्थानिक स्वंयसेवी संस्था 'शाश्वत' यांच्या ३० वर्षाच्या विश्वासामुळे संशोधकाला आदिवासीशी जोडून घेता आले. तरीही स्थानिक भाषा, परंपरा समजून घेणे यात बराच वेळ गेला.

७. धरण परिसरातील गावे अंशत: विस्थापित आहेत. विस्थापितांचे पुर्नवसन झाले नाही. सरकार दरबारी त्यासाठी अर्ज - विनंत्या चालू आहेत. म्हणून संशोधकाला धरण विभाग, धरण परिसरातील गाळपेर शेती, या संदर्भातील अधिकाऱ्याकडून अधिक माहिती उपलब्ध झाली नाही.

८. संशोधन क्षेत्र आदिवासी असल्याने ठाकर, कातकरी, महादेव कोळी यांच्या उपजीविकेचे, जीवनाचे निरीक्षण करताना आनेक समस्या, विविधता दिसून आल्या. त्यामुळे मर्यादित वेळेत संशोधन करताना अडचण जाणवली.

९. संशोधन क्षेत्रातील काही गावे उंच डोंगरावर वसलेली आहेत. आणि हा भाग दाट जंगलाचा आहे. त्यामुळे संशोधकाला ३,४ कुंटुंबासाठी तासतास डोंगर चढून जावे लागले, दाट जंगलातून जावे लागले त्याचीही अडचण जाणवली

१०. प्रश्नावलीत होडी दुरूस्तीची अडचण आनेक लोकांनी सांगितली आहे. दुसऱ्या गावाला जाण्यासाठी (संशोधन क्षेत्रातील) याच होडीने कधी कधी प्रवास करावा लागला त्यामुळे होडीत खराब आवस्थेमुळे पाणी भरत असे ते पाणी बाहेर सारखे काढावे लागत तास तास प्रवास करावा लागे. तेव्हा जीवाचा धोका वाटत असे. जीवरक्षक जॅकेट एकाही होडीवाल्याक डे नसल्यामुळे होडीचा प्रवास धोकादायक वाटत असे.

*****

## ६.४ भविष्यात अधिक संशोधनासाठीच्या संधी

संशोधनाचा राजमार्ग नसतो. नवी वाट शोधून काढणे यातच त्याचं सौदर्य आहे. संशोधनाची खरी ताकद त्याच्या मोजमापात असते. मोजमाप केल्यामुळे समस्याची तीव्रता कळते, म्हणून समस्या मोजल्या पाहिजेत, अधिक संशोधन झाले पाहिजे. डॉ. अभय बंग म्हणतात ''हजार बुध्दीवान अंदाजापेक्षा एक खरेखुरे मोजमाप अनंतपटीने अधिक विश्वासार्ह आहे.''

संशोधकाला सदरचे संशोधन करताना १४ गावांची पाहाणी करण्याची, वास्तव्य करण्याची, आणि आदिवासींच्या जीवनातील काही भागाचा अनुभव घेण्याची संधी मिळाली या प्रवासात संशोधकाला चालू संशोधनकार्याशिवाय आनेक नविन समस्या दिसून आल्या. त्याचं मोजमाप करून शासनासमोर इतर जगासमोर आल्या पाहिजेत, लोकांचे प्रश्न काय आहेत तरी जाणिव होईल.

### * भविष्यात संशोधन व्हावेत असे विषय-

१) डिंभे धरण परिसरातील धरणापूर्वीच्या आणि धरणानंतरच्या भातशेतीचा अभ्यास.

२) डिंभे धरण परिसरातील आदिवासी कुंटुंबाचे विस्थापन आणि अडचणी.

३) 'गाळपेर पडकई' शेतीचा तुलनात्मक अभ्यास.

४) आंबेगाव तालुक्यातील हिरडा व्यावसायाचा आर्थिक अभ्यास.

५) आंबेगाव तालुक्यातील कातकरी या आदिम जमातीची आरोग्य पाहाणी.

६) डिंभे धरण परिसरातील कातकरी जमातीच्या उपजीविकेचा अभ्यास.

## परिशिष्ट -१

## (संख्यात्मक माहिती गोळा करण्यासाठी वापरलेल्या प्रश्नावली आणि अनुसूचिचा नमुना)

### ''डिंभे धरण परिसरातील आदिवासी मच्छिमार परिवारांच्या उपजीविका आणि त्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी केलेला सर्वे''

(धरण परिसरातील आदिवासी मच्छिमार कुंटुंबाच्या अडचणी समजून घेणे आणि त्यांच्यासाठी योजना बनविणाऱ्या शासनाला, संशोधकांना विचारवंताना हि माहिती उपयोगी ठरेल)

✻ सर्वे केलेल्या गावाचे नाव :- ता.................. जि.................

✻ तारीख ......................

✻ सर्वे करणाऱ्याचे नाव ..................................... मोबाईल नं .................

✻ पत्ता ..........................................................................................

✻ गावाची / वाडीची लोकसंख्या ........... गावात किती आदिवासी राहतात ............

| कुंटुंब क्र. | कुंटुंबातील सदस्याचे नाव | कुटुंब प्रमुखाशी नाते | वय | लिंग | शिक्षण |
|---|---|---|---|---|---|
| | १. | | | | |
| | २. | | | | |
| | ३. | | | | |
| | ४. | | | | |
| | ५. | | | | |
| | ६. | | | | |
| | ७. | | | | |
| | ८. | | | | |

१. आपली उपजीविका कशी चालते? मुख्य व्यावसाय काय आहे?

-----------------------------------------------

२. मासेमारीचा व्यावसाय किती वर्षांपासून करत आहात? सध्या जाळं किती किलो आहे?

-----------------------------------------------

३. वर्षातील किती काळ मासेमारी करता? महिन्याला किती किलो मासे मिळतात?

-----------------------------------------------

४. घरातील किती लोक माससेमारी करतात? रोज किती तास मासेमारी करतात?

-----------------------------------------------

५. मासेमारीची कुठली पध्दत वापरतात? वेगळी पध्दत माहिती आहे का ?

-----------------------------------------------

६. मासेमारीतील अडचणी कोणत्या आहेत?

-----------------------------------------------

७. मासेमारीचे प्रशिक्षण मिळाले का?

-----------------------------------------------

८. कुठल्या सोयीसुविधांची आवश्यकता आहे?

-----------------------------------------------

९. माशांची विक्री कशा भावाने करता?

-----------------------------------------------

१०. मासेमारी करताना काय काय धोके असतात?

-----------------------------------------------

११. बॅकेत खाते आहे का? बचत करता का?

-----------------------------------------------

१२. सावकार, मित्र, नातेवाईकांकडून कर्ज घेता का?

-------------------------------------------------

१३. बचत गटात नाव आहे का? किती बचत करता?

-------------------------------------------------

१४. आठवड्याच्या बाजारातून काय काय खरेदी करावे लागते?

-------------------------------------------------

१५. परगावी कामाला जावे लागते का? किती दिवस जाता?

-------------------------------------------------

१६. पावसाळ्यात मासे पकडणे बंद असते तेव्हा काय काम करता?

-------------------------------------------------

१७. रेशनकार्ड आहे का? काय काय मिळते? खावटी कर्ज काय मिळते?

-------------------------------------------------

१८. भात खाचरं आहे का? किती आहेत?

-------------------------------------------------

१९. वर्षाला किती किलो भात होतो?

-------------------------------------------------

२०. गाळपेर करता का? काय काय पेरता?

-------------------------------------------------

२१. गाळपेर मधून वर्षाला किती उत्पन्न मिळते?

-------------------------------------------------

२२. हिरडा वेचता का? वर्षाला किती किलो वेचता / गोळा करता?

-------------------------------------------------

२३. जंगलातून काय काय उत्पन्न मिळते?

---------------------------------------------

२४. पडकई करता का? किती उत्पन्न मिळते?

---------------------------------------------

२५. जनावरं आहेत का? उत्पन्न आहे का?

---------------------------------------------

२६. शासनाच्या योजना माहिती आहेत का? कोणत्या?

---------------------------------------------

२७. जमातीच्या काही संघटना, मंडळे आहेत का? त्याचा काही उपयोग होतो का?

---------------------------------------------

२८. आदिवासी एकजूट संघटना, 'शाश्वत', बायफ यांचे काय मार्गदर्शन मिळते?

---------------------------------------------

२९. गावात सण, उत्सव कसे साजरे करता?

---------------------------------------------

३०. गावात किती राजकिय पक्ष आहेत?

---------------------------------------------

३१. जंगलात कशा कशाला देव मानता (पक्षी, झाडे, प्राणी इ.)

---------------------------------------------

## परिशिष्ट -२

## आंबेगाव तालुक्यातील गावे

### (संशोधनासाठी निवडलेली गावे अधोरेखीत केलेली आहेत)

**१) अडिवरे**
२) अघाणे
३) अहुपे
४) अमाडे
५) आंबेदरा
**६) आंबेगांव**
७) अमोनाडी
८) आपटी
९) असाणे
१०) आवसरी बु ।।
११) आवसरी खु।।
१२) भागाडी
१३) भराडी
१४) भोरघर
१५) चांदोली बु।।
१६) चांदोली खु।।
१७) चापटेवाडी
१८) चास
१९) चिखली
२०) चिंचोडी
२१) चिंचोली
२२) देवगड
२३) धाकले
२४) धामणी
२५) धोंडमाळ शिंदेवाडी
**२६) दिगद**
२७) डिंभे बु।।
२८) डिंभे खु।।
२९) डोण
३०) एकलहरे
३१) फालकेवाडी
३२) गाडेवाडी
३३) गंगापूर बु।।
३४) गंगापूर खु।।
३५) जावडेवाडी
३६) गवारवाडी
३७) घोडेगाव
३८) गिरवली
३९) गोहे बु।।
४०) गोहे खु।।
४१) जाधववाडी(रांजणी)
४२) जांभोरी
४३) झरकरवाडी
४४) जावळे
४५) कडेवाडी
४६) कळंब
**४७) कळंबोई**
४८) काळेवाडी-दरेकरवाडी
४९) काणसे
५०) कारेगाव
५१) कथापूर
५२) खडक मळा
५३) खडकी
५४) खडकवाडी
५५) कोल्हारवाडी
**५६) कोलतावडे**
५७) कोंठारे
५८) कोलवाडी
५९) कोंढवळ
६०) कुरवंडी
**६१) कुशीरे बु।।**
**६२) कुशीरे खु।।**
६३) लाखणगाव
६४) लवकी
६५) लोणी
**६६) मेघोली**
६७) म्हाळुंगे पडवळ
**६८) म्हाळुंगे (आंबेगाव)**

६९) म्हाळुंगे (घोडा)
७०) मालावाडी
७१) मालीण
७२) मापोली
७३) मेंगडेवाली
७४) मेंनुबरवाडी
७५) मोराडेवाडी
७६) नागापूर
७७) नानावडे
७८) नंबदूर
७९) नंदूरकिची वाडी
८०) नारोडी
८१) न्हावेड
८२) निगदळे
८३) निघुमवाडी
८४) निरगुडसर
८५) पहाडदरा
**८६) पांचाळे बु।।**
**८७) पांचाळे खु।।**
८८) पारगांव
८९) पारगांवखेड
**९०) पाटण**
९१) पेठ
९२) पल्हाडेवाडी
९३) उगलेवाडी
९४) पल्होडे
**९५) फुलवडे**
९६) पिंपळगाव-घोडा
९७) पिंपळगाव-म्हाळुंगे
९८) पिंपरगणे
**९९) पिंपरी**
१००) पिंगळेवाडी-लांडेवाडी
१०१) पोखरी
१०२) पोखरकरवाडी
१०३) पोंडेवाडी
१०४) राजेवाडी
१०५) राजापूर
१०६) रामवाडी
१०७) रांजण
१०८) राणमळा
१०९) साकेरी
११०) साकोरे
१११) सळ
**११२) सावरली**
११३) शेवाळवाडी
११४) शेवाळवाडी-लांडेवाडी
११५) शिंद मळा
११६) शिंगवे
११७) शिनोली
११८) शिरदळे
११९) श्रीरामनगर
१२०) सुलतानपूर
१२१) सुपेधर
१२२) टेकेवाडी
१२३) तळेघर
१२४) तळेकरवाडी
१२५) तांबळेमळा
१२६) लव्हरेवाडी
१२७) तेरुनगण
१२८) ठाकरवाडी
१२९) थोंरदळे
१३०) तिरपाड
१३१) वाचाळमळा
**१३२) वचपे**
१३३) वडगाव काशिंबेग
१३४) वडगाव पीर
१३५) तलाटी
१३६) वरसावणे
१३७) विठ्ठलवाडी
१३८) वाळुंजवाडी
१३९) कणस
१४०) भावडी
१४१) कोटमदरा
**१४२) बेंढारवाडी**
**१४३) बोरघर**

## परिशिष्ट-३

## भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय

## ‘‘अनुसुचित जाती आणि अनुसुचित जनजाती आदेश (विशोधन) अधिनियम, १९७६’’

## (सन १९७६ च्या अधिनियम क्रमांक १०८)

## १ मार्च,१९८९ रोजी यथविद्यामान भाग ९ वा - महाराष्ट्र

**संचालक मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रीत व प्रकाशित केले.**

**अ.क्र.**

१. आंध

२. बैगा

३. बरडा

४. बावचा,बामचा

५. भैना

६. भारिया, भूमिया, भूईनहार, भूमिया पांडी

७. भात्रा

८. भिल, भिल गरासिआ, ढोली भिल, डुंगरी गरासिया,मेवासी भिल, रावल भिल, तडवी भिल,भागालिया, पावरा, वसावा, वसावे.

९. भुंजिया

१०. बिझवार

११. बिरहूल, बिरहोर

१२. चोधरा (अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, यवतमाळ, औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद व परभणी जिल्हे सोडून)

१३. धाणका, तडवी, तेतारिया, वळवी

१४. धनवार

१५. घोडिया

१६. दुबळा, तलाविया, हलपती.

१७. गामित, गामटा, गावित, मावची, पाडवी.

१८. गोंड किंवा राजगोंड, आरख, अराख, अगारिया, ममूर, वडिमारिया,भटोला, भिम्मा, भूता, कोईल-भूती, बिसनहोन, मारिया,छोटा मारिया,वंडामी मारिया, धुरू, धुरवा, धोबी, धुनिया, डोरला, गायकी,गुत्ता, गट्टी, गायता, गोंडगोवारी,लिला भारिया, कांदरा, कलंगा, खटोला, कोयनार, कोया, बिरवारा, खिरवार, कूच मारिया, कुचकी मारिया, माडिया, मारिया, माना, मन्नेवार, मोघ्या, मोगया, मोंघ्या, मुडिया, नागरची, नाईकपोड, नागवंशी, ओझा, राज, सोनझारी, झरेका, थाटिया, थोट्या, वाडेमारिया, वडेमारिया.

१९. हलबा, हलबी

२०. कमार

२१. काथोडी कातकरी, ढोर काथोडी, ढोर, कातकरी, सोन काथोडी, सोन कातकरी.

२२. कवर, कांवर, कोर, चेरवा, राठिया, तन्वर, छद्री.

२३. खैरवार

२४. खरिया

२५. कोकणा, कोकणी, फुकना

२६. कोल

२७. कोलाभ, मुन्नेरवारलू

२८. कोळी ढोर, टोकरे कोळी, कोलचा, कोलघा

२९. कोळी महादेव, डोंगर कोळी

३०. कोळी मल्हार

३१. कोंध, खोंड, कांध

३२. कोरकू, बोपची, मोवसी, निहाल, गहूल बोंधी बोंडेया

३३. कोया, भिनेकोया, राजकोया

३४. नगेसिया, नगासिया

३५. नाइकडा, नायका, चोळीवाला नायका, कापरिया नायका, मोटा बायका, नाना नायका

३६. ओरांव, धनगड

३७. परधान, पाथरी, सरोटी.

३८. पारधी, आडवीचिंचेर, फांस पारधी, फासे पारधी, लांगोटी पारधी, वहेलिया, बहेलिया, चिता पारधी, शिकारी टाकणकर, टाकिया

३९. परजा

४०. पटेलिया

४१. पोमला

४२. राठवा

४३. सवर, सवरा

४४. ठाकूर, ठाकर, का-ठाकूर, का ठाकर, मा-ठाकूर, मा-ठाकर

४५. थोटी (औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद, व परभणी जिल्हयात व चंद्रपूर जिल्हयाच्या राजुरा तहसीलमध्ये)

४६. वारली

४७. विटोलिया, कोटवालिया, बारोडिया ........

(संदर्भ- आदिवासी हालबांच्या अस्तित्वाचा अंतर्वेध- डॉ. रेखा वडिखाये, लाखे प्रकाशन नागपूर सप्टेंबर २००९ पृ. क्र. १५६- १५७ )

# परिशिष्ट - ४

## संदर्भ सूची


**संशोधन पद्धतीशास्त्र -**

१. डॉ. बोरुडे रा.र. - संशोधन पद्धतीशास्त्र, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे - २००८

२. डॉ. आगलावे प्रदिप - संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन, नागपूर - २०००

३. डॉ. कुऱ्हाडे बी.एम. - शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळेपुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर जुलै २००७

४. Bhandarkar P. L. - Methodology and Techniques of Social Research, Himalaya Publishing House Pvt. Ltd., Mumbai - 4. - 2009

**मराठी ग्रंथ -**

१. डॉ. दीक्षित दुर्गा - महाराष्ट्र संस्कृती कोश - डायमंड पब्लिकेशन, पुणे - २००९-२०१०

२. डॉ. वडिखाये रेखा - आदिवासी हलबांच्या अस्तित्वाचा अंतर्वेध, लाखे प्रकाशन, नागपूर २८ सप्टेंबर २००९

३. डॉ. दास्ताने संतोष - महाराष्ट्र २००८, दास्ताने रामचंद्र आणि कं. सदाशिव पेठ, पुणे-३०, २००८

४. डॉ. गारे गोविंद - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती-कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे - ३०

५. बोकिल मिलिंद - 'कातकरी' विकास कि विस्थापन ? मौज प्रकाशन, २००६

६. डॉ. ढेरे रा.चि.- लोक दैवतांचे विश्व; पदमगंधा प्रकाशन, पुणे - ३८, जाने. १९९६

७. डॉ. गारे गोविंद - आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन, अमृत प्रकाशन, औरंगाबाद, मे १९९४

८. ॲड. मोरे माधव बंडू - आदिवासी बोलू लागला, सुगावा प्रकाशन

९. डॉ. देशमुख नंदिनी - महाराष्ट्रातील सागरी मत्स्यसंपत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती बाळ दत्तात्रय मंडळ, मुंबई - १९९१

१०. आंबेगाव दर्शक २००० - अक्षर मानव प्रकाशन मंचर

**मासिके -**

१. डॉ. घाटे ऋचा - आदिवासी संशोधन पत्रिका (लेख) आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे, सप्टें. १९९४

२. गीताली वि.मं. - मिळून साऱ्याजणी, पुणे - ऑगस्ट २०१०

३. हाकारा मंथन विशेषांक - महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, जुलै-सप्टें.२००९

४. आदिवासी संशोधन पत्रिका - आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे - २००६.

**अहवाल /टिपणी -**

१. जिल्हा सामाजिक आर्थिक पहाणी, पुणे जिल्हा, २००५-२००६

२. पंचायत समिती आंबेगाव, कृषि विभाग, खरिप हंगाम, २०१०-२०११ आढावा

३. डिंभे जलाशय दारिद्रय निर्मुलन कार्यक्रमाची माहिती, आयुक्त बैठक टिपणी.

४. आंबेगाव पंचायत समिती, पशुसंवर्धन १८ वी पशुगणना, २००७

५. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या. नाशिक ३७ वा आर्थिक अहवाल २००८-२०१०.

६. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, पुणे जिल्हा - २००७-२००८
अर्थ आणि सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

७. महाराष्ट्राची आर्थिक पहाणी २००२-२००३, अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

८. डिंभे जलाशय मासेमारी प्रगती अहवाल, २००८

९. Economic Survey 2006-2007, Govt. of India.

**इंग्रजी संशोधन अहवाल / प्रबंध -**

1. Ian Scoones : Sustainable Rural Livelihoods A framework for Analysis, IDS working paper 72, Institute of Development Studies, Sussex UK 1998.

2. Chambers R and Convey, G. (1991) - Sustainable Rural Livelihoods practical concepts for twenty first century. IDS Disccusion paper 296, Brighton - IDS

3. Tanksale Kalyan : Practicipatory System Dynamics modeling of Engery use and livelihoods of a Forest Dwelling Community, IIT, Mumbai, July 2010.

4. Edward H Allison, Frank Ellis (2001) : The livelihoods approach and management of small scale fisheries - marine policy-25.

5. Annual Report 2006 - 2007 - Department of Animal Husbandry, Dairying and Fisheries, Govt of India.

6. Handbook of Fisheries - Statistics, 2000 Dept. of Animal Husbandry, Dairying and Fisheries, Govt. of India.

7. Study of the People - Forest Relationship and local resource management systems in the Bhimashankar Area, Final Report 2004.

8. Livelihood Analysis in powerguda and Kistapur Micro - Watershade in Southern India. T. K. Sreedevi.

9. Potential for export of Horticulture products from Bihar and Jharkhand, Occasional Paper No. 94. Export - Import Bank of India, Dec. 2002.

10. Census of India 2001, Pune District, District Census handbook.

**भेट दिलेल्या संस्था -**

१. ग्रंथालय - टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

२. ग्रंथालय - बी.जी. काळे, बँक ऑफ महाराष्ट्र, केंद्रीय कार्यालय, पुणे

३. ग्रंथालय - भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्था, पुणे

४. 'शाश्वत' स्वयंसेवी संस्था, मंचर, पुणे

५. आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे

६. पंचायत समिती कार्यालय, आंबेगाव

७. ग्रंथालय - धनंजयराव गाडगीळ, गोखले इन्स्टिटयूट, पुणे.

८. मत्स्य उत्पादन केंद्र, हडपसर, पुणे

Web Site :

1. https://mail.google.com.Ambegaon District (pune dairy.com)

2. https://mail.google.com (katkari)

3. www.icrisat.org.

4. https : //www.ids.ac.uk./ids/research/env/index.html.